**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचने बाबत</u>**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, दिवाकर रावते, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री रामनाथ मोते, पाशा पटेल या सन्माननीय सदस्यांनी आज नियम 289 अन्वयेची प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सदर सूचनेमध्ये असे म्हटले आहे की,

" दिनांक 25 जुलै,2011 रोजी पंढरपूरहून पांडुरंगाचे दर्शन घेऊन परतीच्या मार्गावर असलेल्या गजानन महाराज संस्थानतर्फे आयोजित केलेल्या वारकऱ्यांच्या दिंडीवर जालना जिल्हयातील पारनेर फाटयाजवळ एका कंटेनरने धडक दिल्याने 12 वारकरी मृत्युमुखी पडणे" या बाबतीत मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या बरोबर चर्चा केलेली आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री आज आजारी असल्यामुळे सन्माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या बरोबर चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आज सभागृहात उपस्थित नाहीत पण मी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्या बरोबर चर्चा केलेली आहे व आज ही चर्चा घेण्याचे मी ठरविले आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज संपल्यानंतर शेवटच्या दीड तासात ही चर्चा घेण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्याप्रमाणे ही चर्चा होईल.

श्री. जयंत पाटील : ही चर्चा सायंकाळी 6.00 वाजण्यापूर्वी होणार आहे काय?

**सभापती** : ही चर्चा 6.00 वाजण्यापूर्वी होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला असे वाटते की, कालच्या चर्चेचे उत्तर आणि लक्षवेधी सूचना झाल्या नंतर जर ही चर्चा घेण्यात आली तर बरे होईल.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या सूचनेचा नेहमी सन्मान केला जातो. शेवटी संसदीय लोकशाहीमध्ये सत्तारुढ पक्ष आणि विरोधी पक्ष यांचा मिळून विचार असतो. सदनाचे आजचे कामकाज बरोबर 6.00 वाजता संपण्याच्या दृष्टीने मी विचार करीत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केली आहे त्या बाबतीत मला जर काही करता आले तर दरम्यानच्या एक तासाच्या मुदतीमध्ये मी जरुर त्या बाबतचा निर्णय या ठिकाणी देईन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक 17878 च्या उत्तरा बाबत</u>**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पृष्ठ क्रमांक 36 वरील प्रश्न क्रमांक 17878 या प्रश्नाच्या उप प्रश्न क्रमांक 2 व 3 ला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये विकासकांच्या नावाची जी यादी जोडलेली आहे ती संपूर्णपणे इंग्रजीमध्ये आहे.

**सभापती** : ठीक आहे, मी ते जरुर बघतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आज सभागृहात उपस्थित नाहीत. पण या बाबतीत सुधारणा होत नाही. म्हणून आपण हे जरुर बघावे.

**सभापती** : ठीक आहे.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक जिल्ह्यातील मुस्लीम बांधवांसाठी सिडकोत**
**दफनभूमीसाठी जागा मिळणेबाबत**

**(1) * 18262 श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक जिल्ह्यातील मुस्लीम बांधवांनी सिडकोत दफनभूमीसाठी जागा मिळण्याकरिता शासनाकडे गेल्या अनेक वर्षापासून मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, दफनभूमीला जागा मिळत नसल्याने मुस्लीम बांधवांतर्फे माहे मे, 2011 च्या पहिल्या आठवड्यात महापालिकेवर मोर्चा काढण्यात आला होता हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मुस्लीम बांधवांना दफनभूमीसाठी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत ?

**श्री. भास्कर जाधव श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (1) होय.

(2) या बाबत दिनांक 17 व 21/05/2011 रोजी मोर्चा काढण्यात आला होता.

(3) व (4) मुस्लीम समाजासाठी दफनभूमीची जागा निश्चित करण्याकामी नाशिक महानगरपालिकेने, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली असून सदर समितीने सर्व उपलब्ध पर्यायांची व्यवहार्यता तपासून आपला अहवाल महानगरपालिकेस सादर केल्यावर त्याआधारे महानगरपालिका या बाबत पुढील उचित निर्णय घेणार आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे ते अत्यंत थातूर-मातूर देण्यात आलेले आहे. हा प्रश्न नाशिक शहराच्या दृष्टीने अत्यंत गंभीर, संवेदनशील आणि महत्वाचा आहे.

यानंतर श्री. अ.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18262 .... श्री. जयप्रकाश छाजेड ...

या शहरातील मुस्लीम समाजाला आणि विशेषत: सिडको भागामध्ये राहणाऱ्या मुस्लीम समाजाला कब्रस्तान नसल्यामुळे आणि हजारोंची मुस्लीम वस्ती असल्यामुळे गेली अडीच वर्षे कब्रस्तानची मागणी होत आहे. परंतु दुर्दैवाने त्यावर निर्णय न झाल्यामुळे आणि विशेषत: महानगरपालिकेने निर्णय न घेतल्यामुळे अनेक वेळा प्रेतयात्रा महानगरपालिकेमध्ये आणल्या गेल्या. तरी देखील महानगरपालिकेने यावर काही कार्यवाही केलेली नाही. या विषयावर श्री. नसीम खान यांनी बैठक बोलवून त्या ठिकाणी महानगरपालिका आणि सिडकोला सूचना दिल्या. महानगरपालिका सिडकोवर टोलवते आणि सिडको महानगरपालिकेवर टोलवते. परंतु सामाजिक दृष्टीकोनातून देखील हा प्रश्न महत्वाचा आहे. मेलेल्या माणसाच्या घरामध्ये दु:ख असताना त्याच्या अंत्यविधीसाठी किंवा प्रेत पुरण्यासाठी जागा नसेल तर त्याचे अतिशय वाईट परिणाम घडतात. या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, महानगरपालिकेने आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. महानगरपालिकेने निर्णयच घेतलेला नाही आणि आता आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून महानगरपालिका काय करणार आहे ? या संदर्भात माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. जागा देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची किंवा सरकारची किंवा सिडकोशी संबंधित संस्थेची आहे की नाही ? हे प्रस्तावित होते की नाही आणि नसेल तर आयुक्तांची समिती रद्द करुन पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आणि संपर्कमंत्र्यांना सहयोगी अध्यक्ष करुन एक समिती नेमून या बाबतीत कालबध्द पध्दतीने निर्णय घेतला जाणार आहे की नाही ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सन 2011 च्या जनगणनेनुसार आता नाशिक शहराची एकूण लोकसंख्या 14 लाख 87 हजार आहे आणि संपूर्ण नाशिक शहरामध्ये मुस्लीम बांधवांची लोकसंख्या 1 लाख आहे. हा प्रश्न ज्या भागातील आहे त्या सिडको परिसरामध्ये एकूण लोकसंख्या साडेतीन लाख असून त्यामध्ये मुस्लीम बांधवांची लोकसंख्या 25 हजार आहे. संपूर्ण नाशिक शहरामध्ये हिंदू समाजाकरिता 20 स्मशानभूमी आहेत आणि मुस्लीम समाजाकरिता एकूण 17 ठिकाणी आरक्षणे असून त्यापैकी 16 ठिकाणी मुस्लीम

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

ता.प्र.क्र. 18262 ... श्री. भास्कर जाधव ....

समाजासाठी दफनभूमी आहेत. आज त्या ठिकाणी व्यवस्था नाही अशातील भाग नाही. परंतु सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे हा प्रश्न जुना आहे. हा प्रश्न कायम स्वरुपी निकाली निघावा याकरिता हे प्रकरण तीन वेळा कोर्टात गेले आणि कोर्टाने तीनही वेळा प्रकरण निकाली काढलेले आहे. आता आपण पाहिले तर रिट याचिका क्रमांक 6935/2009, 4075/2010 आणि 446/2010 या तीनही रिट याचिका कोर्टाने निकाली काढलेल्या आहेत. चौथी याचिका क्रमांक 7689/2010 कोर्टामध्ये प्रलंबित आहे. या संदर्भामध्ये आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली. त्यांनी एक जागा बघितलेली आहे. यासाठी तीन जागांचे पर्याय आहेत. तिसऱ्या जागेचा जो पर्याय आहे ती जागा महानगरपालिका त्यांना कब्रस्तानकरिता देण्यास तयार आहे. काही वर्षांपूर्वी सिडको मशीद ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी तो पर्याय मान्य केला होता परंतु नंतरच्या काळामध्ये त्यांनी तो पर्याय अमान्य केलेला आहे. तो पर्याय त्यांनी मान्य करावा याकरिता पुन्हा एकदा प्रयत्न केला जाईल. त्याचबरोबर आवश्यकता भासली तर सन्माननीय सदस्य म्हणतात त्या पध्दतीची समिती सुध्दा नेमली जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नाशिकसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरामध्ये आणि त्यातल्या त्यात सिडको या नवीन नाशिकच्या परिसरामध्ये असंख्य समाजाचे वेगवेगळे समूह राहतात. हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. जर आपल्या मृत व्यक्तीसाठी योग्य अशी कार्यवाही होणार नसेल तर त्यामुळे सामाजिक असंतुलन निर्माण होण्याची फार मोठी शक्यता असते. मला असे वाटते की, शासकीय पातळीवर आपण महापालिकेचे आयुक्त यांच्यापुरती ती जबाबदारी न ठेवता संबंधित सर्व घटकांना एकत्र करुन लवकरात लवकर निर्णय करावा. कारण या गोष्टी अशा आहेत की, त्या जितक्या लांबवित जाऊ तितकी मने दुखावली जातील. म्हणून या बाबतीत निश्चित कालबध्द कार्यक्रम ठरवून तेथील मुस्लीम समाजाला दिलासा देण्यासाठी शासन काही करणार आहे का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18262....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी शासनाकडून कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली आहे. परंतु खऱ्या अर्थाने हे काम करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील हा विषय असल्यामुळे त्यांनी लोकांना सोयी, सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे महानगरपालिकेच्या स्तरावर एक महिन्याच्या आत निर्णय झाला नाही तर त्या बाबत शासन दखल घेईल.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, माणसांना जीवंतपणी यातना तर होतात, परंतु मेल्यानंतर तरी यातना होऊ नयेत अशी आमची अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून त्यांना प्रश्न विचारतो. हा प्रश्न एकट्या नाशिक शहरापुरता मर्यादित नाही. संपूर्ण महाराष्ट्रातील शहरांमध्ये हा प्रश्न भेडसावत आहे. मग उल्हासनगर असेल, लातूर शहर असेल. संपूर्ण राज्यातील हा प्रश्न डोळ्यासमोर ठेवून तो सोडविण्यासाठी राज्य सरकार धोरण जाहीर करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा विषय सामाजिक असल्यामुळे मला थोडेसे बोलले पाहिजे. सध्या शहरीकरण प्रचंड प्रमाणात वाढत आहे. पण शहरांची हद्द त्या प्रमाणात वाढत नाही. पारशी समाज असेल, हिंदू समाज असेल या दोन्ही समाजांची प्रेत एकाच ठिकाणी आणली जातात. हिंदूचे प्रेत असेल तर ते जाळले जाते, पारशी समाजातील लोक प्रेताला विहिरीमध्ये टाकतात. त्यामुळे त्यांना मर्यादित जागा लागते. मुस्लिम समाजातील प्रेतासाठी वेगवेगळी जागा लागते. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल आणि संबंधित मित्रांना माझी विनंती आहे की, आता वाढते शहरीकरण, वाढ असलेली लोकसंख्या व जागेची वाढती गरज लक्षात घेता बदललेल्या परिस्थतीनुसार आपण सुध्दा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ठराविक कालावधीनंतर एका जागेवर दुसऱ्या ठिकाणी तशा प्रकारची कबर केली पाहिजे. काही शहरात अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसा निर्णय घेण्यासाठी समाजात प्रबोधन केले तर हा प्रश्न आपोआप सामंजस्याने मिटेल असे मला वाटते.

C-2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र.18262....

श्री. एस.क्यू. जमा : सभापति महोदय, यह प्रश्न नाशिक के बारे में है, लेकिन यह प्रश्न बहुत सेन्सिटिव है. नागपुर में बहुत दिनों तक कर्फ्यू रहा और कम्युनिटी के अन्दर 2 ओपीनियन होने की वजह से सुप्रिम कोर्ट के फैसले के बाद वहां पर बॉडी एग्ज्यूम करके दूसरी जगह पर ले जाना पड़ा. मेरा शासन से अनुरोध है कि इस विषय को म्युनिसपल बॉडीज या ग्रामीण क्षेत्र में ग्राम पंचायत के भरोसे छोड़ने की बजाय हमारा एक सेन्ट्रलाइज एक्ट होना चाहिए, जिसमें सभी धर्मों के, धर्मो में भी अलग अलग डिवीजन हैं, इन सब के लिए व्यवस्था होनी चाहिए. मुसलिम समाज में भी अलग अलग डिवीजन है, सेक्स के आधार पर डिवीजन है, इसलिए मेरा प्रश्न यह है कि महाराष्ट्र में एक सेन्ट्रलाइज एक्ट बनाकर, एक बोर्ड बनाकर सारी जगह आयडेन्टिफाय करके क्या शासन रेगूलेटरी अथॉरिटी बनाने के बारे में विचार करेगा ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, डिसेंबर, 2010 मध्ये शासनाने सर्व महानगरपालिका, नगरपालिका व स्पेशल प्लॅनिंग ॲथोरिटींना असे आदेशाद्वारे कळविले आहे की, त्यांनी विकास आराखड्यामध्ये लोकसंख्या व उपलब्ध असलेल्या जागेचा विचार करुन स्मशानभूमी व दफनभूमीसाठी जागा राखीव ठेवावी. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे या प्रश्नाबाबत थोडीशी व्यवहारिक तडजोड करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात वेगवेगळे सामाजिक कायदे आहेत. त्यामुळे शासनाने स्मशानभूमी व दफनभूमीसाठी जागा आरक्षित ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. कोणत्या समाजासाठी कोठे जागा ठेवावयाची असा प्रश्न विचारण्यात आला आहे. परंतु प्रत्येक समाजामध्ये वेगवेगळ्या चालीरिती असतात. त्यातून व्यवहारिक दृष्टीने मार्ग काढला पाहिजे. शासनाचा असा प्रयत्न आहे की, अत्यंविधीसाठी किंवा दफनभूमीसाठी जागेचे आरक्षण केलेले आहे त्या आरक्षणाचा आदर ठेवून त्या ठिकाणी व्यवस्था केली जावी.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.16262....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने जागा आरक्षित केली तरी स्मशानभूमी जाहीर करावयास अधिसूचना काढावी लागते. तो अधिकार जिल्हा दंडाधिकाऱ्यांना दिलेला आहे. रायगड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे मुरुड तालुक्यामध्ये ज्या ठिकाणी गणपती विसर्जन होते त्याच्या बाजूला स्मशानभूमी उभारण्याचा शासनाचा प्रयत्न सुरु आहे. मी स्वत: लेखी पत्र देऊनही विचार केला जात नाही. त्यामुळे हिंदू व मुस्लीम समाजामध्ये नाहक तेढ निर्माण होते. दफनभूमी व स्मशानभूमी जवळजवळ असल्यामुळे कोकणामध्ये दोन्ही समाजामध्ये मोठया प्रमाणात वाद निर्माण होत आहेत. शासन या संदर्भात पुढील 25 ते 50 वर्षाचा कालावधी विचारात घेऊन धोरण निश्चित करणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांची सूचना अत्यंत स्वागतार्ह आहे. पुढील काळात या सूचनेचा विचार केला जाईल.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उल्लेख केला की, सिडको परिसरात 3.5 लाख लोक रहात आहेत. सिडको ही प्लॅनिंग ॲथॉरिटी आहे. सिडको नवीन शहर वसविताना कुठे काय असावे याचे नियोजन करीत असते. सिडको आणि महापालिका यांचा परस्पर संबंध येत नाही. केवळ महापालिकेची नव्हे तर सिडकोची सुध्दा जबाबदारी आहे. हा विषय ज्वलंत आहे. हा प्रश्न महापालिका आयुक्तांच्या पातळीवर कधीही सुटू शकत नाही. महापालिका आयुक्त राजकीय पुढाऱ्यांना समजू शकणार नाहीत. यासाठी मी विनंती करतो की, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सहअध्यक्ष म्हणून संपर्क मंत्र्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करावी आणि सर्वांना विश्वासात घेऊन हा प्रश्न एक महिन्यात सोडवावा. ठरावीक काळात हा प्रश्न सोडविण्यासाठी शासन अशी समिती नेमणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी यापूर्वीच उत्तर दिले होते की, एका महिन्यानंतर निर्णय घ्यायला काहीच हरकत नाही. मी मराठी भाषेत उत्तर दिले होते व एका महिन्यात निर्णय घ्यायला नकार दिला नव्हता. सिडकोने नियोजन करताना तशा प्रकारची व्यवस्था केली पाहिजे हे खरे आहे. सिडकोने दोन जागा या स्मशानभूमीसाठी राखीव ठेवल्या होत्या. अगोदर दाखविलेली जागा स्मशानभूमीकरिता नाही. मुस्लीम बांधवांच्या दफनभूमीसाठी एकत्रितपणे 1.41 लाख मीटर म्हणजे 35.25 एकर जागा राखून ठेवण्यात आली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18262....

श्री.जयप्रकाश छाजेड : सिडकोने ही जागा अलॉट केलेली आहे का?

श्री.भास्कर जाधव : मला ते पहावे लागेल. परंतु पालक मंत्री आणि संपर्क मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यास शासनाची हरकत नाही.

-------

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वाहतुकीचे दर वाढवून मिळण्यासाठी विदर्भातील राईस मिलर्सतर्फे केलेली मागणी**

**(२) * १८३९७ श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.विनोद तावडे , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००५ पर्यंत धानखरेदी व वाहतूकीचे दर जिल्हास्तरावर ठरविण्यात येत होते, परंतु २००५-०६ पासून शासनाद्वारे गठीत केलेल्या समितीने मंजूर केलेले दर एफ.सी.आय.च्या सहमतीने सन २००७-०८ पर्यंत निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८-०९ व २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता यापूर्वी निश्चित केलेल्या वाहतूक दराएवढे वाहतूक दर देण्यासंबंधीचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीने मंजूर केला असून सदर प्रस्तावास एफ.सी.आय. ने सहमती प्रदान केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसेंदिवस पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वृध्दी होत असल्यामुळे विदर्भातील धान उत्पादक जिल्ह्यातील सर्व राईस मिलर्सतर्फे समितीने शिफारस केलेल्या पूर्वीच्या दरापेक्षा अधिक दर मिळण्याची मागणी शासनाकडे वारंवार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, समितीने शिफारस केलेल्या पुर्वीच्या वाहतूक दरापेक्षा जास्त दर निश्चित करण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे तसेच किती कालावधीत वाहतूक दर निश्चित करण्यात येईल ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) भारतीय अन्न महामंडळ, अभिकर्ता संस्था यांच्या अधिकाऱ्यांसमावेत शासनस्तरावर आयोजित केलेल्या संयुक्त बैठकीतील निर्णयानुसार भारतीय अन्न महामंडळाच्या मान्यतेने धान व सीएमआर (तांदूळ) वाहतूकीकरीता हंगाम २००५-०६ ते २००७-०८ पर्यंत वाहतूक दर निश्चित करण्यात आले आहेत.

(२) हंगाम २००८-०९ व २००९-१० करीता धान व सीएमआर (तांदूळ) वाहतूकीकरिता भारतीय अन्न महामंडळ व अभिकर्ता संस्था यांच्या अधिकाऱ्यासमावेत शासनस्तरावर आयोजित बैठकीतील चर्चेनुसार गत हंगामाप्रमाणेच वाहतूक दरास मान्यता देण्यबाबतचा प्रस्ताव भारतीय अन्न महामंडळाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र सदर प्रस्तावास भारतीय अन्न महामंडळाने मान्यता दिलेली नाही.

(३) होय.

(४) किमान आधारभूत किंमत खरेदी योजना केंद्र शासनाची योजना आहे. सबब वाहतूक दर निश्चितीबाबत अंतिम मान्यता केंद्र शासन तथा भारतीय अन्न महामंडळ यांच्याकडून देण्यात येते.

हंगाम २००८-०९ व २००९-१० करीता धान व सीएमआर साठी वाहतूकीचे दर पूर्वीच्या हंगामाकरीता (२००५-०६ ते २००७-०८) मंजूर केलेल्या दराप्रमाणे मंजूर करण्याबाबत दिनांक ३१ मे, २०११ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, हा राईस मिल असोसिएशन किंवा व्यापाऱ्यांचा प्रश्न असला तरी थेट शेतकऱ्यांशी संबंधित आहे. मी यापूर्वी लक्षवेधी सूचना, नियम ९३ ची सूचना, तारांकित प्रश्न आदी विविध आयुधांचा वापर करुन सभागृहात हा विषय उपस्थित केलेला होता.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/

११:१५

ता.प्र.क्र.१८३९७....                    श्री.केशवराव मानकर.....

परंतु या विषयाला आजपर्यंत न्याय मिळालेला नाही.  याचा थेट परिणाम असा झाला की, गडचिरोली जिल्हयातील शेतकऱ्यांच्या धानाला रब्बी हंगामात ७५० ते ८०० रुपये व गोंदिया, भंडारा आणि नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना ८५० ते ९०० रुपयांपेक्षा जास्त भाव मिळालेला नाही. सभापती महोदय, आमचे भाग्य आहे की, माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख हे आमच्या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत.  या विषयाची त्यांना पूर्ण माहिती आहे.  वारंवार हा विषय सभागृहात उपस्थित होऊनही अद्याप प्रलंबित असल्यामुळे मी आपले या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो.  मंत्री महोदयांनी शासनाला आदेश दिले होते की, धान खरेदी केंद्रे सुरु करावीत.  परंतु अद्याप धान खरेदी केंद्रे सुरु झालेली नाहीत.  नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये देखील हा विषय चर्चेला आला होता. शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहेत, या नुकसानीला कोण जबाबदार आहे? शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय? दरवर्षी इंधन दरामध्ये वाढ होत असते.  त्यामुळे दर वाढवून मिळण्याबद्दल केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. केंद्र सरकारकडून कोणतीही मदत दिली जात नाही.  राज्य शासनाने राज्य स्तरावर निर्णय घेऊन १० टक्के दरवाढ केली पाहिजे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18397........ श्री. केशवराव मानकर.....

4.85 कोटी एवढी रक्कम शासनाने खर्च केली तर हा प्रश्न सुटू शकतो. यापूर्वी सुध्दा राज्य शासनाने जो अतिरिक्त 400 कोटीचा माल उचलला त्यातील 100 कोटीचा माल आजही उघड्यावर पडलेला आहे. या वाहतुकीच्या संदर्भात शासनाने केंद्राकडे प्रस्ताव पाठविला असल्याचे सांगितले पण त्या प्रस्तावाला मान्यता न मिळण्याचे कारण काय, तसेच जो 100 कोटीचा माल आजही उघड्यावर पडलेला आहे त्या मालाच्या बाबतीत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, तिसरा प्रश्न म्हणजे जर शासनाच्या म्हणण्याप्रमाणे राईस मिल असोशिएशनचे व्यापारी शासनाचे ऐकत नसतील तर त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. अनिल देशमुख : महोदय, किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून महाराष्ट्र शासन केंद्राचा एक एजंट म्हणून मार्केटिंग फेडरेशन आणि ट्रायबल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या माध्यमातून धानाची खरेदी करते. राज्यात ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये धानाचे उत्पादन होते किंवा धानाचे मिलिंग होते त्यात विदर्भातील काही जिल्हे व कोकणातील चार जिल्ह्यांचा समावेश आहे. राज्यातील गोंदिया जिल्हा सोडला तर इतर जिल्ह्यात वाहतुकीच्या दराबाबत कोणतीच अडचण नाही, ती फक्त गोंदिया जिल्ह्याचीच अडचण आहे. वाहतुकीचे दर अजून निश्चित झालेले नाहीत. तसेच याबाबत केंद्र शासनाचे काही नियम ठरलेले आहेत. केंद्राकडून एफसीआयच्या माध्यमातून संपूर्ण भारतासाठी वाहतुकीचे दर ठरविण्यात आलेले आहेत पण गोंदिया जिल्ह्यातील राईस मिलर्सनाच हे दर का मान्य नाही हे समजत नाही. चंद्रपूर, भंडारा, नागपूर, गडचिरोली या जिल्ह्यांना तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि ठाणे जिल्ह्याला सुध्दा हे दर मान्य आहेत फक्त गोंदिया जिल्ह्यालाच मान्य नाहीत. यासंदर्भात मी स्वत: गोंदिया जिल्ह्यातील व्यापाऱ्यांसोबत पाच-सहा वेळा बैठका घेतल्या आहेत. त्या बैठकीसाठी एफसीआयच्या अधिकाऱ्यांनाही पाचारण करण्यात आले होते, याची जाणीव सर्व मिलर्सना आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे सुध्दा विनंती करण्यात आली आहे की, जर गोंदिया जिल्ह्यासाठी वाहतुकमीचे दर ठरवून देऊ शकत असाल तर ते लवकरात लवकर ठरवावे व याचा फॉलो-अप देखील शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. तरी देखील जर गोंदिया जिल्ह्यातील मिलर्सनी ऐकले नाही तर त्यांच्या मिल्स ताब्यात घेण्यात येतील.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18397........

श्रीमती शोभाताई फडणवीस : महोदय, या प्रश्नाला दिलेल्या उत्तरातच गोंधळ आहे. क्र. 2 च्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, "हंगाम 2008-09 व 2009-10 करीता धान व सीएमआर (तांदूळ) वाहतूकीकरीता भारतीय अन्न महामंडळ व अभिकर्ता संस्था यांच्या अधिकाऱ्यासमावेत शासनस्तरावर आयोजित बैठकीतील चर्चेनुसार गत हंगामाप्रमाणेच वाहतूक दरास मान्यता देण्यबाबतचा प्रस्ताव भारतीय अन्न महामंडळाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र सदर प्रस्तावास भारतीय अन्न महामंडळाने मान्यता दिलेली नाही."

त्यानंतर क्र.4 च्या उत्तरात असे म्हटले आहे की, "हंगाम 2008-09 व 2009-10 करीता धान व सीएमआर साठी वाहतूकीचे दर पूर्वीच्या हंगामाकरीता (2005-06 ते 2007-08) मंजूर केलेल्या दराप्रमाणे मंजूर करण्याबाबत दिनांक 31 मे, 2011 च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल." या अनुषंगाने माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सुमारे 5 वेळा डिझेलच्या दरात जवळपास 10 रुपयापर्यंतची वाढ गेल्या दोन वर्षात झालेली आहे. असे असताना सुध्दा वाहतुकीच्या दरात वाढ करण्यामध्ये शासन अडचणी का निर्माण करीत आहे ? यापूर्वी सन 2005 पर्यंत राज्य शासनाच्याच स्तरावर हे वाहतुकीचे दर वाढविण्याबाबतचा निर्णय घेतला जात होता पण 2005 नंतर मात्र हा विषय केंद्र शासनाकडे देण्यात आला असे आपण सांगत आहात. मग वाढलेले दर हे सर्वच ठिकाणी वाढलेले आहेत आणि प्रत्येक ठिकाणी अंतर वाढते तसे भावही वाढत असतात, यादृष्टीने शासन विचार करणार आहे काय ? तसेच सन 2008-09, 2009-10 आणि 2010-11 चे वाढीव दर शासन देणार आहे काय, त्याचबरोबर गोंदिया जिल्ह्यात सर्वात जास्त धानाची खरेदी होते व सर्वात जास्त राईस मिलिंग होत आहे. आमच्या चंद्रपूर भागातून गोंदिया जिल्ह्यात धान जातच नसल्याने वाहतुकीचा प्रश्नच येत नाही. गोंदिया जिल्ह्यात सर्वात जास्त धानाची कोठारे आहेत, म्हणून या जिल्ह्यासाठी वाहतूक दर वाढविण्याबाबत शासन विचार करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .........

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.18397...

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन 2005-2006, 2006-2007, 2007-2008 याचा प्रश्न नाही. सन 2008 ते 2011 पर्यंतचा प्रश्न आहे. या तीन वर्षाचे भाव फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे आहे, पण ते गोंदिया जिल्ह्याला मान्य नाही. धान नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यात होतो. भंडारा जिल्ह्यात मिलिंग होते, पण गोंदिया जिल्ह्यामध्ये मिलिंग होत नाही याची कल्पना सन्माननीय सदस्यांना असेल. गोंदिया जिल्ह्यातील सर्व मिलर्स एकत्रित येऊन त्यांनी जो पर्यंत भाव वाढवून मिळणार नाही तो पर्यंत मिलिंग करणार नाही अशी भूमिका घेतली आहे. फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे म्हणणे आहे की, आम्ही नियमा नुसार भाव वाढ केली असून ती सर्व राज्यांना मान्य आहे. त्यामुळे फक्त गोंदिया या एका जिल्ह्यासाठी आम्ही जास्त भाव वाढ का द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे. आम्ही डिझेलचे भाव वाढले आहेत त्यामुळे भाव वाढ देण्यात यावी अशा प्रकारचे ऑर्ग्युमेंट देखील आम्ही राज्याच्या वतीने फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडे केले. त्यांचे असे म्हणणे आहे की, एका जिल्ह्याला भाव वाढ दिली तर अन्य राज्यांना देखील भाव वाढवून द्यावे लागतील. फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी नियमाला धरूनच दर ठरविलेले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील मिलर्सनी जर मिलिंग सुरू केले नाही तर राज्य शासन त्यांच्या मिल ताब्यात घेऊन मिलिंग सुरू करेल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाला पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित करावयाचा नसतो.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, गेल्या हंगामामध्ये जे वाहतुकीचे दर होते तोच प्रस्ताव आपण महामंडळाकडे पाठविलेला आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, मागच्या वर्षीच्या हंगामामध्ये दर किती होते ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, 3 वर्षापासून दर ठरलेले आहेत. पहिल्या टप्प्यासाठीचा दर रूपये 11.60 पैसे आहे, तर दुसऱ्या टप्प्यासाठीचा दर रूपये 12.60 पैसे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18397...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, देशातील अन्य राज्यांमध्ये यावर पर्याय काढलेला आहे. आधारभूत किंमती पेक्षा 100 रूपये जास्त भाव कर्नाटक, गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यांनी दिलेला आहे. तसे धोरण राज्य शासन ठरवेल काय ? या राज्यात किती क्विंटल धान हे गोदामाच्या बाहेर आहे व त्या बाबत वेअर हाऊस बांधण्यासाठी शासन कायमस्वरूपी धोरण ठरविल काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, हा वाहतुकीचा प्रश्न आहे. बाकी राज्यांनी केंद्र शासनाने जी आधारभूत किंमत दिली होती त्यात वाढ दिलेली आहे. बाकी राज्यांनी वाहतुकीच्या दरामध्ये कुठेही वाढ केलेली नाही. महाराष्ट्रातील गोंदिया, भंडारा जिल्ह्यामध्ये जवळपास 3 लाख मेट्रीक टन धान आहे. तो व्यवस्थितपणे गोदामामध्ये आहे. जेथे गोदामामध्ये जागा नाही तेथे तो बाहेर ताडपत्रीच्या आच्छादनामध्ये झाकून ठेवला असून तो धान कोणत्याही प्रकारे खराब होत नाही. गोदामाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर व्हावी असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. यासाठी केंद्र शासनाने धोरण जाहीर केले आहे. जो कोणी प्रायव्हेट इंटरप्रेन्यूअर गोदाम बांधून देईल त्याचे गोदाम दहा वर्षासाठी भाड्याने घेण्यात येईल. अशा प्रकारची योजना केंद्र शासनाने तयार केलेली आहे. जवळ जवळ साडेसात लाख मेट्रीक टन क्षमतेचे गोदाम त्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये बांधले जाणार आहे. सदर योजना अंतिम टप्प्यामध्ये आहे. ती मंजूर झाल्यानंतर त्याचे काम लवकरात लवकर सुरू होईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वाहतुकीचे दर वाढविण्यामध्ये दिरंगाई होत आहे. दिवसेंदिवस डिझेलची दर वाढ होत आहे. ज्या प्रमाणात डिझेलचे दर वाढतात त्या प्रमाणात कुठल्याही प्रकारे वाहतुकीचे दर वाढविण्यात आलेले नाहीत. आपण केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवितो. आपण सांगितले की, हा गोंदिया जिल्ह्याचा प्रश्न आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, वाहतुकीचे दर कधी ठरलेले आहेत, डिझेलची दर वाढ किती वेळा झालेली आहे, डिझेलच्या दर वाढीच्या प्रमाणात वाहतुकीची दर वाढ झाली आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया कडून दर वर्षी डिझेलची दर वाढ पाहून धानाच्या वाहतुकीचे भाव ठरविले जातात.

.....

यानंतर सरफरे....

**मुंबईतील विलेपार्ले (पू) येथील झोपडपट्टी पुनर्विकास**

**प्रकल्पाच्या कामाच्या सद्य:स्थितीबाबत**

**(3) * 17864 डॉ.दिपक सावंत , श्री.दिवाकर रावते** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील विलेपार्ले (पू) येथील तवसाळकर चाळ, ऑफ शहाजी राजे मार्ग, शिवसेना शाखेमागे झ ोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचे काम मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या ठिकाणी पात्र व अपात्र झोपडपट्टीधारकांची यादी तयार करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, वरील पैकी किती पात्र झोपडपट्टी धारकांना ट्रान्झिट कँपमध्ये पर्यायी जागा देण्यात आलेल्या आहेत,

(4) तसेच सदर प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व हा प्रकल्प केव्हा पूर्ण होणार आहे ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) सदर योजनेमध्ये विकासकाने ट्रॅन्झिट कॅम्प बांधण्यासाठी परवानगी मागितलेली नाही. सदर योजनेतील पात्र झोपडीधारकांना विकासकाने पर्यायी जागेकरिता भाडे स्वरुपात रक्कम देऊन स्थलांतर केले आहे.

(4) दोन इमारतींपैकी 1 संयुक्त इमारत बांधून तयार असून दुसऱ्या विक्री इमारतीचे आराखडे मंजूर करण्यात आले आहेत. संयुक्त इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देणेकामी छाननी प्रगतीपथावर आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विलेपार्ले (पूर्व) या विभागातील या प्रश्नाच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचनेच्या माध्यमातून यापूर्वी देखील चर्चा करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सन्माननीय राज्यमंत्री श्री. सचिन अहिर साहेबांकडे हिअरींगसुध्दा झाली आहेत. त्याचप्रमाणे कॉग्रेस पक्षाचे स्थानिक आमदार श्री. कृष्णा हेगडे यांनी सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते तरीदेखील या प्रश्नाच्या सोडवणुकीबाबत काहीही निर्णय झालेला नाही. मी या ठिकाणी सरळ प्रश्न विचारला होता तो असा की, "वरील



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17864...

डॉ. दीपक सावंत...

पैकी किती पात्र झोपडपट्टी धारकांना ट्रँझिट कँपमध्ये पर्यायी जागा देण्यात आलेल्या आहेत"? त्याला असे उत्तर देण्यात आले आहे की, "सदर योजनेमध्ये विकासकाने ट्रँझिट कॅम्प बांधण्यासाठी परवानगी मागितलेली नाही". आज त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, जवळ जवळ 13 लोकांना कोणतेही भाडे न देता त्यांच्या झोपडया तोडून ऐन पावसाळयामध्ये त्यांना रस्त्यावर ठेवले आहे. ज्यावेळी हे लोक त्यांच्याकडे गेले त्यावेळी त्यांचे सामान सेलच्या इमारतीमध्ये सील करण्यात आले आहे. यामध्ये निष्कासन अधिकारी (अतिक्रमण) यांच्या संगनमताने हे सर्व झाले आहे. कोर्टामध्ये केस दाखल केल्यानंतर म्हाडाने त्यांच्या झोपडया तोडलेल्या नाहीत असे कोर्टाने सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, यामध्ये एकूण किती पात्र झोपडीधारक होते आणि किती लोकांना अपात्र ठरविण्यात आले, आणि किती लोकांनी भाडयापोटी पैसे घेतले आहेत?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, एकूण 91 झोपडपट्टीधारक त्या योजनेमध्ये समाविष्ट होते. पात्रतेच्या अनेक्सर 2 नुसार प्राप्त झालेली एकूण संख्या 60 असून संबंधित विकासकांना 45 लोकांनी म्हणजे 70 टक्क्यापेक्षा जास्त लोकांनी संमती पत्र दिल्यानंतर योजनेला मान्यता देण्याचे काम करण्यात आले आहे. अशाप्रकारे आज आपल्याकडे 60 पात्र स्ट्रक्चर आहेत आणि इतर अपात्र लोक आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नासंदर्भात सांगू इच्छितो की, त्या लोकांवर कायद्यामधील तरतुदींचे पालन करुन कारवाई केली आहे. त्यामध्ये श्री. नाथू भिकू पटेल अशी अनेक नावे आपल्याला घेता येतील. यामध्ये कलम 31 (38) प्रमाणे त्यांना नोटिस देऊन सुनावणी घेऊन त्यांच्यावर कारवाई केली आहे. सन्माननीय सदस्यांनी मान्य केल्याप्रमाणे हे संपूर्ण प्रकरण त्या व्यक्तिपुरते न्यायप्रविष्ठ आहे. त्यांच्या पात्रतेच्या बाबतीत जो निर्णय असेल तोच पात्र-अपात्र ठरविण्याबाबत घेतला जाईल. कायद्यातील तरतुदीनुसार शासनाची सुस्पष्ट भूमिका आहे की,जे पात्र लोक आहेत त्यांना पर्यायी ट्रँझिट कँप किंवा भाडे देणे या गोष्टी विकासक किंवा त्या योजनेच्या माध्यमातून होत असतात. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे व त्यामध्ये पात्र असलेल्या लोकांना विकासकाकडून भाडे दिले गेले नसेल तर संबधित विकासकांना जाब विचारुन त्यांना योग्य ते भाडे मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17864...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्याकडे माहितीच्या अधिकाराखाली शासनाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार 58 झोपडया दाखविण्यात आल्या आहेत त्यामध्ये पात्र 45 आहेत व 13 अपात्र आहेत. मंत्रीमहोदयांनी दिलेली आकडेवारी यापेक्षा जास्त आहे. जे लोक त्या ठिकाणी रहात नाहीत अशा अनेक अपात्र लोकांना पात्र करुन घेण्यात आले आहे. याचे उदाहरण मी आपल्याला देतो. या योजनेचे प्रमोटर डॉ. देविदास राव यांच्याकडे 1995 पूर्वीचा कोणताही पुरावा नव्हता. त्याबाबत माननीय जिल्हाधिकाऱ्यांना मी पत्र दिले होते, त्याचे अजून उत्तर मिळाले नाही. माझा प्रश्न असा आहे की, या सर्व प्रकरणाची आपण वेगळया प्रकारे चौकशी करणार काय? या प्रकरणासाठी मी गेल्या दीड ते पावणे दोन वर्षापासून पाठपुरावा करीत आहे. या करिता श्री. झेंडे साहेबांना पत्र दिले त्याचे उत्तर मिळाले नाही. श्री. झेंडे साहेबांनी ते पत्र श्री. रोकडे साहेबांकडे फॉरवर्ड केले. श्री. रोकडे साहेबांचे पत्र आपल्या माहितीसाठी मी आपणास सादर करतो. या प्रकरणी आपण वेगळया प्रकारे चौकशी केली पाहिजे. तेव्हा त्यांचे सामान कां सील करण्यात आले, ते ताबडतोब रिलिज करुन त्या भाडेकरुंना तत्काळ देणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, त्या ठिक्र्णी 57 निवासी आणि 3 अनिवासी असे एकूण 60 लोक आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:35

ता.प्र.क्र.17864 . . . .

श्री.सचिन अहिर . . . .

म्हणून सन्माननीय सदस्यांनी आणि मी अगोदर सांगितल्याप्रमाणे 13 झोपडपट्टीधारक अपात्र आहेत.पण त्यांचे एका झोपडपट्टीधारकाबाबत स्पेसिफीक म्हणणे आहे की, ते अपात्र असतानाही त्यांना अयोग्य पध्दतीने पात्र ठरविण्यात आले असेल तर संबंधित व्यक्तीच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून किंवा ॲडिशनल कलेक्टर, एन्क्रोचमेंटच्या माध्यमातून चौकशी करण्याचे काम करु. दुसरी बाब सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केली की, संबंधितांचे सामान सील करण्यात आले आहे आणि ते चुकीचे आहे. जर असे घडले असेल तर सील उघडून संबंधित लोकांचे जे काही सामान आहे, ते संबंधित भाडेकरुंना देण्याची व्यवस्था केली जाईल.

-----

एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील अंधेरी येथील सिटी सर्व्हे नं.198 (पार्ट) गिल्बर्ट हिल,**
**येथे सुरु असलेल्या प्रकल्पाबाबत**

**(4) * 18693 श्री.रामदास कदम,श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक 13729 ला दिनांक 23 मार्च, 2011 रोजीच्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील अंधेरी, सिटी सर्व्हे नं.198 (पार्ट) गिल्बर्ट हिल, हा भूखंड धर्मादाय आयुक्तांनी व ट्रस्टींनी कोणत्याही निविदा न मागविता अत्यंत योजनाबध्द रितीने कायदे व नियम डावलून बाई कविनबाई आणि हंसराज मोरारजी चॅरीटेबल ट्रस्ट, शिक्षण संस्थेला राखीव असलेला भूखंड आरोग्य भारती हेल्थ पार्क प्रा.लि. या कंपनीला दिनांक 2 नोव्हेंबर, 1999 साली 5 करोड रुपयांना विकण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, काही अटी व शर्ती घालून हा भूखंड पर्यटन विकासाच्या धोरणाप्रमाणे विकसित करण्यास देण्यात आला होता, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, या विकासकाने त्या अटी व शर्तीचे पालन केले नसल्याची बाब निदर्शनास आली हेही खरे आहे काय,

(4) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(5) तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1)न्यासाच्या विश्वस्तांनी निविदा मागवून कार्यवाही केलेली आहे.

(2)प्रस्तुत प्रकरणी मंजूर विकास योजनेप्रमाणे संदर्भाधीन जमिनीवर (1)हॉस्पिटल, (2)स्पोर्टस ॲकेडमी, (3) खेळाचे मैदान ही स्वतंत्र आरक्षणे आहेत. खेळाचे मैदानासाठी आरक्षित असलेली जागा शासनाकडील दिनांक 13/7/2004 च्या अधिसूचनाप्रमाणे पर्यटन विकास पट्टयामध्ये मुळ उद्देश कायम ठेवून समाविष्ट झालेली आहे. त्यामध्ये काही आटी /शर्तीनुसार पर्यटन विकास वापर अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

(3) सद्य:स्थितीत अद्यापि तशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(4)प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या निविदा आल्या, त्या एकंदर किती आल्या ? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, या निविदा कोणाकोणाच्या होत्या आणि तिसरा प्रश्न असा आहे की, या निविदा किती किंमतीच्या होत्या ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याबाबतीत आज माझ्याकडे जी माहिती आहे ती एवढीच आहे की, इंडियन एक्सप्रेस मध्ये याबाबत जाहिरात देण्यात आली होती आणि त्या माध्यमातून निविदा मागविण्यात आल्या होत्या. मात्र सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, एकूण किती निविदा आल्या होत्या ? त्याबाबतची आता माझ्याकडे माहिती नाही.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी सदरहू माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18693 . . . .

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सदरहू माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

----

. . . .एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मुंबईतील मिठी नदीच्या प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेले रुंदीकरण आणि**

**खोलीकरणाचे काम तसेच अतिक्रमण व प्रदूषण दूर करण्याबाबत**

**(5) * 18558 श्री.किरण पावसकर , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले, श्रीमती उषाताई दराडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.विजय सावंत , श्री.हुसेन दलवाई , श्री.राजन तेली , श्री.उल्हास पवार , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.दिवाकर रावते , डॉ.दिपक सावंत :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील मिठी नदीच्या प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेले रुंदीकरण आणि खोलीकरणाचे काम तसेच अतिक्रमण व प्रदूषण दूर करण्यासाठी सुमारे 1600 कोटी रुपयांचा खर्च होऊनही सदर कामे चांगल्या प्रकारे होत नसल्याबाबतची माहिती एका पहाणीत दिनांक 18 मे, 2011 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच मिठी नदीच्या पात्रातील गाळ काढण्याचे काम मुंबई महानगरपालिका व एम.एम.आर.डी.ए.यांना विभागून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मिठी नदीच्या पात्राचे रुंदीकरण आणि खोलीकरण व पात्रातील गाळ काढण्याच्या कामाला गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) होय, हे खरे आहे.

(3), (4) व (5) प्रश्न उद्‌भवत नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत खोलीकरणाचे व रुंदीकरणाचे काम मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या मंजूर आराखडयाप्रमाणे जवळपास पूर्ण झालेले आहे. शासनामार्फत उर्वरित कामे जलद गतीने पूर्ण करावयासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय,मुंबईतील मिठी नदी प्रकल्पाच्या संबंधातील हा प्रश्न आहे. मिठी नदी ही विहार तलावापासून उगम पावते आणि 18 कि.मी.इतका प्रवास करुन माहीम कॉजवेपर्यंत आलेली आहे. याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरावरुन 1600 कोटी रुपयांचा जो खर्च करावयाचा होता, तो खर्च झालेला नाही असे दिसत आहे. पण आतापर्यंत वेगवेगळया समित्यांच्या अहवालाच्या माध्यमातून आलेल्या माहितीनुसार एमएमआरडीए ने यासाठी 300 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. महानगरपालिकेने 600 कोटी रुपये खर्च केले आहेत आणि विमानतळ विकासासाठी मिहानने आतापर्यंत 150 कोटी रुपये खर्च केल्याचे वेगवेगळया अहवालामध्ये आलेला आहे.तरी देखील अजूनपर्यंत या नदीला नदीचे स्वरुप आलेले नाही तर तो अजून कालवाच आहे.यासाठी ऑब्झर्व्हर ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन, मुंबई या संस्थेने एक अहवाल प्रकाशित केला होता. त्या अहवालाच्या प्रकाशनाच्या वेळी मुंबईतील सर्व मान्यवर उपस्थित होते. त्या अहवालामध्ये



ता.प्र.क्र.18588 . . . .

श्री.किरण पावसकर . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21 सूचना केलेल्या होत्या. पण त्याकडे एमएमआरडीएने आणि मुंबई महानगरपालिकेने देखील लक्ष दिलेले नाही. दरवर्षी या मिठी नदीमधील गाळ काढण्याच्या कामासाठीच आपण खर्च करीत आहोत. अशा वेळी मिठी नदीला खऱ्या अर्थाने नदीचे स्वरुप मिळण्यासाठी ठोस कारवाई केली जाणार आहे काय? तसेच सदरहू काम एमएमआरडीए करीत आहे, महानगरपालिका करीत आहे अशा प्रकारे एकमेकांकडे बोट न दाखविता सदरहू काम पूर्ण होण्यासाठी किती काळ लागणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मिठी नदी एकंदर 17.84 कि.मी.लांबीची आहे. त्यातील 11.84 कि.मी.चा जो भाग आहे, त्याची खोली वाढविणे, रुंदीकरण करणे, त्यातील गाळ काढणे आणि काही ठिकाणी खडक आहेत ते फोडण्याचे काम देखील मुंबई महानगरपालिका करीत आहे आणि पहिल्या फेजमध्ये पुढच्या 6 कि.मी. मध्ये एमएमआरडीए काम करीत आहे. दुसऱ्या फेजबाबत मला सांगितले पाहिजे की, दुसरा टप्प्यामध्ये वाकोला नदीच्या ठिकाणी 3.8 कि.मी.मध्ये सांताक्रुज ते वाकोला पूल हा जो भाग आहे. यातील 1.8 कि.मी.भाग मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीमध्ये असल्याने त्यांच्याकडून काम करण्यात येत आहे आणि 2 कि.मी.चे काम एमएमआरडीए करीत आहे. तसेच याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी विमानतळाबाबत उल्लेख केला. तेथील एअरस्ट्रीप खालून मिठी नदी जाते, तो परिसर जवळजवळ 2 कि.मी.इतका आहे आणि येथील काम विमानतळाच्या एजन्सीकडून करुन घेण्यात येत आहे. साधारणपणे सदरहू काम मे 2012 पर्यंत पूर्ण होईल.

श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18558....

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, शासना मार्फत उर्वरित कामे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. माझा प्रश्न असा आहे की, मिठी नदीतील गाळ संपूर्णपणे काढलेला आहे काय ?माझा दुसरा उप प्रश्न आहे की, राज्यातील तलावांतील गाळ काढण्या संदर्भात एक बैठक झाली होती. तेव्हा तलावांतील गाळ काढण्या संदर्भात शासनाने आराखडा तयार केलेला आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम 2006 मध्ये सुरु झाले. त्यास तीन वर्षे पूर्ण झाली. पहिल्या टप्प्यातील गाळ काढण्यात आलेला आहे. पुन्हा 3 वर्षा नंतर गाळ काढण्यासाठी 30 कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 26 जुलै 2005 रोजी मुंबईत झालेल्या धुवॉधार पावसामुळे सर्वत्र हाहा:कार उडला होता, हे आपणा सर्वांना माहीत आहे. त्यावेळी प्रामुख्याने मिठी नदीचा प्रश्न ऐरणीवर आला. या संदर्भात माननीय पंतप्रधानांनी 1200 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्यावेळी विद्यमान माननीय मुख्यमंत्री, माननीय पंतप्रधानांच्या कार्यालयाचे काम पाहत होते. माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या पॅकेजपैकी किती निधी मिळाला हे त्यांना माहीत असेल. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी हा निधी जेएनएनयुराएम मधून देता येत नसेल तर अन्य मार्गाने द्यावा अशी मागणी केली होती. या संदर्भातील वस्तुस्थिती आपणास माहीत आहे. मिठी नदीचे नाल्यात रुपांतर न होणे ही सर्वात महत्वाची बाब आहे.

मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम सुरु आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी आम्ही दिनांक 30 मे रोजी प्रत्यक्ष गेलो होतो. मिठी नदीतील गाळ काढला जातो परंतु तो नदीच्या तीरावर ठेवला जातो. यावेळी महानगरपालिकने 15 मे नंतर निविदा काढली. मिठी नदीतील गाळ काढला तरी तो नदीच्या तीरावर ठेवल्यामुळे तो पुन्हा नदीच्या पात्रात जातो. दर वर्षी गाळ काढला जातो परंतु तो तीरावर ठेवल्यामुळे पुन्हा नदीच्या पात्रात जात आहे. आम्ही या संदर्भातील फोटो काढलेले आहेत. चॅनेलवर सुध्दा हे दाखविण्यात आलेले आहे. मुंबई महानगरपालिकेला आणि एमएमआरडीएला कामे करताना काही अडचणी येतात. मॅनग्रोव्हज ही मोठी अडचण ठरली आहे. त्यासाठी वन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18558....

श्री.विनोद तावडे.....

विभागाची, पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागते. वाल्मिकी नगर, महाराष्ट्र नगर आणि परिक खाडी येथील अतिक्रमणा संदर्भात शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे. त्याशिवाय पुढे जाता येत नाही. याबाबत शासनाने निर्णय घेतला काय ? टॅक्समेंट कॉलनी येथे जमीन भूसंपादन करावयाचे आहे, ते काम झालेले नाही. टीचर्स कॉलनी येथून मिठी नदीकडे जाण्यास ॲक्सेस मिळत नाही. त्या संदर्भात शासनाने कोणते धोरण स्वीकारले आहे ? वाडिया ट्रस्टची कोर्ट केस सुरु आहे. त्या संदर्भातील निर्णयास किती वर्ष लागतील, या सर्व प्रश्नांच्या संदर्भात शासनाने कोणते निर्णय घेतलेले आहेत ? मिठी नदीच्या ठिकाणी तेल माफियांनी पुन्हा अतिक्रमण केलेले आहे. त्याठिकाणी भंगारवाले आणि गॅरेजवाल्यांनी केलेले अतिक्रमण उठविण्यात आले होते. परंतु त्यांनी पुन्हा तेथे अतिक्रमण केलेले आहे. ही अतिक्रमणे पुन्हा झाल्यामुळे त्याची जबाबदारी कोणावर निश्चित करुन संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये सन्माननीय सदस्यांच्या पक्षाची सत्ता आहे. असे असताना सुध्दा ते या प्रश्ना बाबत इतक्या गंभीरतेने बोलतात त्याअर्थी शासनाने सुध्दा हा विषय गंभीरतेने घेतला पाहिजे, या मध्ये दुमत असण्याचे कारण नाही... (अडथळा)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी ॲकेडमिक विषय मांडलेला आहे. मी माननीय मंत्री महोदयांना आपल्या मार्फत सांगू इच्छितो की, कृपया आपण राजकारण करु नका. मी सुध्दा राजकारण करु शकतो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे कौतुक करीत आहे. ते या प्रश्नावर किती गंभीर आहेत हे मी सांगितले. मिठी नदीतील गाळ काढल्यानंतर तो नदीच्या तीरावर ठेवल्यामुळे पावसाळ्यामुळे तो गाळ पुन्हा नदीच्या पात्रात जातो, ही बाब अत्यंत गंभीर आहे.

यानंतर कु.थोरात..

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SMT/ KTG/ KGS/ प्रथम श्री. शिगम.... 11:45

ता.प्र.क्र.18558....

श्री. भास्कर जाधव....

त्यामुळे या संदर्भामध्ये सचिव दर्जाचे अधिकारी नेमून पुन्हा एकदा चुकीच्या पध्दतीने टेंडर काढण्यात आले आहे काय, काढण्यात आलेला गाळ पुन्हा या नदीमध्ये घालविण्याचा महानगरपालिकेकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो काय आणि पुन्हा त्याचे टेंडर काढून कॉन्ट्रॅक्टरला मदत केली जाते काय याची चौकशी केली जाईल.

श्री. विनोद तावडे : एमएमआरडीएने काढलेल्या गाळा संबंधीची चौकशी करण्यात येईल काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, एमएमआरडीए मिठी नदीच्या किनाऱ्यावर गाळ टाकत नाही हे शंभर टक्के खरे असले तरी त्यांचीही चौकशी करण्यात येईल. या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी चिंता करण्याचे काही कारण नाही. एमएमआरडीए त्यांच्या प्लॉटवर गाळ नेऊन टाकते याची शासनाने खात्री केलेली आहे.

श्री. विनोद तावडे : मंत्री महोदयांनी सरकार म्हणून जबाबदारीने उत्तर द्यावे.

श्री. भास्कर जाधव : एमएमआरडीएचीही चौकशी केली जाईल असे मी सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी उपस्थित केलेला मुद्दा मी नाकारला नाही. पण मी माझी माहिती या ठिकाणी दिलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही अडचणी सांगितलेल्या आहेत. त्या ठिकाणी तिवरांची झाडे आहेत. ही मिठी नदी ज्या ठिकाणी समुद्राला मिळते तेथे तिवराची झाडे असल्यामुळे त्या ठिकाणी वन विभागाची एन.ओ.सी.मिळणे किंवा वेगवेगळया प्रकारच्या ज्या अडचणी सांगण्यात आलेल्या आहेत त्या अडचणी जवळ जवळ दूर झालेल्या आहेत आणि मिठी नदीचे काम 83 टक्के पूर्ण झालेले आहे मे, 2012 पर्यंत मिठी नदीचे काम पूर्ण होईल. ब्रिमस्टोवॅड या स्कीम करिता केंद्र सरकारने एकमुखी 1200 कोटी रुपये देण्याचे कबूल केले होते, त्यातील गत वर्षा पर्यंत 1000 कोटी रुपये केंद्र सरकारने दिलेले आहेत. त्यातून 6 पंपिंग स्टेशन्स तयार करावयाचे होते ते तयार केलेले आहेत. या संदर्भात केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका सातत्याने घेतलेली आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कोटयवधी रुपये खर्च होऊन आजही मिठी नदी स्वच्छ झाल्याचे आपले सर्वांचे समाधान होत नाही. एमएमआरडीए चे कमिशनरही असे म्हणतात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18558....

की, माझे समाधान झालेले नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जे काम महानगरपालिका करते, जे काम एमएमआरडीए करते ते काम त्यांनी कुठल्या दरात दिले गेले, त्यांना किती वाढीव दर देण्यात आले आणि शेवटी ज्यावेळी बिल फायनल करण्यात आले त्यावेळी काय दर देण्यात आले याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी थोडया वेळापूर्वीच संगितले की, या कामाच्या एका टप्प्यातील काही पार्ट एमएमआरडीए करीत आहे तर एक टप्पा मुंबई महानगरपालिकेच्या वतीने केला जात आहे. एमएमआरडीएने या कामाच्या संदर्भात जेवढे टेंडर्स काढलेले आहेत ते कुठल्याही वाढीव दराने काढण्यात आलेले नाहीत, अशी माझी माहिती आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेने पाच ठेकेदारांना टेंडर्स दिलेले आहेत. त्यापैकी मेसर्स युनिटी एस.एन.बी. जे. व्ही. यांना 35.60 टक्के वाढीव दराने टेंडर देण्यात आले आहे. या कामाचा मूळ खर्च 52 कोटी 16 लाख रुपये दाखविण्यात आला होता. त्यानंतर 75 कोटी 39 लाख रुपयाचे सुधरित कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले. त्यानंतर पुन्हा 127 कोटी 85 लाख रुपयाचे सुधारित टेंडर काढण्यात आले आणि शेवटी या कामाचे 145 कोटी 11 लाख रुपयाचे फायनल बिल करण्यात आले. म्हणजे साधारणपणे एका ठेकेदाराला तिप्पट रक्कम मुंबई महानगरपालिकेने दिली आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात. )

सभापती महोदच, दुसरे टेंडर 35.6 लाख रुपयाचे होते. सभापती महोदय, मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. आपण मला संरक्षण द्यावे.

**सभापती** : सन्माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकावयाचे असेल तर सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, दुसरे टेंडर मेसर्स रिलायन्स यांना देण्यात आले. त्यांचे मूळ टेंडर 62 कोटी 39 लाख रुपयाचे होते ते 35.6 टक्के इतक्या वाढीव दराने देण्यात आले आणि त्याचे ज्यावेळी फायनल बिल झाले त्यावेळी ते 108 कोटी 65 लाख रुपयांच्या वर गेले.

तिसरे टेंडर आर.पी.एस. इन्फ्रान्स्ट्रक्चर यांना देण्यात आले. त्यांचे मूळ टेंडर 72 कोटी रुपयांचे होते. ते 35.21 टक्के इतक्या वाढीव दराने देण्यात आले आणि याचे फायनल बिल 127 कोटी रुपयाच्यां वर गेले.

..3..



SMT/ KTG/ KGS/ 11:45

ता.प्र.क्र.18558....

श्री. भास्कर जाधव.....

चौथे टेंडर 41 कोटी 87 लाख रुपयाचे होते त्याचे फायनल बिल 44 कोटी 75 लाख रुपयांच्या वर गेले.

**सभापती** : मंत्री महोदयांनी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.भास्कर जाधव : ठीक आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18558.......

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या सभागृहामध्ये मिठी नदीचा प्रश्न यासाठी उपस्थित करण्यात आला आहे की, मुंबईमध्ये महाभयंकर प्रलय झाल्यानंतर या मिठी नदीच्या नावावर कचरा काढण्यासाठी, कचरा बाजूला करण्यासाठी, गाळ उपसण्यासाठी कोट्यवधी रुपये काढले जात आहेत. त्याचबरोबर मिठी नदीच्या तीरावर 7 हजार असे औद्योगिक युनिट्स आहेत की, ज्यांच्यामुळे मिटी नदीचे पाणी काळे झाले आहे. त्या ठिकाणी प्रदूषण आहे. आताच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना टेंडरच्या किमती सांगितल्या तसेच त्यामध्ये झालेल्या वाढी सांगितल्या. ते पाहिल्यानंतर एक गोष्ट लक्षात येईल की, मिठी नदीच्या प्रश्नाच्या संदर्भात 1975 पासून अहवाल सादर होत आहेत. 6 समित्या नेमल्या गेल्या. महत्वाचा प्रश्न असा आहे की, एमएमआरडीए ही संस्था कधी आली आणि कधी कार्यरत झाली ? महानगरपालिका केव्हा पासून काम करीत आहे ? लोकांचे कोट्यवधी रुपये घेऊन हे पैसे आपण गाळ काढण्यासाठीच वापरणार आहात काय ? या मिठी नदीला नदीचे स्वरुप मिळण्याचे जे काम समित्यांनी दिलेले आहे त्या बाबतीत शासन ठोस कार्यवाही करणार का ? मिठी नदीचा गाळ उपसण्याच्या संदर्भात महानगरपालिकेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची शासन चौकशी करणार आहे का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे राहिलेले आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मी देतो. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी या सगळ्याची चौकशी करण्याच्या संदर्भात प्रश्न विचारला. नगरविकास विभागाच्या सचिवांमार्फत याची चौकशी केली जाईल आणि त्यामध्ये या सगळ्या गोष्टी येतील. सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितले की, 2800 झोपड्या काढल्या, 1200 झोपड्या काढल्या. त्या ठिकाणी पुन्हा जर अशा पध्दतीने अनधिकृत बांधकामे होत असतील किंवा लोक राहात असतील तर ती जबाबदारी कोणाची ? ते बाजूला करण्याची जबाबदारी पूर्णपणे महानगरपालिकेची आहे. अशा पध्दतीने जर झोपड्या वाढत असतील तर त्या वाढू न देणे ही जबाबदारी पूर्णपणे महानगरपालिकेची आहे आणि त्यांना ती जबाबदारी टाळता येणार नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18558 .....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे आणि सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांचे मी अभिनंदन करीन. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या बाबतीत चौकशी करण्यात येईल. स्थायी समितीमध्ये दर वाढविण्याचा जो फेरप्रस्ताव आला त्यामध्ये काँग्रेस पक्षाचे गटनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. मला यामध्ये राजकारण करावयाचे नव्हते. माझ्याकडे कागदपत्रे आहेत. मी ही कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे पाठवतो. प्रशासनाने हा प्रस्ताव आणला. स्टँडींग कमिटीमध्ये जे अंडरस्टँडींग चालले आहे, त्यांनी तो प्रस्ताव दिलेला आहे. तो प्रस्ताव सत्ताधारी पक्षाने दिलेला नाही. आपण चौकशी करणार असाल तर नीट चौकशी करा. मी आपल्याकडे कागदपत्रे पाठवतो मग आपण त्या ठिकाणी उत्तर द्यावे. दुसरा प्रश्न असा की, ज्या झोपड्या आल्या त्या बाबत तेथील संबंधित वॉर्ड ऑफीसरवर कारवाई करणार का ? त्या वॉर्ड ऑफीसरला तेथील कोणत्या पक्षाच्या आमदाराने दबाव आणून त्या झोपड्या आणावयास लावल्या ? ते विधानसभेचे सदस्य आहेत. त्यांच्यावर कारवाई करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तेथील स्टँडींग कमिटीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक आहेत. आज आम्ही या ठिकाणी सरकारमध्ये बसलेलो आहोत. कोठेही जरा काही झाले तरी सत्ताधारी म्हणून आमच्याकडे बोट दाखवून सन्माननीय सदस्य टीका करतात. महानगरपालिकेमध्ये आता त्यांची सत्ता आहे. आमचे नाममात्र सदस्य असतील, ते बिचारे काय करणार ? ते मायनॉरिटीमध्ये आहेत. दुसरा जो प्रश्न आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या झोपड्या जर मुंबई महानगरपालिका...

श्री. विनोद तावडे : त्या ठिकाणी काँग्रेसचे गट नेते आहेत त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री. भास्कर जाधव : त्याची चौकशी होईल आणि चौकशीमध्ये दोषी असेल तर तुमच्यावरही कारवाई करणार आणि जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर सुध्दा कारवाई करणार.

-----

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ MMP/ AKN/ पूर्वी श्री.बरवड 11:55

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत झालेल्या भरतीत घोटाळा झाल्याने केलेल्या तक्रारींबाबत**

**(६) * १८०६४ श्री.जयवंतराव जाधव , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.धनंजय मुंडे , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत काही महिन्यांपूर्वी अन्न व औषधी प्रशासन विभागातील सहाय्यक आयुक्त तसेच गृहप्रमुख, आरोग्य उपसंचालक, प्रणाली विश्लेषक, पशुधन सहाय्यक आयुक्त व औषध निरीक्षक इत्यादी पदांच्या भरती प्रक्रियेदरम्यान मोठा घोटाळा झाल्याच्या मा.राज्यपाल, एमपीएससीचे अध्यक्ष, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ९ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अयोग्य उमेदवारांची भरती करून ज्यांची प्रमाणपत्रे बनावट होती अशांचीही नियुक्ती करण्यात आली असल्याचा आरोपही या तक्रारीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यामध्ये काय निदर्शनास आले आहे,

**प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केलेल्या चौकशी अंती याबाबतच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध पदांच्या परीक्षा घेण्यात येतात. काही महिन्यांपूर्वी सहाय्यक आयुक्त, गृहप्रमुख, आरोग्य उपसंचालक, प्रणाली विश्लेषक, पशुधन सहाय्यक आयुक्त व औषध निरीक्षक इत्यादी पदांची परीक्षा झाली होती. त्या संबंधी लोकसेवा आयोगावर आरोप करण्यात आलेले आहेत. त्यामुळे मी हा प्रश्न विचारलेला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर करण्यात आलेल्या आरोपात शासनाला तथ्य आढळले नाही असे उत्तर दिलेले आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, लोकसेवा आयोगावर आरोप केल्यानंतर त्याची चौकशी आयोगानेच करणे योग्य आहे काय ? माझ्याकडे या संदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या संबंधी मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली होती, त्यातील माहितीनुसार तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या भरतीमध्ये अपात्र उमेदवारांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत हे सिध्द होते. ही माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे, ती मंत्री महोदयांना सादर करतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ MMP/ AKN/

ता.प्र.क्र.18064.... श्री.जयवंतराव जाधव.....

महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर आरोप झालेले असताना त्याची चौकशी त्यांच्याच मार्फत करण्यात आली आहे हे योग्य आहे काय व आरोपात तथ्य नाही असे शासनाचे मत असेल तर माझ्याकडे असलेले पुरावे खोटे आहेत असे शासनाला म्हणावयाचे आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न 6 पदांच्या भरती प्रक्रियेशी निगडित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पध्दतीनुसार पदांची जाहिरात दिली जाते. पदांच्या संख्येच्या प्रमाणात किती उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवावयाचे हे ठरविण्याचा अधिकार त्यांनाच आहे. निकष ठरविताना उमेदवारांची संख्या विचारात घेतली जाते. त्यापैकी किती उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविणे सुलभ होईल या बाबतचे निकष ठरविले जातात. त्या निकषानुसार अर्जांची छाननी केली जाते. प्रश्नामध्ये नमूद केलेल्या 6 पदांची भरती करण्यात आली होती. त्यापैकी काही पदांसंबंधी तक्रार करण्यात आली होती. काही कोर्ट केसेस सुध्दा झालेल्या आहेत. सहाय्यक आयुक्त, औषधे या पदासाठी जाहिरातीमध्ये शैक्षणिक अर्हता देण्यात आली होती. परंतु अनुभवाचे प्रमाणपत्र व शैक्षणिक अर्हता योग्य प्रकारे तपासली गेली नाही अशी तक्रार करण्यात आली होती. या बाबी तपासण्यासाठी लोकसेवा आयोगाकडे यंत्रणा नाही. त्यामुळे त्यांनी मूळ प्रमाणपत्र व्हेरिफाय करुनच नियुक्ती द्यावी व ही जबाबदारी विभागाची राहील असे पत्राने विभागाला कळविले होते. गृहप्रमुख या पदासाठी मंगळा मून नावाचे उमेदवार होते. कारण या पदासाठी 5 वर्षाच्या अनुभवाची अट होती. त्यांनी अनुभवाचे प्रमाणपत्र नंतर दाखविले व ते निकषात कसे बसतात हे त्यांनी दाखविले असल्यामुळे ते ग्राह्य धरले होते. प्रणाली विश्लेषक या पदाबाबत दि.9.4.2011 रोजी तक्रार करण्यात आली आहे. या पदासाठी उमेदवाराचा अनुभव लक्षात घेतलेला नाही. कारण एन्ट्री लेव्हलवरील हे पद असल्यामुळे अनुभव लक्षात घेतलेला नाही. जाहिरातीमध्ये सुध्दा तसे नमूद केलेले होते. यातील काही प्रकरणे मॅटमध्ये गेली होती. मॅटने एका प्रकरणाला स्थगिती दिलेली आहे. आरोग्य उपसंचालक पदाची मुलाखत संपलेली आहे. औरंगाबाद व नागपूर येथील मॅटने ज्या केसेसना स्थगिती दिलेली आहे. त्या वैयक्तिक स्तरावरील केसेस आहेत. मुळात आयोगाने हे निकष ठरविले आहेत. ते ठरविण्याचा त्यांनाच अधिकार आहे. प्रामुख्याने या बाबतीतच उमेदवारांनी तक्रारी केलेल्या आहेत.

यानंतर श्री.भोगले....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ AKN/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.खंदारे ता.प्र.क्र.18064..... 12:00

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे लोकसेवा आयोगाला असलेल्या अधिकारानुसार त्यांनी नियमावली निश्चित केली आहे. नियम 5.2, 5.3 प्रमाणे कुठल्याही उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करणे, अर्हता तपासणे आणि नंतर त्याला परीक्षेला देणे, मुलाखतीला बोलावणे याची रुपरेषा निश्चित केलेली आहे. असे असताना 347 उमेदवारांपैकी 88 उमेदवारांना नंतर अपात्र ठरविले आहे. आयोगामध्ये छाननी करण्यासाठी सक्षम अधिकारीवर्ग आहे की नाही? माझ्याकडे श्री.देवरे या उमेदवाराच्या संदर्भातील संपूर्ण पत्रव्यवहाराचा रेकॉर्ड उपलब्ध आहे. तो मी आपल्याकडे सादर करीत आहे. आपण याची खातरजमा करावी. मंत्री महोदया खुलासा करीत आहेत तो असमाधानकारक आहे. राज्य शासनामध्ये कारभार करणारा अधिकारीवर्ग लोकसेवा आयोगाकडून निवडला जातो. त्यांच्या बाबतीत अशा पध्दतीने कारभार केला जात असेल तर या अधिकारी वर्गाकडून शासन आणि सर्वसामान्य जनतेने काय अपेक्षा करावी?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जाहिरातीमध्ये मिनिमम क्वॉलिफिकेशन नमूद केलेले असते. उमेदवारांची संख्या जास्त असेल तर लोकसेवा आयोग स्क्रिनिंग टेस्ट घेतो किंवा दुसरे नॉर्म्स लागू करतो. उमेदवारांची संख्या कमी करुन सुलभ पध्दतीने मुलाखती व्हाव्यात यासाठी ठराविक पध्दत वापरली जाते. त्यामुळे मिनिमम क्वॉलिफिकेशन जाहिरातीमध्ये नमूद केलेले असताना दुसरे नॉर्म्स कसे लागू करण्यात आले या संदर्भात माननीय सदस्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. जाहिरातीमध्ये हेही स्पष्ट असते की, जर उमेदवारांची संख्या जास्त असली तर निकष लावून मुलाखतीसाठी कमी संख्येने उमेदवार बोलावण्याचा लोकसेवा आयोगाला जो अधिकार आहे त्या अधिकाराचा वापर करण्यात आला.

**सभापती** : जनतेच्या मनात कोणतीही शंका असू नये या दृष्टीने जे काही करणे आवश्यक आहे ते शासनामार्फत करणे गरजेचे आहे असे मला वाटते. या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागामार्फत जरुर लक्ष देणे गरजेचे आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, कोणत्या कारणामुळे मुलाखतीला बोलावलेले नाही हे उमेदवारांना देखील कळविले जाते.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: दिनांक 26 जुलै, 2011 रोजीच्या
नियम 93 अन्वयेच्या सूचनांबाबत

**सभापती** : काल, दिनांक 26 जुलै, 2011 रोजी माझ्याकडे दोन नियम 93 अन्वयेच्या सूचना प्राप्त झालेल्या होत्या. सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, वि.प.स. यांनी "महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांना 2004 पासून वेतनेतर अनुदान मिळालेले नसल्यामुळे राज्यातील शाळांवर आलेले संकट" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील कळणे माईन्स येथील हजारो टन लोह खनिज चोरीला जाण्याची तक्रार दाखल करणाऱ्याला कंपनीच्या ठेकेदाराकडून झालेली जबर मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी देखील स्त्री भ्रूण हत्येच्या संदर्भात नियम 93 ची सूचना दिलेली होती.

**सभापती** : मी काही सूचना दालनात नाकारल्या आहेत, परंतु दोन सूचना मी स्वीकारल्या होत्या, त्याबाबत निर्णय दिलेला आहे. आपण जो विषय उपस्थित केला आहे त्या संदर्भात वेगळी चर्चा घेण्याबाबत मी विचार करीत आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी "राज्यातील सुमारे 1500 रोजंदारी कामगारांना कायम करण्याचा व पाचवा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घेऊनही त्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे रोजंदार कामगार 28 जुलै, 2011 पासून टप्प्याटप्प्याने आझाद मैदानावर उपोषणास बसत असून जलसमाधी घेणार असल्याचे जाहीर करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार, भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांनी "शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय सभागृहात घेऊनही त्याची अंमलबजावणी न झाल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने दिनांक 25 जुलै, 2011 पासून आझाद मैदान येथे सुरु केलेले आंदोलन." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे, धनंजय मुंडे यांनी "शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील करार पध्दतीवरील कर्मचाऱ्यांना नियमित करुन पगारवाढ देण्याची गरज असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर यांनी "खामगांव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत अनेक वर्षे काम करणाऱ्या 9 कर्मचाऱ्यांना कायम न केल्यामुळे ते शासनाच्या सवलतीपासून वंचित राहिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, पाशा पटेल, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "बीड जिल्ह्यातील परळी-वैजनाथ जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात दि. 23 जुलै, 2011 रोजी नवजात स्त्री अर्भकांची 2 प्रेते आढळून येणे, रुग्णालयात डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे महिलेची उघड्यावर झालेली प्रसुती, या घटनेस जबाबदार असणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत. तसेच महाराष्ट्र राज्यात दररोज होत असलेल्या स्त्रीभ्रूण हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामदास कदम, धनंजय मुंडे, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "सोमवार, दिनांक 25 जुलै, 2011 रोजी जालना जिल्ह्यातील अंबडजवळ पंढरपूर येथून परतणाऱ्या संत गजानन महाराज, शेगांव संस्थानच्या दिंडीला कंटेनरने दिलेल्या धडकेत 13 वारकऱ्यांचा झालेला मृत्यू, या घटनेमुळे संतप्त नागरिकांनी वाहनांची केलेली जाळपोळ, जखमींना मदत करण्याऐवजी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन वारकऱ्यांचा झ ालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, यांनी "कोकण किनारपट्टीजवळ गुहागर तालुक्यातील पालशेत जवळच्या सुसरेली गावात आढळलेल्या गुहेचे संशोधन करीत असताना कोकण किनारपट्टीतील समुद्रात भिंत सदृश्य अवशेष आढळल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

-------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दि. 13 जुलै, 2011 रोजी मुंबई शहरात झालेले बॉम्बस्फोट

**मु.शी.**: दि. 13 जुलै, 2011 रोजी मुंबई शहरात झालेले बॉम्बस्फोट या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील,सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

( चर्चा पुढे सुरु ......

श्री. आर.आर.पाटील (गृह मंत्री) : महोदय, काल या सभागृहात 13 जुलै, 2011 रोजी मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटांच्या संदर्भात अपेक्षेप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव आणला होता. त्या चर्चेच्या अनुषंगाने मी सभागृहाला तसेच राज्यातील जनतेच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपल्या राज्यात स्फोट झाल्यानंतर जनतेच्या भावना तीव्र असणे आणि त्याच्या प्रतिक्रिया या सभागृहात उमटणे हे स्वाभाविकच आहे. या स्फोटामध्ये 24 लोकांचा मृत्यू व 126 जखमी झालेले आहेत. अजुन 3-4 लोकांची परिस्थिती खूप क्रिटीकल आहे. मुंबईचे जनजीवन सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच स्फोटामुळे भीतीचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक होते. पण नंतर अगतिकता म्हणा किंवा धैर्य कालच्या घटनेत एक बाब मी सभागृहाच्या माध्यमातून मुंबईतील तसेच राज्यातील जनतेच्या निदर्शनास आणू इच्छितो की, हा स्फोट झाल्यानंतर काही मिनिटांच्या आत सर्व प्रशासकीय यंत्रणा मदत करण्याच्या दृष्टीने जागेवर पोहचल्या होत्या. सर्वच शासकीय अधिकारी व हॉस्पिटल्सच्या कर्मचाऱ्यांनी खूप चांगल्या पध्दतीचे काम केल्यामुळे गंभीर जखमींना वाचविण्यात यश आले आहे. या परिस्थितीत मुंबईतील नागरिकांनी स्फोट झाल्यानंतर कुठल्याही भीतीचे दडपण मनावर न घेता जखमींना मदत करण्याची भूमिका, दवाखान्यापर्यंत नेण्याचे केलेले काम हे मानवतेच्या दृष्टीकोनाचे प्रात्यक्षिक होते, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. सुरुवातीलाच ज्या शासकीय यंत्रणा आणि नागरिकांनी जखमींना खचू न देता मदत करण्याची भूमिकाघेतली त्यांना राज्यातील जनतेच्या वतीने मी धन्यवाद देईन.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये देशस्तरावर घडलेल्या बॉम्बस्फोटाच्या घटना बघितल्या तर नेहमीच मुंबईला टार्गेट केले जात आहे हे दिसून येईल. साधारणत: सन 2001 पासून ते 2011 पर्यंतच्या घटना बघितल्या तर महाराष्ट्राला 17 वेळा दहशतवादी हल्ल्याला सामोरे जावे लागले आहे हे दिसून येते. देशाची राजधानी दिल्ली आहे. दिल्लीला 10 आतंकवादी घटनांना सामोरे जावे लागले आहे. गुजरात 4, उत्तर प्रदेश 5, राजस्थान 2, आंध्रप्रदेश 2, कर्नाटक 3, पश्चिम बंगाल, हरयाणा, आसाम आणि गोवा या राज्यांना प्रत्येकी 1 वेळा आतंकवादी हल्ल्याला सामोरे जावे लागले आहे. एकंदरीत देशामध्येच 47 आतंकवादी हल्ले झाले. त्यात 968 लोकांना आपले प्राण गमवावे लागले व 3500 लोक वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या हल्ल्यात जखमी झाले. हे सर्व आकडे पाहिल्यानंतर रोज उठून मुंबईलाच टार्गेट केले जात आहे हे ही आकडेवारी वरून स्पष्ट होत आहे. त्याची कारणे आम्ही शोधण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट खरी आहे की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. देशाच्या सीमेपलीकडे बसलेल्या शत्रूला देश खिळखिळा आणि दुबळा करायचा आहे. यासाठी शक्तिस्थळावर आणि मर्मस्थळावर घाव घालणे ह्या युद्ध शास्त्रातील नियमाचे चांगलेच ज्ञान त्यांना आहे. भारताला दुबळे करायचे असेल तर मुंबईला दुबळी केली पाहिजे, तरच भारत देश दुबळा होऊ शकतो ह्या इराद्यानेच देशा पलीकडील शत्रू मुंबईला आपले उद्दिष्ट बनवत आहे.

मुंबईचा विचार केला तर मुंबई सॉफ्ट टार्गेटसुद्धा आहे. एक तर मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईमध्ये घडलेल्या प्रत्येक घटनेची नोंद जागतिक स्तरावर होते. जगातील आतंकवादी संघटना त्यांची प्रसिद्ध व्हावी, त्यांच्याकडे लक्ष वेधले जावे म्हणून तसेच जगाचे लक्ष वेधले जावे यासाठी मुंबईलाच टार्गेट करीत आहेत.

आपण हानीचे आकडे बघितले तर असे दिसून येईल की, मुंबई शहरातच सर्वात जास्त हानी होत आहे. याचे कारण मुंबईमध्ये सर्वात जास्त गर्दीची ठिकाणे आहेत. आज देशातील कुठल्याही शहरा पेक्षा प्रत्येक कि.मी.वर लोकसंख्येची घनता ही मुंबईमध्ये सर्वात जास्त आहे. त्यामुळे येथे एकदा स्फोट केला तर अन्य शहरांमध्ये केलेल्या स्फोटांपेक्षा येथे मनुष्यहानी जास्त होते याचाही विचार अतिरेकी संघटना करताना दिसतात.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ AKN/ खर्चे... 12:10

श्री.आर.आर.पाटील...

जगभरातील कुठल्याही नागरिकाला भारतातील आवडते शहर कुठले असे विचारले तर तो मुंबई हेच सांगतो. अशा अनेक कारणांमुळे मुंबईला सॉफ्ट टार्गेट बनविण्याचे काम केले जात आहे. असे करण्या मागचा उद्देश आम्ही शोधण्याचा प्रयत्न केला. आतंकवादी संघटनांना काही लोक ठार करून भीतीचे वातावरण निर्माण करायचे असते त्यापेक्षा त्यांचा प्रामुख्याने मुख्य हेतू आतंकी कृत्या नंतर दंगली घडाव्यात हा असतो. दंगली एवढ्यासाठी हव्या असतात की, दंगलीतून आतंकवादी कृत्य करणारे अनेक कार्यकर्ते निर्माण व्हावेत. ज्यांच्या कोणावर अन्याय झालेला आहे, ज्यांच्या कोणाच्या मालमत्तेचे नुकसान झाले, ज्यांच्या घरातील कोणी गेले आहे, त्या घरातील तरूणाने चिडून उठावे व त्यातून नवीन आतंकवादी तयार व्हावेत असा उद्देश आतंकवादी संघटनेचा आहे. तसेच जाती-जातीत, धर्मा-धर्मामध्ये दरी निर्माण करून त्यातून नवीन आतंकवाद्यांची फळी निर्माण व्हावी आणि देश दुबळा करावा ही सुद्धा त्याच्या पाठीमागची प्रमुख कारणे आहेत.

त्याच बरोबर मुंबई सॉफ्ट टार्गेट असण्याचे कारण मी कालच खालच्या सभागृहात सांगितले आहे. मुंबईला कोणत्याही मार्गाने येणे शक्य आहे. मुंबईला हवाई मार्गाने येण्याची सुविधा आहे, समुद्रामार्गे येण्याची सुविधा आहे. मुंबईला रेल्वेने येता येते, रस्त्याने येता येते. वाहतुकीच्या सगळ्या सुविधा ह्या मुंबई शहरामध्ये येण्यासाठी उपलब्ध आहेत.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

काही हल्ल्यांमध्ये वापरण्यात आलेली स्फोटके समुद्र मार्गे आणण्यात आली तर आतंकवादी समुद्र मार्गे येऊन त्यांनी थेट आपल्यावरच हल्ला केला. आतंकवाद्यांनी 26/11 रोजी हल्ला करुन त्याला युध्दाचे स्वरुप आणल्याचे आपण अनुभविले आहे. मुंबई शहराने एका खूप मोठया हल्ल्याला तोंड दिले आहे. त्या वेळी देश पातळीवरील अनेक नेत्यांनी केलेली भाषणे आपण पाहिली तर राज्याचा गृह मंत्री म्हणून माझ्यावर राग व्यक्त करतांना त्यांच्या भावना तीव्र होणे स्वाभाविक होते. सर्व नेत्यांनी केलेली वक्तव्ये, आंतरराष्ट्रीय स्तरावरुन उपलब्ध झालेली माहिती व हेडलीच्या प्रकरणामधून पुढे आलेली माहिती लक्षात घेता पाकिस्तानातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीने आणि मार्गदर्शनाने या देशावर केलेला तो युध्दसदृश हल्ला होता ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. मुंबईतील दैनंदिन वाढत चाललेली गर्दी आणि व्यवस्थेमधील अस्ताव्यस्तपणा या सर्वांमुळे मुंबई शहराला टारगेट केले जात आहे.

मुंबईवरील 26/11 रोजी झालेला हल्ला हा पाकिस्तानामधून थेट अतिरेकी पाठवून करण्यात आला होता. अशा प्रकारच्या हल्ल्यामुळे पोलीस दलाला लोकांच्या क्षोभाला सामोरे जावे लागते, लोकांची नाराजी सहन करावी लागते. एवढा मोठा हल्ला झाला असतांना या राज्यातील आणि मुंबई शहरातील कॉन्स्टेबलपासून सह आयुक्तांपर्यन्त वरिष्ठ अधिकारी त्यांच्याकडे असेल नसेल त्या ताकदीनिशी मैदानामध्ये उरतले होते. यामध्ये शहीद हेमंत करकरे, शहीद अशोक कामटे, शहीद विजय साळस्कर हे अधिकारी आपण मोठया वरिष्ठ पदावर आहोत याचा विचार न करता त्यांच्याकडे असलेल्या शस्त्रानिशी ते स्वत: मैदानात उतरले होते. दुर्दैवाने मोठया संख्येने आपल्या अधिकाऱ्यांना त्यामध्ये शहीद व्हावे लागले. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी हातात दांडके घेऊन उभी असलेली आपली पोलिसांची फौज पाकिस्तानातील प्रशिक्षित अतिरेक्यांच्या एके-47 ला सामोरी गेली. एका अतिरेक्याला जीवंत पकडून जेरबंद करण्याची जगातील कोणत्याही पोलीस दलाला शक्य नसलेली कामगिरी फक्त आपल्या मुंबईच्या पोलीस दलानेच करुन दाखविली. आतंकवादी हल्ल्याला एखाद्या देशाचे सैन्य सामोरे गेले असेल, परंतु एखाद्या शहरातील पोलीस दल सामोरे जाण्याची ही पहिलीच घटना होती. कसाबला जीवंत पकडल्यामुळे पाकिस्तानला उघडे पाडण्याची व त्यांची भूमिका जगासमोर स्पष्ट करण्याची गोष्ट आपण करु शकलो. आजपर्यन्त अनेक वेळा हल्ले करण्यात आले त्या प्रत्येक वेळी त्यांच्याकडून हात वर केले जात होते. या हल्ल्यामध्ये आमचा काहीही संबंध नाही अशा प्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ...

चित्रे रंगविली जात होती. परंतु 26/11 च्या हल्ल्यामुळे पाकिस्तानातूनच आतंकवादी कृत्याला खतपाणी घातले गेले ही गोष्ट संपूर्ण जगामध्ये स्पष्ट करण्यामध्ये आपल्या देशाला यश मिळाले. त्यामध्ये मुंबई पोलिसांचे योगदान खूप मोठे आहे, ही गोष्ट आपल्याला नाकबूल करुन चालणार नाही. तरी सुध्दा त्या ठिकाणी झालेली हानी खूप मोठया प्रमाणात होती.

सभापती महोदय, अशा पध्दतीचे हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी आपल्या यंत्रणेमध्ये असलेली अपूर्णता, असलेल्या त्रुटी दूर केल्या तर याही पेक्षा आपण चांगल्या पध्दतीने हल्ल्याला उत्तर देऊ शकतो. या करिता कोणत्या प्रकारच्या त्रुटी आहेत, कोणत्या प्रकारच्या कमजोऱ्या आहेत यांची पाहणी त्रयस्थ नजरेने करण्याकरिता राम प्रधान समितीची स्थापना करण्यात आली. राम प्रधान समितीने अत्यंत कष्ट करुन व सातत्य ठेवून काही महिन्याच्या आत आपला अहवाल शासनाला सादर केला होता. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर कोणती कारवाई केली अशाप्रकारच्या भावना आणि शंका अनेक जणांकडून व्यक्त केल्या गेल्या. मी विनम्रपणाने सांगतो की, गेल्या वर्षी डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये सरकारने त्या अहवालावरील ॲक्शन टेकन अहवाल दोन्ही सभागृहामध्ये मांडला होता. त्यामधील प्रत्येक गोष्टींवर सरकारने कार्यवाही केली होती आणि त्या संदर्भात घेतलेल्या ॲक्शन सुध्दा या सदनाच्या माध्यमातून जनतेसमोर आणल्या होत्या. या अहवालातील शिफारशी पाहिल्या तर वेगवेगळया यंत्रणाकडून मिळणारी माहिती आणि तिचा समन्वय ठेवून ती संबंधितांपर्यन्त पोहोचविणे

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे या गोष्टीवर सदरहू अहवालामध्ये जोर दिला होता. या दृष्टीने मी माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, याबाबतीत त्यांनी ज्या भूमिका मांडल्या होत्या, त्या तंतोतंत अंमलात आणण्याची भूमिका राज्य शासनाने निभावलेली आहे.

सभापती महोदय, पोलीस दलाचे अधुनिकीकरण करावे आणि अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी चांगला इंटिलिजन्स निर्माण व्हावा असा महत्वाचा मुद्दा श्री.राम प्रधान समितीने मांडला होता. त्याही संदर्भात आम्ही आमच्या इंटिलिजन्स्मध्ये असणाऱ्या त्रुटी आणि कारणे शोधून काढली होती. परंपरेप्रमाणे देशातील सर्व पोलिसांच्या बाबतीत सर्वकाही सारखेच आहे. सर्व्हीसमध्ये प्रमोशन मिळण्यापूर्वी इंटेलिजन्स्मध्ये काम करावे म्हणून आपण पोलिसांना तेथे पाठवित होतो. तेथे गेल्यावर लोक काम देखील करीत होते. पण त्यांनी तीन वर्षाच्या कालावधीमध्ये काही सोर्स निर्माण केला आणि तोपर्यंत त्यांची बदली झाली. त्यामुळे त्यांनी या काळामध्ये जी माहिती मिळविली होती, ती वाया जात होती आणि त्यांचे खबरे हे त्यांच्यापासून बाजूला जात होते. त्यामुळे माहितीमध्ये सातत्य रहात नव्हते. म्हणून आय.बी.च्या धर्तीवर आपली एक इन्टीलिजन्स विंग अशी असावयास पाहिजे की, तेथे सेपरेट भरती करण्यात यावी. त्या विंगमधील 50 टक्के लोकांना तेथेच प्रमोशन्स् मिळावीत आणि त्यांनी त्यांच्या कामामध्ये सातत्य ठेऊन तेथेच काम करावे. अशा पध्दतीची भूमिका स्वीकारुन आपण अगोदरच याबाबतीत पावले उचलली होती. नोकर भरतीचा पहिला टप्पा देखील पूर्ण झाला होता. मी विनम्रपणे सदनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, एखादी घटना घडल्या-नंतर त्याबाबत काहीच केले नाही अशा प्रकारे जर आपण मूल्यमापन करु लागलो तर आपल्या यंत्रणा डि-मॉरलाईज् होतील. तसे होऊ नये यासाठी आपण काय केले हे देखील लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.त्यानुसार आपण पुणे येथे 16 कोटी रुपये खर्च करुन महाराष्ट्र इंटेलिजन्स् ॲकॅडमी सुरु केलेली आहे.मला सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, जर कधी आपण पुणे येथे गेला तर आपण जरुर आमच्या इंटेलिजन्स् ॲकॅडमीला भेट द्यावी. देशातील सर्व चांगल्या संस्थांनी आपल्या इंटेलिजन्स् ॲकॅडमीमध्ये चाललेल्या कार्यप्रणालीचा गौरव केलेला आहे. किंबहुना अन्य राज्यांनी देखील आमच्या राज्यातील पोलिसांना देखील इंटेलिजन्स्च्या बाबतीत प्रशिक्षित करावे अशा प्रकारची राज्य शासनाकडे इच्छा व्यक्त केलेली आहे.त्याचबरोबर आपण याबाबतीत जे पाऊल उचलले आहे,त्याबाबत सगळया सेंट्रल एजन्सीज्नी आपले कौतुक केले आहे.

श्री.आर.आर.पाटील . . . .

सभापती महोदय, एका बाजूला श्री.राम प्रधान समितीच्या अहवालाप्रमाणे राज्य शासनाने इंटेलिजन्स् मजबूत करण्याचे काम सुरु केलेले आहे. तसेच जवानांना चांगली शस्त्रे मिळावीत, संरक्षणासाठी चांगल्या प्रकारची साधने उपलब्ध व्हावीत. त्याचप्रमाणे सी.पी.कार्यालये, ए.टी.एस. कार्यालये सुरक्षित ठेऊन, त्यांना चांगल्या स्पेस असलेल्या जागा उपलब्ध व्हाव्यात इ.शिफारशी देखील करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, आपल्याला सर्वांना मुंबईमधील जागेच्या प्रश्नाबाबत कल्पना आहे. अशा वेळी याठिकाणी जागा उपलब्ध करुन देताना थोडासा विलंब झालेला आहे ही गोष्ट मी लपवून ठेऊ इच्छित नाही. पण याबाबतीत जे काही शक्य आहे, ते राज्य शासनाने केले आहे. त्याचप्रमाणे जर अचानकपणे 26-11 प्रमाणे हल्ला झाला तर त्यासाठी राज्य शासनाने देखील स्वतःची एक यंत्रणा उभी करावी आणि केंद्र शासनाची एन.एस.जी.ची कंपनी सुध्दा मुंबईमध्ये असावी अशा पध्दतीची भूमिका विधानसभेमध्ये, विधान परिषदेमध्ये व्यक्त करण्यात आली होती. त्याचप्रमाणे श्री.राम प्रधान समितीने सुध्दा याबाबत काही मते व्यक्त केली होती. त्यानुसार केंद्र शासनाला विनंती करुन आज एन.एस.जी.ची एक कंपनी मुंबईमध्ये तैनात करण्यात आलेली आहे आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यास एन.एस.जी.ची कंपनी आज देखील मुंबईमध्ये कार्यरत आहे.त्यांच्याप्रमाणे आपला देखील तशा प्रकारचा फोर्स असावा म्हणून आतंकवाद्यांबरोबर लढताना जे गंभीररित्या जखमी झाले होते आणि आपल्या बहादुरीची प्रचिती दिली होती ते श्री.सदानंद दाते यांच्यासारख्या एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला फोर्स-1 मध्ये नियुक्त करुन एन.एस.जी.च्या तोडीची आणि कुठेही तसूभर सुध्दा कमी नसलेली अशी 254 लोकांची एन.एस.जी.ची कंपनी मुंबईमध्ये गठीत केलेली आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात आणून दिली की, शासनाने यासाठी जागा देण्यास विलंब लावला. शासनाने जागा देण्यासाठी विलंब लावलेला नाही. पण जी जागा दिलेली आहे, तेथे 1995 पूर्वीच्या थोड्याशा झोपड्या असल्यामुळे त्यांच्याही पुनर्वसनाचा प्रश्न होता. त्यामुळे प्रत्यक्षात जागेचा ताबा मिळू शकला नाही आणि या कारणामुळे प्रत्यक्षात काम देखील सुरु होऊ शकले नाही. पण तोपर्यंत काम थांबू नये म्हणून आमच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेवरील वसतीगृहांचा वापर करुन आज एन.एस.जी.ची आपली टीम सुध्दा तयार आहे.

यानंतर श्री.शिगम अ.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MMP/ AKN/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 12:25

श्री.आर.आर.पाटील......

हे सर्व करीत असताना अज्ञाना पोटी काही प्रश्न विचारण्यात आले की, सरकारने एनएसजी तयार केली, फोर्स-वन तयार केले, परंतु बॉम्ब स्फोटाच्या वेळी त्यांचे अस्तित्व कुठे दिसून आले नाही. एखादी घटना घडल्या नंतर प्रत्येक जण आपापल्या परीने आपले मत रेटण्याचा प्रयत्न करीत असतो. 13 जुलै रोजी झालेला हल्ला हा भ्याड हल्ला होता. मुंबई सारख्या गर्दीच्या ठिकाणी दोन-चार किलोची बॅग ठेवणे सहज शक्य आहे. एनएसजी आणि फोर्स-वन सारखी यंत्रणा तेथे वापरण्या सारखी नव्हती. कोणी थेट हल्ला केला तर त्यांच्याशी प्रत्यक्ष लढण्यासाठी या यंत्रणा तयार केलेल्या आहेत. मुंबई सारख्या गर्दीच्या ठिकाणी दोन-चार किलोची बॅग ठेवण्यात आली होती. आपण सीसी कॅमेरे लावले असते, आपल्याकडे चांगली शस्त्रास्त्रे असती तर काही फायदा झाला असता अशा प्रकारची वक्तव्ये गेल्या पंधरा दिवसांत अनेकांनी केली. चांगली इंटेलिजन्स यंत्रणा असती तर हा हल्ला टाळता आला असता का, या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, आपण पोलिसांच्या कामांचे मूल्यमापन करीत असताना एखादी अनुचित घटना घडली तर त्यांना लगेच शून्य मार्क देणे आणि अशी दुर्घटना होण्याचे टाळले तर त्याचे कधीही मूल्यमापन न करणे अशा प्रकारची भूमिका नेहमी स्वीकारली जाते.

सभापती महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, नागपूर येथील आरएसएसच्या कार्यालयावर हल्ला होण्याची शक्यता आहे, हे कार्यालय उडविण्याची शक्यता आहे, असा एक इनपुट काश्मिर मधून मिळाला होता. त्यावेळी आपण इतक्या प्रभावी यंत्रणा उभ्या देखील केल्या नव्हत्या. परंतु पोलीस विभागाला ही माहिती मिळाल्यानंतर आरएसएसच्या कार्यालया जवळ जाणारे सर्व रस्ते कव्हर करण्यात आले होते. आतंकवादी आरएसएस कार्यालयाच्या गेट जवळ गेले त्याच वेळी त्यांचा खात्मा करुन पुढील अनर्थ टाळला होता. परंतु अशा गोष्टी आपण विसरुन जातो. आपले पोलीस सक्षम नाहीत तर गुजरात राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी इतक्या मोठ्या रकमेच्या बक्षिसाची घोषणा का केली ? मध्य प्रदेश सरकारने देखील मोठया रकमेची घोषणा का केली ? राज्य सरकारने देखील इतक्या मोठ्या रकमेचे बक्षीस का दिले ? एखादा अनर्थ प्रसंग टाळल्यानंतर असे प्रसंग टाळण्याची क्षमता आमच्यामध्ये आहे हे आपल्या यंत्रणेने सिध्द केलेले आहे.

..2..

श्री.आर.आर.पाटील......

सभापती महोदय, दिल्ली सरकारकडून माहिती मिळाली होती की, आरडीएक्सची वाहतूक होणार आहे. या माहितीच्या आधारे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असताना सुध्दा दीड महिना पाळत ठेवून ज्या वाहनामध्ये स्फोटके आहेत त्या वाहनाचा पाठलाग करुन, स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने 17 आतंकवाद्यांसह 26 किलो आरडीएक्स आणि एके 47 जे गुजरात राज्याकडे जाणारे होते ते रोखण्याचे काम आपल्या पोलिसांनी केले होते.

सभापती महोदय, आज कोणी राजीनामा मागत आहे तर कोणी निषेध व्यक्त करीत आहे. मी दोन्ही बाजू कडील सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, गुजरात राज्याकडे जाणारी स्फोटके आपल्या पोलिसांनी पकडली, आरएसएसच्या कार्यालयावरील हल्ला रोखला, त्यावेळी कोणी पोलिसांचे अभिनंदन करण्याची दानत दाखविली होती काय ? पोलीस चुकले तर त्याला दोष द्यायला प्रत्येक जण पुढे येत आहे. ज्यावेळी पोलीस जीवावर उदार होऊन काही गोष्टी करतात त्यावेळी त्यांचे कौतुक करण्याची दानत आपण दाखविली पाहिजे. जी घटना घडली ती कोणालाही अमान्य करता येणार नाही.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, सन 2010 मध्ये पोलीस विभागाला 447 इनपुटस् मिळाले होते. ही कोणी निनावी पाठविलेली पत्रे नाहीत. देशातील अन्य राज्यांतून तसेच केंद्रीय एजन्सी कडून मिळालेली इनपुटसची ही संख्या आहे. राज्यात आतंकवादी कारवाया करायला आलेले असताना सुध्दा तशी एकही घटना घडू न देणे हे आपल्या पोलिसांचे यश नाही काय ? या वर्षी आतापर्यंत 213 इनपुटस् अधिकृत एजन्सीकडून आलेले आहेत. आतंकवादी इतक्या वेळा प्रयत्न करुनही एकही घटना घडू न देणे हे आपल्या पोलिसांचे यश नाही काय ? एखाद्या दिवशी एक खून झाला तर ती बातमी होते. पण खुना शिवाय दिवस गेला तर तो चर्चेचा विषय होत नाही.

यानंतर कु.थोरात..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, इतके हल्ले टाळल्या नंतर आणि इतक्या गोष्टी घडू न दिल्या नंतर .... सभापती महोदय, शेवटी इन्टेलिजन्स सुध्दा प्रत्येक वेळी 100 टक्के मिळतोच असेही नाही. त्या निमित्ताने काही बोलले जाते, त्याचा खुलासा मी जरुर या ठिकाणी करीन. आता पर्यंत सन 2001 पासून 485 अतिरेकी संघटनेतील लोकांना आपल्या पोलिसांनी अटक केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांचे भाषण मी वाचले आणि ऐकले सुध्दा. इतके दिवस झाले, तपास का लागत नाही, खबऱ्यांचे जाळे का उद्ध्वस्त झाले आहे? असे प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आले आहेत. सभापती महोदय, अनेक वेळा पोलिसांना वेगवेगळया अँगलनी टारगेट केले जाते. कोणाचे काम केले नसेल, कुठे एखाद्या बद्दल रोष असेल तर पोलिसांच्या बाबतीत अशा त्या बातम्या येतात. त्या बातम्या वाचून या ठिकाणी बोलले जात असेल तर अहोरात्र काम करणाऱ्या यंत्रणेला आपण कुठे तरी डिमॉरलाईज करीत आहोत असा त्याचा अर्थ होऊ शकेल.

सभापती महोदय, आज मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत जी आतंकी कृत्ये झालेली आहेत त्यातील एकही केस आपल्यामुळे आणि आपल्या पोलिसांमुळे अनडिटेक्टेड राहिलेली नाहीत. प्रत्येक केसचा जोपर्यंत तपास लागत नाही, तोपर्यंत देशातील अन्य राज्यातच नाही तर देशाच्या बाहेरसुध्दा जाऊन आपल्या पोलिसांनी त्या घटनेचा छडाच लावला आहे. 13 तारखेची एक घटना घडली तसेच राज्यात विशेषत: मुंबई शहरात ज्या प्रमुख ज्या प्रमुख घटना घडल्या त्या ना एटीएसकडे, ना क्राईम ब्रँचकडे तपासाशिवाय राहिल्या. सर्व घटनांचा अतिशय शिताफीने आणि अहोरात्र कष्ट करुन आपले पोलीस तपास लावत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.तावडे साहेब मी या ठिकाणी एवढेच लक्षात आणून देऊ इच्छितो की, आपल्या पोलिसांनी आपल्या राज्यातील बॉम्बस्फोटाचे तपास तर लावलेच पण हैदराबाद, अहमदाबाद,सूरत, बेंगलोर, जयपूर आणि दिल्लीच्या दोन बॉम्बस्फोटाचे तपास लावले आणि त्यातील आरोपी सुध्दा आपल्या पोलिसांनी शोधले आहेत. आपल्या पोलीस दलाची विशेषत: मुंबई पोलीस दलाची तुलना स्कॉटलॅण्डयार्ड बरोबर केली जाते ती एवढयाचसाठी केली जाते. आपल्या राज्यात घडलेल्या घटनांच्या संदर्भातील तपास तर या पोलिसांनी लावलेच आहेत पण आपल्या राज्यात जी घटना घडलेली नाही, त्याच्याशी आपले काही घेणेदेणे नाही, अशा प्रकारची भूमिका

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील.....

न घेता देशात कुठेही घटना घडली आणि आतंकवादी मोकळे सुटले तर ते आपल्या राज्यामध्ये येऊ शकतील या उद्देशाने आपले पोलीस अन्य राज्यातील पोलिसांना मदत करीत असतांनाच त्या ठिकाणी घडलेल्या बॉम्बस्फोटाचा पर्दाफाश करण्याचे काम सुध्दा आपल्या पोलिसांनी केलेले आहे.

सभापती महोदय, मुंबईत दिनांक 13 जुलै रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या घटनेला 13 ते 14 दिवस झालेले आहेत. आरोपी कुठे आहेत असे विचारण्यात आले. मी या बाबतीत सदनाला एवढेच सांगेन की, तपास योग्य दिशेने सुरु आहे पण काही तपासाची उकल तपास पूर्ण होण्यापूर्वी जर बाहेर जाहीर केली तर त्याचा आरोपींनाच फायदा मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे योग्य वेळी आरोपींची माहती जनतेसमोर येईल. माझी निश्चितपणाने खात्री आहे की, हा तपास करण्यामध्ये एटीएसला निश्चितपणाने यश मिळेल. पण ज्यावेळी 13 ते 14 दिवस होऊनही या घटनेचा तपास का लागत नाही, असे विचारले जाते त्यावेळी मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, जगातील मोठया देशात घडलेल्या घटनांचे तपास सुध्दा अद्याप लागलेले नाहीत. पण त्यांची नावे सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. आपल्याच देशात वाराणसी, हाय कोर्ट, दिल्ल्ी जामा मशिद, दिल्ली, बेंगलोर आणि गुजरातमधील मोडासा येथे अनेक वर्षापूर्वी बॉम्बस्फोट होऊन सुध्दा त्या बॉम्बस्फोटाचे तपास लागलेले नाहीत. सभापती महोदय, आपण आपल्या पोलिसांवर टीका-टिप्पणी करीत असताना आपल्या पोलीस दलाची शक्तीस्थळेसुध्दा बघितली पाहिजेत. उणीवा असतील तर त्या दूर करण्याच्या दृष्टीने काही मदत केली पाहिजे. राम प्रधान समितीने ज्या शिफारशी केल्या होत्या त्यापैकी पोलीस दलाला चांगली शस्त्रे देणे, त्रुटी दूर करणे, आपला समुद्रकिनारा आणखी मजबूत करणे यासाठी राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे.

सभापती महोदय, काही प्रश्न राजकारणाच्या पलीकडे जाऊन बघितले पाहिजेत. हे प्रश्न खऱ्या अर्थाने नियंत्रित करावयाचे असतील तर राज्यामधील गुप्तहेर यंत्रणा आणखी सक्षम केली पाहिजे, या बाबतीत दुमत नाही. पण या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित करण्यात आला की, गुप्तहेर यंत्रणेमधील माणसे राजकीय इन्टेलिजन्स मिळविण्यासाठी वापरली जात आहेत, त्यांना बाकीचे काम दिले जात नाही. महाराष्ट्रातील परिस्थिती बघितली तर असा कोणता राजकीय इन्टेलिजन्स शासनाला मिळवावयाचा आहे की, जो आमच्या इन्टेलिजन्स विभागाने दिला पाहिजे. जे चालले

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

आहे ते सगळया पक्षात उघड उघड चालले आहे त्यामुळे कुठल्या पक्षात काय घडणार आहे याचे अगोदरच अंदाज येतात. राजकारणी उघड-उघड मैदानात उतरत असतील तर त्यांचा इन्टेलिजन्स आमच्या यंत्रणेकडून जमविण्याची या शासनाला आवश्यकता नाही.

यानंतर श्री. बरवड...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

आज खुल्लमखुल्ला सगळे राजकारण चालू आहे त्यामुळे त्या कामासाठी आम्ही इंटेलिजेंस वापरत नाही. आज मुंबईचा विचार केला तर जरुर जी राजकीय टिकाटिप्पणी झालेली आहे त्याबद्दल जरुर भाष्य करणे मला क्रमप्राप्त आहे. परंतु एवढ्या चांगल्या चर्चेला मी केवळ राजकीय वळण देऊन चर्चा वेगळ्या स्तरावर नेऊ इच्छित नाही. मुंबईमध्ये काही गोष्टी केल्या जाण्याची आवश्यकता आहे. आपण कितीही यंत्रणा उभी केली, कसलाही इंटेलिजेंस उभा केला तरी जोपर्यंत आपण लोकजागृती करणार नाही, बॉम्बस्फोटाबद्दल, अतिरेकी हल्ल्याबद्दल आपण जोपर्यंत लोकांना बरोबर घेणार नाही आणि जोपर्यंत लोक बरोबर येत नाहीत तोपर्यंत आपल्याला इस्त्रायलसारखे यश मिळणे थोडेसे कठीण आहे. पोलीस दल तर सक्षम राहिलेच पाहिजे. ते वर्दीतील पोलीस आहेत. पण मुंबईच्या प्रत्येक नागरिकाने आता खाजगी गणवेशातील पोलीस बनले पाहिजे. त्या दृष्टीने आम्ही निश्चितपणे काही उपाययोजना करु.

सभापती महोदय, एक गोष्ट मला प्रांजळपणे कबूल केली पाहिजे की, अलीकडच्या काळात इंग्रजांच्या जमान्यातील पोलिसांसारखेच आपले पोलीस सुध्दा काही ठिकाणी वागत आहेत. आपण लोकशाहीतील पोलीस आहोत ही संकल्पना कोठे तरी त्यांच्याही डोक्यामध्ये घालण्याची आवश्यकता आहे. प्रशिक्षणामध्ये आम्ही या गोष्टीचा जरुर समावेश करु. कम्युनिटी पोलिसींग, लोकांना बरोबर घेऊन पोलिसींग या संकल्पनेवर आम्ही जोर देऊ. मुंबईमध्ये काही पोलीस आयुक्तांनी वेगवेगळे उपक्रम राबविले होते. कोणी मोहल्ला समित्या केल्या होत्या. कोणी झोपडपट्टी पंचायत पोलीस निर्माण केले होते आणि जास्तीतजास्त लोकांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला होता. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये पोलीस आणि जनता यांनी एकत्र येऊन तंटे कमी व्हावेत म्हणून आम्ही महात्मा गांधी तंटामुक्त मोहीम सुरु केली होती आणि त्याचे खूप चांगले परिणाम होऊन गावातील तंटे कमी होत आहेत. पोलीस लोकांकडे जात आहेत. लोक पोलिसांकडे जात आहेत. त्या योजनेमुळे सौहार्दाचे वातावरण निर्माण होऊ शकले. येत्या महिनाभराच्या आत महाराष्ट्राच्या शहरी भागासाठी तंटामुक्त योजनेसारखी एक कॉन्क्रीट योजना मुंबई आणि राज्यातील शहरी भागामध्ये सुरु करु की ज्यामुळे जनता आणि पोलीस एकत्र येऊ शकतील. त्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ...

माध्यमातून लोकांना जागरुक केले जाऊ शकेल आणि सुरक्षेच्या बाबतीत लोकांचे आणि तरुणांचे सहकार्य घेतले जाऊ शकेल.

सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रामध्ये किती मोठी तरुणाई आहे ? गणेशोत्सवाच्या वेळी आपण बघितले तर ज्या तरुणांची सुरक्षेसाठी काही करण्याची इच्छा आहे असे लाखो तरुण आणि त्यांचे युवक मंडळ आहेत, क्रीडा मंडळे आहेत. वेगवेगळी सामाजिक मंडळे आहेत. मी त्यांनाही सुरक्षिततेच्या बाबतीमध्ये आणि प्रक्रियेमध्ये घेऊ इच्छितो आणि ते घेण्याच्या दृष्टीने आपण कोणत्या गोष्टी बघितल्या पाहिजे या संदर्भात एक मिनिमम ट्रेनिंग देण्याची आवश्यकता आहे. झवेरी बाजार येथे हजारो लोकांची ये-जा आहे. माणसे एकमेकांना भिडलेली असतात. गर्दीतून तोंड सुध्दा बाहेर काढणे महामुष्कील बनते. इतक्या गर्दीच्या ठिकाणी आतंकवादी येतो, त्या ठिकाणी बॅग ठेवतो, त्याचा स्फोट होतो आणि हे कोणाच्याही लक्षात येत नाही. आता लोकांना सुध्दा सेन्सटाईज करणे, त्यांना सुध्दा या गोष्टीतील बारकावे पटवून देणे आणि लोकांना बरोबर घेणे ही काळाची गरज बनलेली आहे. या दृष्टीने एक व्यापक मोहीम आपण घेऊ. सभापती महोदय, त्या बाबतीत आपल्या काही सूचना असतील तर जरुर आपण मदत करावी.

सभापती महोदय, आज 65 लाख प्रवासी रेल्वेतून प्रवास करीत आहेत. मी खेड्यातून आलेलो आहे. येथील गर्दीची आणि सगळ्या गोष्टींची मुंबईकरांएवढी मला कल्पना आहे असा दावा मी कधीही केलेला नाही. मध्यंतरी मी एका मिटींगमध्ये असे बोलून दाखविले की, विमानामध्ये जाताना प्रत्येकाचे फ्रिस्कींग केले जाते, तपासणी केली जाते आणि रेल्वेमध्ये सुध्दा तसे करु या. अधिकाऱ्यांनी होय म्हटले. आम्ही चर्चगेटला 30 मेटल डिटेक्टर बसविले. अधिकाऱ्यांची फौज उभी केली. रेल्वेमध्ये बसणाऱ्या आणि उतरणाऱ्या प्रत्येकाला तपासून आत सोडा असे सांगितले. रेल्वेमध्ये झालेल्या स्फोटानंतरची ही घटना होती. 30 गेटमधून एक एक माणूस तपासून जात असताना सायंकाळी 6.00 वाजताची चर्चगेटमधील गर्दी पाठीमागे थांबत सम्राट हॉटेलपर्यंत येऊन थांबेल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. मुंबईकर सुध्दा हुशार आहेत. इकडे तपासत आहेत म्हटल्यानंतर त्यांनी पुढच्या गेटने जाण्यास सुरुवात केली. चर्चगेटला आम्ही मेनगेटला मेटल डिटेक्टर बसविले. पण अनधिकृत गेट मोजल्यानंतर ते सात निघाले. दुसऱ्या दिवशी मेनगेटला कोणीही नव्हते आणि अनधिकृत गेटमधून सगळे प्रवासी जाताना दिसत होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 12:40

श्री.आर.आर.पाटील....

सभापती महोदय, लोकांमध्ये शिस्तीचा देखील अभाव आहे. वस्तुस्थिती विचारात घेतली तर विमानातील पध्दतीनुसार रेल्वेच्या प्रवाशांना फ्रिस्कींग करुन बसविणे हे कोणत्या पातळीवर शक्य आहे याबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व विशेषत: सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे मुंबईकर असल्यामुळे त्यांनी मला माहिती द्यावी. त्यांच्याकडे कालच्या भाषणामध्ये गृह खात्याबद्दल खूपच माहिती असल्याचे मला दिसले आहे. त्यामुळे त्यांनी मला मार्गदर्शन करावे. त्यांनी केवळ टीका करु नये. माझा खास सल्लागार म्हणून मी त्यांना नेमण्यास तयार आहे. त्यांनी मला या प्रश्नाबाबत सल्ला दिला तर ते मला मदतीचे होईल.

सभापती महोदय, कोणती संस्था कोणाच्या ताब्यात आहे हे बघण्याचे व त्यावर राजकीय टिकाटिप्पणी करण्याचे दिवस संपलेले आहेत. ती वेळ गेलेली आहे. आपण हेच करत बसलो तर आपल्याला सुरक्षिततेचे भान नाही, आपल्याला केवळ स्वार्थाचे राजकारण करावयाचे आहे असा जनतेत संदेश जाईल. मुंबईत हॉटेलवर हल्ले झाले, रस्त्यावर हल्ले झाले, बेस्टच्या बसेसमध्ये हल्ले झाले, रेल्वेत हल्ले झाले आहेत. प्रत्येक ठिकाणी सुरक्षा पुरविण्यासाठी राज्य सरकारने ठरविलेले आहे. रेल्वेत झालेल्या स्फोटानंतर रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वेने मनुष्यबळ पुरविले आहे ते अत्यंत तोकडे आहे. ज्या आधुनिक सुविधा निर्माण केल्या आहेत त्यामध्येही कमतरता आहे. म्हणून वेळ प्रसंगी मी व माननीय मुख्यमंत्री रेल्वे मंत्र्यांना भेटण्यास तयार आहोत. रेल्वेतील सुरक्षा अधिक बळकट करण्यात येईल. मग ती अतिरेक्यांचा शोध घेण्यासाठी व चोर व दरोडेखोरांना पायबंद बसण्यासाठी सुध्दा उपयुक्त ठरेल. मुंबईत बेस्टच्या बसेस आहेत, त्यामुळे त्यांना सुध्दा शासनाकडून तशी विनंती करण्यात येईल. झवेरी बाजारामध्ये आपण गेलो किंवा मुंबईतील गर्दीच्या ठिकाणी गेलो तर रस्त्यावर अधिकृत व अनधिकृत फेरीवाले बसल्याचे दिसतात. काही लोक त्यांच्या गरिबीचा व पोटापाण्याचा प्रश्न घेऊन मुंबईत येतात, त्यांचेही प्रश्न बरोबर आहेत, याबद्दल दुमत नाही. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने सुध्दा या संबंधी विचार करण्याची गरज आहे. मुंबईतील अतिक्रमणे काढण्यासाठी महानगरपालिकेला मनुष्यबळ कमी पडत आहे असे ते म्हणतील. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांना सांगतो की, आपण आजच महापौरांना व पार्टीच्या नेत्यांना सांगावे. पक्षाच्या प्रमुखांना वाढदिवसाची ही भेट आहे असेही त्याला म्हणता येईल. मुंबईतील अतिक्रमणे काढण्यासाठी महानगरपालिकेला जेवढे पोलीस पाहिजेत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/

श्री.आर.आर.पाटील....

तेवढे पोलीस राज्य सरकारकडून पुरविले जातील. त्या बाबतचे आदेश आजच्या आज काढण्यात येतील. आता मात्र टीकेसाठी टीका न करता प्रत्यक्षात रस्त्यावर कृती दाखवावी. जेणे करुन रस्ते मोकळे झालेले दिसतील. लोकांना ये-जा करता येईल. एखादी घटना घडल्यानंतर किमान ॲम्ब्यूलन्स त्या ठिकाणी लवकर पोहोचू शकतील असे वातावरण निर्माण केले पाहिजे. अशा घटनांना ठेलेवाले, झोपडपट्ट्या यासारख्या गोष्टी कारणीभूत आहेत, केवळ गरीब माणसांमुळेच असे प्रश्न निर्माण होत आहेत अशातील भाग नाही. जे बडे बिल्डर आहेत त्यांनी किती अतिक्रमणे करावीत व किती अनधिकृत बांधकामे करावीत आणि किती गर्दी वाढवावी, याच्यावरही कोठे तरी टाच आणण्याची निश्चितपणे गरज आहे. मला या विषयावर अधिक बोलण्याची गरज नाही. पण सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असते तर हा हल्ला टळला असता. मुंबई पोलीस थांबलेले नव्हते आणि सुरक्षिततेबाबत विभागाने कधीही तडजोडी केल्या नव्हत्या.

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, मी राजकारण व विकास कामाशिवाय दुसरा कोणताही खेळ खेळत नाही. मुंबईत 5 हजार सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याच्या प्रक्रियेला किती वेळ लागणार आहे याची मलाही जाणीव होती. पण पोलीस दलातील कर्मचारी लोकांचे सहकार्य घेऊन या बाबतची कार्यवाही सुरु होती. माझ्या सर्व योजना पहिल्या पासून लोक सहभागावर आधारितच आहेत. ग्रामस्वच्छता अभियान असेल, तंटा मुक्ती असेल. सीसीटीव्ही कॅमेरे लावले नाहीत म्हणून मी थांबलो नव्हतो. मुंबईतील वेगवेगळ्या आस्थापनांच्या मदतीने यामध्ये बेस्ट सुध्दा समावेश आहे. तसेच मोठे मॉल्स, मोठी हॉटेल्स आहेत, मोठे व्यापारी आहेत. त्यांच्या मदतीने 13,162 सीसीटीव्ही कॅमेरे यापूर्वीच मुंबईत इन्स्टॉल झालेले आहेत. ज्या झवेरी बाजारात स्फोट झ ाला तेथेही 32 सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. ते कॅमेरे पाहण्यासाठी मी स्वत: गेलो होतो. कॅमेरे बसविले असते तर हल्ला टळला असता असे बोलले जाते. मी तेथे बारकाईने पाहिले की, असा हल्ला झाला की, या संधीचा फायदा घेणारा वर्ग सुध्दा मोठ्या प्रमाणात आहे. कोण शस्त्राची प्रात्यक्षिके दाखवितो, कोण कॅमेऱ्याची दाखवितो. गर्दीत आपला पैसा चालतो का ते बघण्याचा प्रयत्न करतो. सरकारने काय केले पाहिजे यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी अनेक तज्ज्ञ लोक आहेत. ते सांगत आहेत त्या मर्यादेत राहून लोकांचे सहकार्य घेऊन काही गोष्टी करण्याची जरुर गरज आहे.

यानंतर श्री.भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ AKN/ पूर्वी श्री.खंदारे.... 12:45

श्री.आर.आर.पाटील.....

ज्या अतिरेक्यांनी पाकिस्तानातून येऊन आपल्या देशातील व मुंबई शहरातील निरपराध माणसे मारली त्या कसाबवर करोडो रुपये खर्च करता आणि सुरक्षा व्यवस्थेवर कमी खर्च करीत आहात असे सांगितले जाते. कसाबवरील खर्चाची माहिती कुठून बाहेर आली हे मला माहिती नाही. परंतु वृत्तपत्रात जे छापून आले तेवढा खर्च शासन त्याच्यावर करीत नाही. त्याच्यासाठी जी इन्फ्रास्ट्रक्चर तयार केली ती परमानन्ट आहेत. त्या जागेचे भाडे विचारात घेतले तर तो खर्च अधिक दिसून येईल. हा खर्च निश्चितच तेवढा झालेला नाही. त्याचे डिटेल्स मी आज सदनासमोर ठेवतो. एक गोष्ट खरी आहे की, ज्यांनी एवढी निरपराध माणसे मारली त्याच्यावर एक रुपया देखील का खर्च करावा? का लवकरात लवकर त्याला शिक्षा होऊ नये? या सगळ्याच गोष्टी राज्य सरकारच्या हातामध्ये नाहीत. देशामध्ये एक पध्दत आपण ठरविलेली आहे. न्याय प्रक्रिया सुरु आहे. याची राज्यातील, देशातील जनतेला जाणीव आहे. घटनेप्रमाणे आपण एक सिस्टीम तयार केली आहे. आजचे जे कायदे आहेत ते सर्वसामान्य माणसाने एखादी चूक केली, गुन्हा केला त्यासाठी तेच कायदे लागू होतात. आंतरराष्ट्रीय, दुसऱ्या देशातून येऊन आपल्या देशात हल्ला केला त्यासाठी सुध्दा तेच कायदे लागू होतात. जरुर या प्रक्रियेला विलंब लागत आहे. त्या विलंबाबाबत देश स्तरावर सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या मताशी मी सहमत आहे. जो कोणी गुन्हेगार आहे त्याला पोसत बसण्याचा भूर्दंड राज्य सरकारवर आणि राज्यातील जनतेवर पडू नये. त्यांना लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे या मताचे राज्य सरकार आहे. त्या दृष्टीने सुप्रीम कोर्टात विनंती अर्ज केल्यानंतर सुप्रीम कोर्टाचा निकाल आल्याबरोबर केंद्र सरकारला विनंती करण्याकरिता ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या राज्य सरकारकडून केल्या जातील आणि आतंकवाद्यांच्या संदर्भात आपल्या देशात कडक कायदे असले पाहिजे ही भूमिका पुन्हा आपण स्वीकारण्याची निश्चितपणे गरज आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये काही बातम्या सुरु झाल्याबरोबर, माझ्यासंबंधी बोलल्याबरोबर श्री.लालकृष्ण अडवाणी यांनी स्टेटमेंट केले. मला आश्चर्य वाटले. त्यांचा आदर्श देश स्तरावर आहे. देशातील कायदे बदलले पाहिजेत. अमक्याला फाशी दिली पाहिजे अशा अनेक प्रश्नांची आपण चर्चा करतो. परंतु देश स्तरावर या प्रश्नाबाबत जे बोलले गेले त्यामुळे जनतेच्या मनामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

मात्र किल्मिष तयार होते. लवकर फाशी दिली पाहिजे अशी आपल्याकडून मागणी केली जाते. परंतु परदेशात आपण काही लोकांना नेऊन का पोहोचविले? त्यावेळची परिस्थिती, त्यावेळच्या राज्यकर्त्यांना माहीत असू शकेल. आजच्या अडचणी तेथील राज्यकर्त्यांना माहीत असतील. माझी आणि राज्य सरकारची, या राज्यातील प्रत्येक जनतेची कसाबला लवकरात लवकर शिक्षा व्हावी हीच भूमिका आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी निश्चितपणे करणार आहोत. एखाद्या गोष्टीसाठी आपल्या भावना तीव्रपणाने मांडणे मी समजू शकतो. परंतु कसाबचे चित्र आपल्या डोक्यावर घेतले गेले. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या पक्षामध्ये मार्गदर्शन कमी पडते हे मी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. कसाबचा फोटो तुमच्या डोक्यावर लावण्याची गरज नव्हती. आंदोलन करताना सुध्दा कधीकधी थोडासा विचार करुन केले पाहिजे.

देश स्तरावर श्री.लालकृष्ण अडवाणी यांनी भूमिका मांडली. आतंकवाद्यांच्या संदर्भात वेगळे कायदे केले पाहिजेत. आरोपींना लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे. ते देश स्तराचे बोलले. परंतु माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचा पक्ष हा राष्ट्रीय पक्ष आहे. आता श्री.अडवाणी यांची जी भूमिका आहे तीच भूमिका विरोधी पक्षनेत्यांची राज्य स्तरावर सुध्दा असली पाहिजे. परंतु राज्य स्तरावर तुम्ही राज्य सरकारला दोष देता आणि केंद्र स्तरावर केंद्र सरकारला ते दोष देतात. नेमके काही कमी पडते का? राष्ट्रीय नेत्यांचे आणि तुमचे जमत नाही याबद्दल शंका आली म्हणून विचारले. तुम्ही या प्रश्नामध्ये राजकारण केले असे मी बिलकूल मानत नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांची एक गोष्ट मात्र मला खटकली. या प्रक्रियेमध्ये सभागृहात तुम्ही राष्ट्रीय भूमिकेबद्दल बोलणे स्वाभाविक समजू शकते. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी घटनेनंतरच्या 10 ते 15 मिनिटामध्ये रुग्णालयात जाऊन जखमींना भेटण्यास जात असताना श्री.राज पुरोहितसारख्या जबाबदार नेत्यांनी घोषणा दिल्या....

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

मला तर वाटते की, त्या दिवशी माननीय श्री. राज पुरोहित यांनी ठाण्याची भेळ खाल्ली असावी म्हणून ते तशा घोषणा करीत होते. या निमित्ताने माझे असे म्हणणे आहे की, कोणत्या प्रसंगी किती राजकारण करावयाचे याचे भान ठेवणे आवश्यक आहे. ज्यावेळेस लोकसभेवर अतिरेकी हल्ला झाला होता तेव्हा विरोधी पक्ष तसेच काँग्रेस पक्षाच्या वतीने लोकसभेवरील हल्ला हा देशावरील हल्ला आहे अशी उदार भूमिका घेतली होती. इकडे मात्र हॉस्पिटल्समध्ये जखमीना मदत करायला निघालेल्या मुख्यमंत्र्यांना अडवून त्यांच्याविरुध्द घोषणा देणे ही भूमिका घेतली जाते. संकटाच्या प्रसंगी तसेच देशावर जेव्हा हल्ला होतो तेव्हा आपण सर्व एकसंध आहोत असाच संदेश दिला जाणे आवश्यक असते पण या विषयावर मला आणखी जास्त चर्चा करण्याची गरज वाटत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या मी असे निदर्शनास आणू इच्छितो की, गृह विभागाने केलेल्या बदल्यांच्या संदर्भात आपण बोललात. पण मी आपल्याला विनंती करतो की, आपल्याकडे बदल्यांच्या संदर्भात काही डिटेल्स असतील तर ते मला द्यावेत. तसेच त्यामध्ये जे कोणी दोषी आढळत असतील तर ते पोलीस दलात राहणार नाहीत आणि मी दोषी आढळलो तर या सभागृहातच काय पण महाराष्ट्राच्या राजकारणात सुध्दा राहणार नाही. मला करायचीच असेल तर आतंकवादाला संपविण्यासाठी ज्या काही कृती कराव्या लागतील त्या जरुर करील. पण एका गृह मंत्र्यांचा संकल्प हा काही परिपूर्ण संकल्प असतो असे नाही, त्यामुळे शासनाच्याही काही मर्यादा असतात हे सभागृहाने लक्षात घ्यावे. ज्यावेळी असे हल्ले होतात तेव्हा देश हा एकसंध असतो ही भूमिका खरे तर मांडण्याची आवश्यकता होती. कारगिलच्या युध्दाच्या वेळेस संपूर्ण देश एकसंध झाला होता पण अशा हल्ल्याच्या वेळेस मात्र येथे राजकारण करण्याचा प्रयत्न होतो हे दुर्दैव आहे. हा हल्ला झाल्यानंतर मी विमानातून उतरु शकलो नाही याबद्दल माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांचा काय गैरसमज झाला होता याची मला कल्पना नाही. तसा तो दूर करण्याचाही प्रयत्न केला पण थोडेसे अधिक स्पष्ट केले असते तर बरे झाले असते. त्यासंदर्भात मी ज्या एअर इंडियाच्या विमानातून नागपूरला चाललो होतो त्यांच्याकडून मी काही कागदपत्रे सोबत आणली आहेत. त्यावरुन आपल्या लक्षात येईल की माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि माझ्या विमानाच्या टेक-ऑफमध्ये किती तासाचा वेळ होता. त्यामुळे त्यांचा

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.........

गैरसमज सुध्दा दूर होईल असे वाटते. तसेच माझ्या शेजारी आपल्याच भारतीय जनता पक्षाचे एक सन्माननीय सदस्य बसलेले होते. आम्ही दोघांनीही पायलटला विमान थांबविण्याची विनंती केली पण पायलटने त्याला नकार दिला. विमान थोडे वर गेल्यानंतर पायलटने आमच्याकडे येऊन दिलगिरी व्यक्त केली की अशा परिस्थितीत विमान थांबविले तर अपघात होण्याची शक्यता असते. मी नागपूरला पोहचल्यानंतर त्याच विमानाने पुन्हा मागे परत आलो. तसेच माननीय विरोधी पक्षनेते हे औरंगाबादला जाणाऱ्या विमानात होते आणि मी नागपूरला जाणाऱ्या विमानात होतो. पण चित्र असे निर्माण झाले की, माननीय विरोधी पक्षनेते विमानाने न जाता परत आले आणि माननीय गृह मंत्री मात्र विमानातून उतरले नाही, त्यामुळे राज्यातील जनतेच्या मनात गैरसमज निर्माण झाला.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मी यासंदर्भात प्रेससमोर खुलासा केला की, माननीय गृह मंत्री आणि मी एकाच विमानात बसलेलो नव्हतो.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, एअर इंडियाची कागदपत्रे पाहून हे त्यातून नक्कीच स्पष्ट होईल की, माझ्या विमानात आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या विमानाच्या उड्डाणाच्या वेळेत किती फरक होता आणि त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या मनातील संभ्रम सुध्दा दूर होईल. या सर्व ॲक्टीव्हिटीज करीत असताना राज्य शासनाकडून, माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडून खूप चांगल्या प्रकारचे सहकार्य गृह विभागाला मिळते यात शंका नाही.

महोदय, राज्यात मागील चार वर्षात 44 हजार पोलीस कॉन्स्टेबल्सची भरती आपण केली, एवढी भरती देशातील कोणत्याही राज्याने केलेली नाही. देशाच्या स्तरावर माननीय पंत प्रधानांसमोर आलेली ही माहिती आहे. तसेच मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, ही पोलीस भरती करीत असताना एका साध्या व सिंगल मुलाने भ्रष्टाचार झाल्याची एकही तक्रार केलेली नाही. अशा प्रकारे भ्रष्टाचाराशिवाय भरती होऊ शकते हे या राज्यात सिध्द करुन दाखविले आहे. एवढी भरती करुन सुध्दा आपल्या राज्यातील स्थिती बघितली तर दर माणसी पंजाबमध्ये 249 आणि महाराष्ट्रात 166 इतकीच आहे, दिल्लीमध्ये त्यापेक्षा जास्त आहे. मुंबईवर सातत्याने होणारे हल्ले लक्षात घेऊन तसेच नवी मुंबई, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर ही सुध्दा सारखीच गर्दीची ठिकाणे आहेत.....

यानंतर श्री. भारवि .......

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

या शहरांसाठी वेगळा ॲक्शन प्लान हा तयार करावाच लागेल. ह्या सगळ्या शहरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञान देण्यासाठी तसेच अधिक मनुष्यबळ देण्यासाठी लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे गृह विभागातर्फे प्रस्ताव नेला जाईल. आता पर्यंत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी ज्या प्रमाणे सहकार्य केले आहे ते पाहिल्यानंतर ते यापुढे देखील सहकार्य करतील असे मला वाटते.

आज आपल्याकडे सक्षम असे पोलीस दल आहे. येथे शस्त्राचा देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला. श्री.फुंडकर साहेब मी कालही सदनामध्ये सांगितले की, शस्त्रासंबंधी एवढी उघड चर्चा करण्याची आवश्यकता नाही व ती करू देखील नये. आपली शक्तिस्थळे उघड करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. मी एवढेच सांगेन की, देशातील कुठल्याही पोलीस दलाकडे शस्त्रे नाहीत अशी शस्त्रे आज आपण पोलिसांना उपलब्ध करून दिलेली आहेत.

शस्त्र व साधनसामुग्रीच्या दृष्टीने खूप चांगल्या गोष्टी आपण केलेल्या आहेत. काही वेळा निर्णय घेणाऱ्या यंत्रणा नाउमेद होतील अशा पद्धतीची टीका केली जाते. शहीद श्री.हेमंत करकरे साहेबांना बुलेट-प्रुफ जॅकेट घालताना सर्वांनी टीव्हीवर बघितले होते. लोकांचा असा समज झाला आहे की, कुठूनही कशाही गोळ्या मारल्या तरी प्राण वाचू शकतात. बुलेट प्रुफ जॅकेटसंबंधी माहिती नसणारी माणसे तशी अपेक्षा करू शकतात. आज आपल्या देशामध्ये एक गोष्ट सोपी झालेली आहे. त्यात माझ्या खात्यातील अधिकारी सर्वात जास्त पुढे आहेत. विभागामध्ये काम करीत असताना त्यांनी कुठेही दिवे लावले नाहीत. निवृत्त झाल्यानंतर टाय बांधून समोर कॅमेरा आला की, त्यांना वाटते की, आपण जगातील विद्वान झालो. कधी कधी मलाच प्रश्न पडतो की, हे लोक ज्यावेळी शासकीय नोकरीत होते त्यावेळी त्यांचे हात कोणी बांधले होते ? त्यावेळी त्यांनी अकलेचे दिवे का पाजळले नव्हते ? सरकार अडचणीत आहे म्हटल्यावर मार्गदर्शन करण्यासाठी अनेक पोपट आज तयार झालेले दिसतात. आज आपल्या देशात विद्वान व्हायला काय आवश्यक असेल तर डोक्यात काहीही नसले तरी, गळ्यामध्ये एक टाय आणि समोर कॅमेरा आला की, आपल्या देशामध्ये कोणीही विद्वान होऊ शकतो आणि चार-चार तास देखील लोक त्यांचे म्हणणे ऐकतात

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

आणि ते देखील तेवढेच बोलत असतात. जे कोणी सुरक्षिततेच्या बाबतीत बोलत आहेत त्यांनी सरकारकडे इच्छा व्यक्त करावी. ते जे योग्य मार्ग सांगतील तो आम्ही स्वीकारू. सरकारने अजून दारे बंद केलेली नाहीत. त्यांचे असेल ते मार्गदर्शन घेण्यासाठी मी तयार आहे. त्यांनी टीका करण्या पेक्षा, जुनी उणी-दुणी काढण्यापेक्षा, राजकीय भरकटलेल्या पुढाऱ्या पेक्षा बेधडक विधाने करण्याची भूमिका सोडून द्यावी. मी माध्यमांना सुद्धा विनंती करणार आहे. सुरक्षेच्या प्रश्नाच्या आपण किती चिंधड्या उडविणार आहात, किती धिंडवडे उडविणार आहात या वर सुद्धा मर्यादा ठेवण्याची आवश्यकता आहे. मी सदनातील काही सदस्यांना व मीडियातील काही ज्येष्ठ पत्रकारांना काय परिणाम होऊ शकतो हे सांगणार आहे. मी त्यांना काही टेप्स वाजवून दाखवणार आहे. या संबंधी मी कायदेशीर माहिती घेतली आहे. त्या टेप्स वाजवून दाखविण्यामध्ये कुठेही अडचण नाही. ज्यावेळी ताजवर हल्ला होत होता, त्यावेळी पाकिस्तानमधून त्यांना संदेश येत होते. त्यावेळी पाकिस्तानातून जे आदेश अतिरेक्यांना दिले गेले त्या टेप्स मी वाजवून दाखविणार आहे. ते सांगत होते की, टीव्हीवर मला अमक्या बाजूला पत्रकार दिसत आहेत. त्यांच्यावर हल्ला करावा. टीव्ही बघून पाकिस्तानातून सूचना येत आहेत. बातम्या ह्या तर आवश्यक आहेत. त्या लोकांना कळणे हे गरजेचे आहे. तो लोकांचा हक्क आहे. पण त्या अतिरेकी कृत्य वाढविण्यासाठी उपयुक्त ठरत असतील तर देशाच्या सुरक्षिततेसाठी थोडसा संयम आपण पाळायला हवा.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण कोकणातील आहात. चार टनी आणि बारा टनी बोटीसंबंधी आपणच जास्त सांगू शकाल. आम्ही पश्चिम भागातील दुष्काळी भागातील माणसे या गोष्टी समजू शकत नाही. मी सुद्धा विचारले. या चार महिन्यामध्ये बोटी चालू शकत नाही. मग इंटिलिजन्स कोण ठेवणार ? म्हणून मी त्या बोटी चालवा म्हणून सांगितले. समुद्रातील मोठ्या लाटांमध्ये आपल्या छोट्या बोटी चालवू शकत नाही. मग या चार महिन्यामध्ये सागरी सुरक्षा कोण करणार असा प्रश्न येथे विचारण्यात आला. आपल्या कोळी बांधवांच्या बोटी कोणी हायजॅक करून त्यातून कोणी एन्ट्री करू नये यासाठी आपण बोटी घेतलेल्या आहेत. आज समुद्रात फक्त मोठी जहाजेच चालत आहेत. पावसाळ्यात समुद्रात कोळी बांधवांच्या देखील बोटी चालत नाही.

यानंतर श्री.सरफरे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

पावसामुळे आणि समुद्राच्या लाटांमुळे त्यांच्या बोटी बंद असतील तर त्या हायजॅक करण्याची बिलकुल शक्यता नाही. त्यामुळे आपल्या बोटींच्या गस्तीची गरज नाही. मच्छीमारांच्या बोटी चालू नाहीत त्यामुळे त्यांच्या बोटी हायजॅक होणार नाहीत या करिता आपल्या बोटी गस्तीकरिता पाठविण्याची आवश्यकता नाही. हे बारकाईने न पहाता दुरुस्तीसाठी उलटी करुन ठेवलेली एखादी बोट 24 तास चॅनेलवर दाखविली जाणार असेल तर ती महाराष्ट्रातील जनतेला दिसेल, परंतु कदाचित ती पाकिस्तानात सुध्दा पाहिली जाईल. अशाप्रकारे ही माहिती आपण आपल्या शत्रूला सुध्दा देत आहोत. सुरक्षिततेच्या प्रश्नावर बोलतांना, चर्चा करतांना सर्वांनी संयम ठेवण्याची आवश्यकता आहे. मी माध्यमांना आवाहन करीन की, एखादी घटना घडल्यानंतर आपल्याला कितीही मोठा पुरावा सापडला तरी तो चॅनेलवर दाखवू नका. चॅनेलवर दाखविले जात नाही म्हटल्यानंतर कोण बघायला जातो हे मला चांगले माहीत आहे, कुणीही बघायला जाणार नाही.

रेल्वेमध्ये स्फोट झाला त्यावेळी पावसाळा होता. त्या स्फोटातील जखमी पेशंटना हॉस्पिटलच्या अति दक्षता विभागामध्ये ठेवण्यात आले होते. अशा वेळी चिखलाने माखलेले बूट घालून पेशंटच्या बाजूला उभ्या राहिलेल्या डॉक्टरला धक्का बुक्की करुन बाजूला सारुन फोटोग्राफरला घेऊन अनेक नेत्यांनी फोटो काढले. माझी पत्रकार मित्रांना विनंती आहे की, सरकारने सांगून हे नेते थांबणार नाहीत, परंतु तुम्ही कॅमरे ऑफ केले तर एकही नेता त्या ठिकाणी जाणार नाही. फोटोसाठी किती स्पर्धा करावी यालाही कुठेतरी मर्यादा पाहिजे. एखादी घटना घडल्यानंतर त्या ठिकाणी तातडी दाखविण्यापेक्षा अशा पेशंटना कशा प्रकारे मदत करता येईल यासाठी आम्ही एखादे धोरण ठरवू. कुणाला जर माहिती द्यावयाची असेल तर त्यासाठी आम्ही मंत्रालयात एखादा कक्ष निर्माण करु त्या ठिकाणी आपण माहिती द्यावी. आम्हाला काही मदत पाहिजे असेल तर तिथे येऊन आपण मदत करावी. हॉस्पिटल टू हॉस्पिटल आणि स्पॉट टू स्पॉट अशातऱ्हेने नेत्यांची भेटी देण्यास सुरुवात होते त्यावेळी पोलिसांनी तपास करावयाचा की यांचा बंदोबस्त करावयाचा हा त्यांना प्रश्न पडतो. हे सर्व होत असतांना काही वेळेला त्यामधून पुरावे नष्ट होतात, काही वेळेला डॉग स्क्वॉडकडून करता येणारे काम थांबते आणि त्यावेळी आपलाही नाईलाज होतो.

अहमदनगरमध्ये महिलांवर अन्याय, अत्याचार झाले, दुष्कृत्य झाले. त्या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे पाहणीसाठी गेल्या, त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKN/ KGS/ MMP/ KTG/

श्री. आर. आर. पाटील ...

जाणे भाग पडले. मी एस.पी. ना विचारले की, मी पहाणी करण्यासाठी येऊ काय? ते म्हणाले की, असे सर्व जण यायला लागले तर मी तपास केव्हा करु? माझी सर्व यंत्रणा तिथेच कामाला लागते. त्यामुळे मी त्या ठिकाणी न जाण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी सन्माननीय श्री. फुंडकर साहेब गेल्याचे मला समजले. आता पुन्हा माझ्यापुढे प्रश्न पडला की, विरोधी पक्षनेते गेले असतांना आपण गेलो नाही तर कसे चालेल? मग मी सुध्दा गेलो. अशाप्रकारे आपल्यामधील स्पर्धा सुध्दा आपण थांबविली पाहिजे. त्या साठी आपण सर्वांच्या संमतीने कोड तयार करु या. एखादी घटना घडल्यानंतर तेथील यंत्रणेवर सुरक्षेचा ताण न येता त्यांची तपास कामे सुरु राहतील यासाठी त्यांना मदत करण्याकरिता जे काही करता येईल ते करण्याचा आपण प्रयत्न करु या.

सभापती महोदय, मला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. बुलेट प्रुफ जॅकेट घेण्याचे खूप दिवसांपासून रखडले होते, 2 हजार बुलेटप्रुफ जॅकेट रिलिज करण्याची ऑर्डर दिली असल्याचे केंद्र सरकारने काल मला कळविले आहे. सन्माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांनी "The matter may be taken on top priority" अशाप्रकारे शस्त्रे आणि बुलेट प्रुफ जॅकेट खरेदीच्या बाबतीत काल ऑर्डर देण्यात आली. अशाप्रकारे केंद्र सरकारने राज्य सरकारला पूर्णपणे मदत करण्याची भूमिका घेतली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना माझी विनंती आहे की, आपण राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवू. आपण जी काही टीका केली असेल तिकडे मी दुर्लक्ष करतो. उत्तराच्या माझ्या भाषणामध्ये मी काही बोललो असेन तर त्याकडे आपण दुर्लक्ष करा. या पुढील काळातील आपले प्रश्न वेगळे असले तरी राज्याला आणि देशाला दुबळे करणाऱ्या कारवाया हाणून पाडण्यासाठी आपण सर्व एकसंघ आहोत हाच संदेश जगापुढे जाण्याची आवश्यकता आहे. मला शेवटची अशी सूचना करावयाची आहे की, आपल्या यंत्रणा कुठेही डिमॉरलाईज होणार नाहीत याची आपण सर्वांनी दक्षता घेण्याची गरज आहे. अलिकडे एका आरोपीला तपासासाठी बोलाविण्यात आले होते. त्याला पूर्वीपासून ब्लड प्रेशरचा आजार होता, दुर्दैवाने त्या आजाराने तो आरोपी मयत झाला. त्यामुळे पोलीस अल्पसंख्याकांवर अन्याय करीत आहेत असे आरोप सुरु झाले. पोलिसांनी कुणालाही बोलवायचे नाही, कुणालाही विचारायचे नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

पोलिसांसाठी तपासाची एखादी पध्दत ठरवून द्यावयास पाहिजे.

सभापती महोदय, कै.हेमंत करकरेसाहेबांच्या मृत्यूपूर्वी त्यांची आणि माझी जवळजवळ दोन-अडीच तास भेट झाली होती. मी शक्यतो कधी अगोदर ठरविलेले दौरे रद्द करीत नाही. त्यादिवशी मी शहादा येथे होतो. मला दुपारी सी.पी.यांचा फोन आला की, तुम्ही आमच्यासाठी ताबडतोब निघून आलात तर बरे होईल. मी त्यांना सांगितले की, माझे अकोला आणि इतर ठिकाणी दौरे आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुका आहेत. त्यावर सी.पी.यांनी सांगितले की, सर, आम्ही तुम्हाला कधीही दौरा मध्येच सोडून मुंबईला यावे असे बोलाविलेले नाही. मग मी विचार केला की, इतके वरिष्ठ अधिकारी अचानक फोन करुन बोलवित आहेत म्हणून मी माझे पुढील दौरे रद्द करुन मुंबईमध्ये आलो. त्यावेळच्या कै.करकरे साहेबांच्या भावना लक्षात घेतल्या तर माझ्या अधिकाऱ्यांना कोणत्या परिस्थितीमध्ये काम करावे लागते हे कळू शकेल. एखाद्या हिंदू ऑर्गनायझेशनच्या लोकांना पकडले तर हिंदुत्वावर संकट येते आणि एखाद्या अल्पसंख्याक आरोपीला पकडले अल्पसंख्यांकावर संकट येते. मुंबई रेल्वे स्फोटातील पीरभाई नावाचा आरोपी हा याहू या इंटरनॅशनल कंपनीमध्ये चीफ इंजिनिअर होता. एवढया आंतरराष्ट्रीय कंपनीतील चीफ इंजिनिअरवर कोणता खबरी संशय व्यक्त करु शकेल? तसेच मिलिट्रीमधील कर्नल पुरोहित यांच्यावर कोणता खबरी संशय घेऊ शकेल? म्हणून टीका करीत असताना सुध्दा आपल्या यंत्रणा डि-मॉरलाईज होणार नाहीत याची काळजी घ्यावयास पाहिजे. आजपर्यंत मुंबई पोलीस दलाचे काम पाहिले तर त्यांनी आपली वर्दी ही खाकीच ठेवलेली आहे आणि समोर जे कोणी अतिरेकी आहेत, त्यांचा जात-धर्म न पाहता वेगवेगळया संघटनांनी जे बॉम्बस्फोट केले आहेत,त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे काम आमच्या पोलिसांनी केलेले आहे आणि अशा वेळी तेथे आपल्या पोलिसांनी कोणत्याही प्रकारचा जातीभेद, धर्मभेद केलेला नाही.पोलीस नि:पक्षपातीपणे प्रयत्न करीत असताना त्यांच्या पाठीशी उभे राहून ते डि-मॉरलाईज होणार नाहीत याची दक्षता घेणे आणि आपले महाराष्ट्र राज्य अधिक सुरक्षित करणे हेच काळाचे आपल्या समोरील आव्हान आहे आणि जर आपण ते वेळीच ओळखले नाही, तसेच सर्वांनी काही बाबतीत तरी एकत्र येऊन समान भूमिका घेतली नाही तर आपल्या समोरील अडचणी आणखी वाढतील. म्हणून या प्रश्नाबाबत फारसे राजकारण न करता सर्वांनीच शासनाच्या आणि पोलिसांच्या भूमिकेला पाठिंबा देण्याची भूमिका स्वीकारुन, त्यांना तपास कामासाठी शुभेच्छा देऊ या.एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, . . ..

**सभापती** : आता अल्पकालीन चर्चा संपलेली आहे. मी सन्माननीय सदस्यांना याबाबत कोणताही प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देणार नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राईट ऑफ रिप्लाय ......

**सभापती** : यामध्ये राईट ऑफ रिप्लाय देता येणार नाही. सदरहू विषयावरील चर्चा संपलेली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जर याबाबतीत नियमामध्ये तरतूद असेल तर जरुर बोलण्याची परवानगी द्यावी. पण जर नियमामध्ये तरतूद नसेल तर त्याचा विचार करु नये.

**सभापती** : याठिकाणी नियम 97 अन्वये चर्चा करण्यात आली होती आणि त्या चर्चेला माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.तसेच सदरहू नियमामध्ये राईट ऑफ रिप्लाय अशी प्रोव्हीजन नाही आणि या विषयावरील चर्चा संपलेली आहे असे मी मघाशीच जाहीर केलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे. फक्त माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब बोलतील.

**सभापती** : नाही. मला माफ करा.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एक अपवादात्मक बाब म्हणून माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब उभे आहेत. आपण त्यांचा सन्मान करु या अशी मी शासनाच्या मार्फत आपल्याला विनंती करतो. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी विचार व्यक्त करावेत.

**सभापती** : माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले. त्यामुळे मी एक अपवाद म्हणून त्यांना परवानगी देत आहे. परंतु हा नियम होणार नाही. ठीक आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपले विचार मांडावेत.

----

. . . .झेड-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे आज आमच्या माननीय गृह मंत्री यांच्याकडून फार मोठया अपेक्षा होत्या.काल सभागृहामध्ये जी चर्चा झाली, त्यावेळी पोलीस दलाबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले होते.मात्र अनेक जणांनी पोलीस दलावर फार मोठा रोष व्यक्त केलेला नाही तर शासनाच्या धोरणाबाबत रोष व्यक्त केला होता. मात्र दोन-तीन प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. श्री.राम प्रधान समितीच्या अहवालाबाबत जो ॲक्शन टू बी टेकन रिपोर्ट दिलेला आहे, तो आम्ही वाचला आहे.

यानंतर श्री.शिगम अ. . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

परंतु शासनाने त्या रिपोर्टला असत्य ठरविण्याचे काम केलेले आहे. समिती समोर पोलीस महासंचालकांनी वक्तव्य केले की, सन 2005-06 पासून निधी अभावी पोलीस विभागाला शस्त्रांचा पुरवठा झालेला नाही. दुसऱ्या बाजूला गृह विभागाच्या सचिवांनी सांगितले की, पोलीस महासंचालकांचे मत चुकीचे आहे. अशा विसंगत गोष्टी त्या अहवालामध्ये आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काल मुद्दा उपस्थित केला होता की, श्री.निखिल वागळे यांच्या मुलाखतीमध्ये श्री.राम प्रधान यांनी सांगितले होते की "या अहवालाच्या व्यतिरिक्त त्यांना शासनाला काही सांगायचे होते. परंतु सरकारने मला चर्चेसाठी बोलविले नाही, चर्चेची संधी दिली नाही. त्यामुळे मला माझे वक्तव्य करता आले नाही, याचे मला दुःख आहे." याचा अर्थ राम प्रधान यांना अजून काही सांगायचे होते काय ? राम प्रधान यांनी अहवाल दिल्यानंतर त्यांना चर्चेसाठी का बोलाविण्यात आले नाही, त्यांना अहवालाच्या व्यतिरिक्त शासनाला जे काही सांगावयाचे होते ते सांगण्याची संधी का दिली नाही ? यापुढे राज्यात अशा प्रकारचे बॉम्ब स्फोट होऊ देणार नाही या संबंधी कोणत्या उपाय योजना करणार आहात इत्यादी प्रश्नांची उत्तरे माननीय गृह मंत्री महोदयांकडून मिळालेली नाहीत. बॉम्ब स्फोट होऊन 15 दिवसांचा कालावधी झालेला असताना या प्रकरणातील धागेदोरे पोलिसांना सापडले नाहीत या संबंधी गृह मंत्री महोदयांचे काय म्हणणे आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी व्ही.आय.पी.संबंधी प्रश्न उपस्थित केला. माननीय मंत्री महोदय जिल्ह्याच्या ठिकाणी जातात त्यावेळी 21 पोलिसांची रांग त्यांना सलामी देते. माननीय मंत्री दिवसभराच्या कार्यक्रमासाठी कुठेही वेळेत जाऊ शकत नाहीत आणि दिवसभर 21 पोलीसांची रांग त्यांना सलामी देण्या साठी थांबलेली असते. काही वेळा गडबड झाली की मंत्री परस्पर निघून जातात त्यामुळे सलामी देण्यासाठी थांबलेल्या पोलिसांचा दिवस वाया जातो. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी माननीय मंत्री महोदय जातात त्यावेळी पूर्वी जी पध्दती होती ती तशीच सुरु ठेवू. परंतु माननीय मंत्री जिल्ह्यात कुठेही गेले तरी त्यांना सलामी दिली जाते ती पध्दत बंद करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, व्ही.आय.पी.ना सुरक्षा देण्या संबंधीचा विषय आहे. व्ही.आय.पी.ना सुरक्षा देण्या संदर्भात एसआयडीचा रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे आमची बैठक देखील झालेली आहे. आपणास भावनावश होऊन चालत नाही. त्यामध्ये धोके सुध्दा असू शकतात. एसआयडीच्या ॲसेसमेंट प्रमाणे सुरक्षा ठेवली जाईल आणि या संदर्भातील निर्णय 15 दिवसांत घेण्यात येईल.

सभापती महोदय, राम प्रधान समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या बाबत सरकारची काही मते आहेत. उदारहण सांगायचे झाले तर " पोलीस विभागाकडे दारु गोळा कमी आहे" असा राम प्रधान समितीचा निष्कर्ष आहे. तर "दारु गोळा आहे" असा सरकारचा निष्कर्ष आहे. राम प्रधान समितीच्या संदर्भात आपण जी समिती नेमलेली आहे त्यामध्ये दोन्ही बाजू तपासण्यात येतील. ज्या काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर करण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काल जो मुद्दा उपस्थित केला होता त्याचा उल्लेख आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला. ही गोष्ट खरी आहे की, सुरक्षे व्यवस्थेवरील हा अहवाल असल्यामुळे मी किंवा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्याशी चर्चा करावयास पाहिजे होती. पण तशी चर्चा झालेली नाही. परंतु या संदर्भातील शासन पध्दत पाहिली तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर केला जातो. परंतु अहवाल देणाऱ्यांशी चर्चा करण्यात येते असेही काही नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अहवालात जे लिहिता आले नाही ते त्यांना शासनाला सांगायचे होते असे राम प्रधान यांनी मुलाखती मध्ये सांगितले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राम प्रधान यांची मुलाखत मी देखील ऐकली आहे. आम्ही त्यांना त्याच दिवशी बोलाविण्याचा निर्णय घेतला होता. आम्ही त्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करणार आहोत. त्यांना आणखी काही सूचना करायच्या असतील तर त्याचा देखील विचार करण्यात येईल. एकदा अहवाल दिल्यानंतर त्यांच्याशी पुन्हा चर्चा केली असे पूर्वोदाहरण नाही. युतीच्या काळात न्यायमूर्ती श्रीकृष्ण यांनी अहवाल दिला

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.......

होता. त्यांना पुन्हा चर्चेसाठी बोलाविण्यात आले होते काय ? श्रीकृष्ण अहवाल सभागृहात भिरकावला, तुडवला. युती शासनाने न्यायमूर्ती श्रीकृष्ण आयोगाची काय बूज राखली होती ? त्यामुळे त्यांना आम्हाला मार्गदर्शन करण्याचा कोणता नैतिक अधिकार नाही.

अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एका महत्वाच्या प्रश्ना कडे लक्ष वेधले की तपासाची सद्य:स्थिती काय आहे ? मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, सेंट्रल एजन्सीने महाराष्ट्राचे पोलीस तपासाच्या बाबतीत योग्य ट्रॅकवर आहेत असे सांगितलेले आहे. काही आरोपींना पकडता येईल परंतु आम्ही कोणत्या संघटनेचे किंवा व्यक्तीचे नाव घेतले तर काही आरोपी निसटण्याची शक्यता आहे आणि त्यांना पुन्हा पकडणे मुश्किल होईल.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

त्यामुळे सभापती महोदय, तपास योग्य पध्दतीने चालू आहे. पोलिसांना रिझनेबल वेळ दिला पाहिजे. मी या ठिकाणी सांगितले की, महाराष्ट्रात घडलेले बॉम्बस्फोट सोडाच पण देशाच्या पातळीवर झ ाालेले बॉम्बस्फोट ज्या यंत्रणेने तपासले आहेत त्यांच्यामध्ये निश्चितपणाने ती क्षमता आहे. आपण त्यांना त्यांच्या पध्दतीने काम करु देण्याची मोकळीक द्यावी, अशी माझी विनंती आहे. तरच आपण आरोपी पर्यंत निश्चितपणाने पोहचू शकू. बॉम्बस्फोट होणार नाहीत या बद्दल तज्ज्ञांनी आतापर्यंत जे मार्ग सांगितलेले आहेत, त्या सर्वच्या सर्व मार्गाचा अवलंब करीत आपण या ठिकाणी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत आणि ज्या संस्थांचे सहकार्य मागितले आहे, त्या सर्वांचे सहकार्य घेऊन आपली मुंबई 100 टक्के सुरक्षित करण्यासाठी शासनाला जे करणे शक्य आहे ते करण्याचा प्रयत्न अगदी प्रामाणिकपणे केला जाईल अशी सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून जनतेला ग्वाही देऊ इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी एक विधायक सूचना केली होती. त्यामध्ये दोन मुद्दे आहेत. फोर्स-1 साठी लागणारी जागा आदिवासींच्या जमिनीमुळे शासनाच्या ताब्यात येऊ शकत नाही अशा प्रकारची अडचण निर्माण झालेली आहे. त्यामुळे फोर्स-1 ला चांगल्या ठिकाणी जागा देऊन तो विषय ताबडतोब निकाली काढावा.

सभापती महोदय, एटीएसला मॅनपॉवर कमी पडत आहे. मी काल खबऱ्यांचा विषय या ठिकाणी उपस्थित केला होता. ज्यावेळी खालचे अधिकारी खबऱ्यांचे जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न करतात पण त्याचवेळी टेन्युअरचा नियम लागू आहे. मागील दोन वर्षात आपण या टेन्युअरच्या मुद्याला स्पर्श केला होता. एटीएसला मॅनपॉवर देणे आणि एटीएसचा जो खबऱ्या आहे त्या खबऱ्यासाठी खालचा दोन नंबरचा जो अधिकारी आहे, त्याच्या टेन्युअर संबंधी थोडासा गांभीर्याने विचार केला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, माझा तिसरा मुद्दा असा आहे की, गस्ती नौका अपात्र आहेत अशा प्रकारचे पुरावे प्राप्त झालेले आहेत. त्या संबंधीचे पुरावे देण्यात आले आहेत पण त्यावर काहीही कारवाई झालेली नाही. म्हणून या अपात्र गस्ती नौकांना मान्यता देणारे अधिकारी कोण आहेत या संबंधीची चौकशी करुन त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय? स्फोटके पोहचविण्याच्या संदर्भात ठाणे जिल्हा हा टारगेट आहे तेव्हा त्या संबंधी विशेष काही उपाययोजना केलेली आहे काय?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जी माहिती मिळते त्यावर शासनामार्फत आणि पोलिसांमार्फत नेहमीच कार्यवाही केली जाते. पण प्रत्येकवेळी खरी माहिती मिळते अशातला भाग नाही. तीन लोक स्फोटासंबंधी बोलताना मी ऐकले अशा प्रकारचे माझ्याकडे एक पत्र आले होते. त्या संदर्भातील चोकशी करण्यासाठी पोलिसांना पाठविण्यात आले. त्या चौकशीमध्ये असे कळले की, त्या दोघांवर फौजदारी केसेस आहेत. त्यामुळे याचा फायदा घेऊन एकमेकांचा काटा काढण्याचा प्रयत्न करणारे खूप लोक आहेत. म्हणून नेहमीच कोणावर तरी संशय व्यक्त करण्याच्या संदर्भातील सर्व तक्रारी खऱ्या असतात असे नाही. पण त्यातील काही तक्रारी खऱ्या असतात. त्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाची कायमची यंत्रणा आहे. तरी देखील या दृष्टीने विशेष लक्ष ठेवण्यात येईल. ज्या बोटी घेतलेल्या आहेत त्या पूर्णपणे तपासल्या शिवाय आणि सर्टिफाय झाल्या शिवाय आम्ही त्या ताब्यातच घेत नाही. त्यामुळे सर्टिफाय न झालेल्या बोटी घेतल्या हा प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, एटीएसच्या संदर्भात जे अधिकारी तेथे राहण्यास इच्छूक आहेत, जे अधिकार एटीएस प्रमुखांच्या म्हणण्याप्रमाणे तेथे ठेवणे आवश्यक आहेत त्यांच्या बाबतीत हे सर्व नियम शिथिल केले जातील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अमोनियम नायट्रेटचा उपयोग स्फोटके तयार करण्यासाठी मोठया प्रमाणात केला जात आहे. या संदर्भातील मुद्दा आम्ही काल या ठिकाणी मांडला होता. या संदर्भातील माहिती आमच्याकडे आहे तशीच ती मंत्री महोदयांकडेही असेल. या अमोनियम नायट्रेटचा समावेश केंद्र सरकारच्या 1884 च्या एक्स्प्लोसिव्ह कायद्यात समाविष्ट करण्याबद्दलचा विषय गेले तीन वर्षे प्रलंबित आहे. फर्टिलायझर मिनिस्ट्रीने त्याला विरोध केला आहे. देशभरामध्ये 19000 कारखाने अमोनियम नायट्रेटचे उत्पादन करतात. तेव्हा शासन या बाबतीत काय करणार आहे याचा खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, सरकारशी आमचे 100 मतभेद असतील पण मंत्री महोदय, श्री. आर.आर. पाटील हे बॉम्बस्फोट झाला त्यावेळी विमानात होते. परंतु 15 ते 20 मिनिटात माननीय मुख्यमंत्र्यांचे सर्व वाहिन्यावरुन स्टेटमेन्ट आल्यामुळे गृह मंत्री

..2..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

मुंबईत नाहीत याची उणीव भासली नाही. माननीय मुख्यमंत्री यांनी सगळा कंट्रोल हातात घेतला होता. त्यामध्ये जरी त्रुटी असल्या तरी सुध्दा माननीय मुख्यमंत्री मुंबईत असल्यामुळे मुंबईला बरेचसे मार्गदर्शन मिळाले हे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अमोनियम नायट्रेटचा प्रश्न केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. त्यावर विचारही चालू आहे. आज अमोनियम नायट्रेट खत म्हणून वापरले जात असल्यामुळे ते सहज सगळीकडे उपलब्ध आहे, त्यामुळे ते स्फोटके तयार करण्यासठी वापरले जाते. ते वापरावयाचे नसेल तर त्याला सबस्टीटयुट काय? असाही प्रश्न निर्माण होऊ शकेल.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

परंतु राज्य सरकारच्या वतीने या बाबतीतील प्रलंबित निर्णय लवकर घेतला जावा म्हणून विनंती केली जाईल.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**सभापती** : या नंतर आपण लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला सुरुवात करु. पहिली लक्षवेधी सूचना घेतल्यानंतर दुपारी 1.30 वाजता आपल्याला अर्ध्या तासाची सुट्टी घ्यावयाची आहे. आज पासून आपण नियमाप्रमाणे व अशा पध्दतीने कामकाज करण्याचे ठरविले आहे की, सकाळी 11.00 ते दुपारी 1.30 या कालावधीतील कामकाज संपल्यानंतर दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत आपल्याला सुट्टी घ्यावयाची आहे. म्हणून आता आपण लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला सुरुवात करु. परंतु माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांची नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने नियम 97 अन्वये जी चर्चा घ्यावयाची आहे ती चर्चा शासकीय विधेयके पुर:स्थापित झाल्यानंतर सुरु करु. शासकीय विधेयके पुर:स्थापित करण्यासाठी 5-10 मिनिटे लागतील. ही चर्चा आपण आज घेत असल्यामुळे आजच्या कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये दाखविलेला जो प्रस्ताव आहे तो मी पुढे ढकललेला आहे. आता आपण पहिली लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 1.30 वाजण्यासाठी आता फक्त 9 मिनिटे शिल्लक राहिलेली आहेत. आपण 1.30 वाजता पहिल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा अपूर्ण ठेवणार का ?

**सभापती** : आपण पहिल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा सुरु करु.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, पहिल्या लक्षवेधी सूचनेशी संबंधित मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

**सभापती** : ठीक आहे. आपण अनुक्रमांक 4 वरील लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेला घेऊ.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कोयना-चांदोली अभयारण्याला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्याची आवश्यकता

**मु.शी.** : कोयना-चांदोली अभयारण्याला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील कोयना-चांदोली अभयारण्यात नुकत्याच करण्यात आलेल्या प्राणी गणनेत सर्वच प्राण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येणे, त्यातच पाच पट्टेरी वाघ व 30 बिबटे आढळून येणे, अशाप्रकारे वाघ्र प्रकल्पासाठी पोषक वातावरण असून देखील अद्यापपावेतो या अभारण्यास व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित केले नसल्यामुळे त्या परिसरातील प्राणीमित्रांमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, गरजेनुसार प्राण्यांना खाद्य दिले गेल्यास वाघांचे अस्तित्व टिकेल व त्यांच्या संख्येतही वाढ होण्यासाठी त्याचप्रमाणे हरणाच्या व सांबराच्या संख्येत आणखी वाढ होण्याच्यादृष्टीने खास उपाययोजना करण्याची आवश्यकता, या सर्व बाबी विचारात घेवून कोयना-चांदोली अभयारण्याला "व्याघ्र प्रकल्प" म्हणून घोषित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. पतंगराव कदम ( वने मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, या प्रकल्पामध्ये किती गावे पुनर्वसित करावयाची आहेत आणि त्यांचे पुनर्वसन किती दिवसात पूर्ण होणार ? या बाबतचा कालावधी माननीय मंत्री महोदय सांगू शकतील का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, चांदोलीमध्ये 33 गावे आणि कोयनेमध्ये 50 गावे अशी एकूण 83 गावे आहेत. प्रकल्पात पुनर्वसित झालेली गावे चांदोलीमध्ये 8 आहेत आणि कोयनेमध्ये 11 आहेत. अभयारण्यामुळे पुनर्वसित झालेली गावे चांदोलीमध्ये 18 आहेत आणि कोयनेमध्ये 15 आहेत. पुनर्वसित करावयाची गावे चांदोलीमध्ये 5 आहेत आणि कोयनेमध्ये 10 आहेत. अभयारण्यात कायम राहणारी गावे चांदोलीमध्ये 2 आहेत आणि कोयनेमध्ये 27 आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांना आणखी काही प्रश्न विचारावयाचे आहेत काय ?

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझे समाधान झाले आहे.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्र. 2 व 3 पुढे ढकलण्याबाबत**

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, वारकऱ्यांच्या झालेल्या मृत्यूच्या संदर्भामध्ये विधानसभेत आता चर्चा असल्यामुळे माझ्या विभागाशी संबंधित लक्षवेधी सूचना उद्या घेतल्या तर चांगले होईल.

**सभापती** : ठीक आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, गजानन महाराजांच्या पालखीतील यात्रेकरु मृत्यू पावले त्या संदर्भातील नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने मी नियम 97 अन्वये जी चर्चा मान्य केलेली आहे ती चर्चा 2.30 किंवा 3.00 वाजता सुरु करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. त्या मुळे दुपारी 4.30 ते 5.00 वाजताच्या दरम्यान त्या चर्चेवरील उत्तराच्या भाषणाला सुरुवात करण्यात येईल. त्या वेळी आपण सभागृहात उपस्थित राहावे. आपल्या ज्या दोन लक्षवेधी सूचना आहेत त्या कधी घ्यावयाच्या ?

श्री. आर. आर. पाटील : लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घ्याव्यात.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अकोले तालुक्याच्या संदर्भातील जी लक्षवेधी सूचना आहे ती महत्वाची आहे.

**सभापती** : अकोले तालुक्याच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे. त्या लक्षवेधी सूचनेवर जास्त चर्चा होईल. आपण उद्या सकाळी 10.30 ते 11.00 वाजताच्या दरम्यान ती लक्षवेधी सूचना घेतली तर त्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला अर्धा तास वेळ मिळेल.

श्री. आर. आर. पाटील : ठीक आहे.

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.00 वाजता पुनः भरेल.

( दुपारी 1.25 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास मी एक बाब आणू इच्छितो. विधानपरिषदेचे सभागृह हे कायदे मंडळाचा भाग आहे. या अनुषंगाने या सभागृहात विविध विधेयके चर्चेसाठी मांडण्यात येतात. त्या व्यतिरिक्त अन्य विषयावरील प्रस्ताव किंवा ठराव मांडले जातात. या प्रस्तावांसाठी किंवा ठरावांसाठी दररोज काही तास चर्चेसाठी उपलब्ध होणे गरजेचे असते. या बाबतीत माझी सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सर्व गट नेते यांच्याबरोबर एक दिवस चर्चा झालेली आहे. त्यानंतर दिनांक 9 जून, 2011 रोजी सन्माननीय मुख्यमंत्री व सन्माननीय उप मुख्यमंत्री यांना सुध्दा नियम समितीच्या बैठकीला बोलविले होते व त्या बैठकीत या संदर्भात सविस्तर चर्चा केलेली आहे. त्या बैठकीत सभागृहाची बैठक दररोज दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला होता. त्याची आजपासून अंमलबजावणी करावी अशी माझी अपेक्षा होती. त्याची सुरुवात आज दुपारी 1.30 ऐवजी 1.24 वाजताच आपण केली आहे. तसेच आठवड्यातील दुसऱ्या दिवशी सदनाची बैठक सकाळी 11 वाजता सुरु करण्याचा सुध्दा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या वेळी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सकाळी 11 ते दुपारी 1.30 पर्यंत प्रश्नोत्तराचा तास, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनांवर चर्चा, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेखाच्या सूचना व 15 मिनिटे शासकीय कामकाज होईल.

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 13:30

**सभापती**........

हे संपूर्ण कामकाज आपल्याला दुपारी 1.30 वाजेपर्यंत पूर्ण करावयाचे आहे. त्यानंतर अर्धा तास मध्यंतरासाठी सुट्टी घेऊन दुपारी 2.00 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंतच्या काळात विशेषत: शासकीय विधेयकावरील चर्चा आणि त्या व्यतिरिक्त महत्वाचे शासकीय व अशासकीय ठराव यावरील चर्चा घेण्यात येईल आणि शेवटी अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने कामकाज होईल. सायंकाळी 6.00 नंतर सभागृहाचे कामकाज घ्यायचे नाही असा मी निश्चित निर्णय घेतलेला आहे. याकरिता मला आपल्याकडून सहकार्य मिळणे गरजेचे आहे. एखाद्या कामकाजातील काही भाग अन्य कामामुळे राहिला तर पूर्वी मी या दृष्टीने बघत होतो की ते कामकाज रहीत करणे योग्य नाही. कारण एखादी लक्षवेधी सूचना सभागृहासमोर येणे किंवा कामकाज पत्रिकेत समाविष्ट होणे खूप दुरापास्त असते. अशा परिस्थितीत काही कारणाने ते कामकाज त्या दिवशी झाले नाही तर मला वाटते त्या दृष्टीने काही नियम पाळणे गरजेचे आहे. आज सुध्दा काही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात आलेल्या नाहीत. काल देखील सभागृहाने निर्णय घेतला होता की, प्रश्नोत्तराचा तास व इतर कामकाज घेतले जाऊ नये. सर्वांच्या चर्चेनुसार ते मी मान्य केले होते. आज सुध्दा माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सभागृहात उपस्थित नाहीत, कामकाज पत्रिकेमध्ये त्यांची एक लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेली आहे. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी ती लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात आली तर बरे होईल अशी विनंती केली. अशा पध्दतीने आपण सहमतीने कामकाज घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु आपण ही प्रथा पाळावयाची आहे. विशेषत: शासकीय ठराव, नियम 260 अन्वये चर्चेला येणाऱ्या प्रस्तावावर या सभागृहात काही वेळेला चार तास, पाच तास, सहा तास सुध्दा चर्चा झालेली आहे. सभागृहातील काही तरुण माननीय सदस्यांना वेळेअभावी बोलण्याची संधी मिळत नाही.

तीस वर्षापूर्वी मला सभागृहात बोलण्यासाठी तीन मिनिटांचा अवधी मिळत होता. माझे एक मिनिट विरोधी पक्षाकडील सदस्यांची आपल्याप्रती सहानुभूती किती आहे हे बघण्यामध्ये संपत असे व दुसरे मिनिट सत्ताधारी पक्षातील सदस्यांकडे बघण्यात जात असे आणि तिसऱ्या मिनिटाला माननीय अध्यक्षांकडून वेळ संपल्याची जाणीव करुन देण्यासाठी बेल वाजविली जायची आणि मी खाली बसत असे. नवीन सदस्यांना सभागृहात बोलण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यांना संधी कशी मिळेल हे पाहण्याचे काम विशेषत: विरोधी पक्षनेते व गटनेते यांचे आहे. म्हणून माननीय विरोधी

..2..

**सभापती**........

पक्षनेते आणि मी, आम्ही सर्वांनी असा निर्णय घेतला की, 2.30 तासाची चर्चा असेल तर त्यापैकी 30 मिनिटांचा कालावधी मंत्रीमहोदयांच्या उत्तरासाठी दिला जाईल. त्यांची वेळ निश्चित केल्यानंतर उर्वरित दोन तासाच्या वेळेबाबत आम्ही असे ठरविले आहे की, भारतीय जनता पक्षाकडून सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि त्या पक्षाचे इतर दोन प्रतिनिधी बोलतील. शिवसेना पक्षाचे गटनेते आणि त्या पक्षाचे इतर दोन प्रतिनिधी बोलतील. माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील आणि अन्य अपक्ष माननीय सदस्य आहेत त्यांच्यापैकी दोन प्रतिनिधी बोलतील. काँग्रेस पक्षाकडून गटनेते किंवा त्यांनी सुचविलेले प्रतिनिधी आणि त्या व्यतिरिक्त तीन प्रतिनिधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सुध्दा गटनेते किंवा त्यांनी सुचविलेले प्रतिनिधी आणि त्या व्यतिरिक्त तीन प्रतिनिधी बोलतील. कारण त्या पक्षांची सदस्य संख्या मोठी आहे. असे एकूण 16 माननीय सदस्य एका प्रस्तावावर दोन तासाच्या वेळेत आपली चर्चा पूर्ण करतील. ही चर्चा निश्चित केलेल्या वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनीच वेळेचे भान राखणे गरजेचे आहे.

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ठरवून दिलेल्या वेळेत जर सन्माननीय सदस्यांचे भाषण आटोपत नसेल तर ते कंट्रोलमध्ये आणण्याचे कसब पीठासीन अधिकाऱ्यांकडे असते. त्यांनी मनात आणले तर पहिल्यांदा बेल वाजविल्यानंतर बोलणाऱ्या सदस्याची एकाग्रता राहत नाही तर दुसऱ्यांदा बेल वाजविल्यानंतर ते सन्माननीय सदस्य आपले भाषण आटोपण्याच्या मन:स्थितीत येतात. पण मी तसे करणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सुध्दा त्यांना पक्षाने दिलेल्या वेळेच्या आधीच भाषण संपविण्याचा प्रयत्न करावा व मोजकेच मुद्दे मांडावेत. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व गटनेते यांची किमान पाच तास अशी दोन वेळा बैठक झाली, त्या बैठकीत साधकबाधक विचार करुनच ही कामकाजाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. त्या बैठकीला माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे सुध्दा उपस्थित होते. त्यात ठरल्याप्रमाणे विरोधी पक्षाचे एक प्रमुख वक्ते अधिक दोन सन्माननीय सदस्य, अपक्षांपैकी दोन सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून चार आणि कॉंग्रेस पक्षाचे चार सदस्य एवढेच लोक आपले विचार व्यक्त करतील. तसेच माननीय तालिका सभापतींनाही माझी अशी सूचना राहील की, कामकाजाची जी पध्दत आपण आता सुरु करीत आहोत ती आपल्याला अत्यंत काटेकोरपणे अवलंबावी लागेल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, मला वाटते या बैठकीत प्रस्तावावर बोलताना विरोधी पक्षातील गट नेते अधिक दोन किंवा तीन सदस्य आपले विचार मांडतील असे ठरविण्यात आले होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, आपण आता गट नेत्यांसह 4 सन्माननीय सदस्यांना बोलता येईल असे सांगितले.

**सभापती** : त्या बैठकीतील निर्णय असा होता की, विरोधी पक्षातील प्रमुख वक्ता आणि दोन सन्माननीय सदस्य, अपक्षांपैकी दोन आणि सत्ताधारी पक्षातील आठ असे 16 सदस्य आपले विचार मांडतील. त्यानुसार विरोधी पक्षाने आपल्या सन्माननीय सदस्यांची नावे द्यावीत.

डॉ. दीपक सावंत : महोदय, असे केले तर विरोधी पक्षावर अन्याय होईल.

**सभापती** : तसा अन्याय कोणावरही होणार नाही. कारण सत्ताधारी पक्षाला निम्मा वेळ आणि विरोधी पक्षाला निम्मा वेळ आपण देतो पण त्याचबरोबर आपल्याला अपक्षांचाही विचार करावा लागेल. हा निर्णय 9 जून, 2011 रोजीच्या बैठकीत झालेला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता आपण असे सांगितले की, अडीच तासाच्या चर्चेमध्ये अर्धा तास मंत्रिमहोदयांच्या उत्तरासाठी देण्यात आलेला आहे. म्हणजे राहिले दोन तास. या दोन तासातील प्रत्येकी एक-एक तास विरोधी व सत्ताधारी पक्षासाठी वाटण्यात आलेला आहे. एक तासामध्ये सत्ताधारी पक्षातील आठ सन्माननीय सदस्य बोलणार आहेत काय ? यात आपण मंत्रिमहोदयांचा उत्तराचा वेळ काढलेला आहे.

**सभापती** : मंत्रिमहोदयांचा वेळ आपण कायमच काढलेला असतो. पूर्वी पासून मंत्रिमहोदयांचा वेळ काढून राहिलेला वेळ दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना दिला जातो.

श्री.पांडुरंग फुंडकर : ठीक आहे. एका तासात विरोधी पक्षातील सहा सन्माननीय सदस्य बोलणार आहेत.

**सभापती** : एका तासात विरोधी पक्षातील सहा सन्माननीय सदस्य अधिक दोन जण बोलणार आहेत. मी आपले लक्ष 9 जून रोजीच्या प्रोसिडींगकडे लक्ष वेधतो.. प्रस्तावावरील चर्चेमध्ये भारतीय जनता पक्षाकडून विरोधी पक्ष नेते व दोन सदस्य, शिवसेना गट नेता व दोन सदस्य, अपक्ष दोन सदस्य अशा प्रकारे विरोधी पक्षाकडून एकूण 8 सदस्य आणि भारतीय काँग्रेस पक्ष गट नेते व तीन सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गट नेते व 3 सदस्य असे सत्तारूढ पक्षाकडून 8 सदस्य या प्रमाणे 16 सदस्य सहभाग घेतील असा निर्णय घेण्यात आला. विषयाचे सार्वजनिक महत्त्व व गांभीर्य विचारात घेऊन केवळ अपवादात्मक प्रसंगी विशिष्ट परिस्थितीत माननीय सभापतींच्या मान्यतेने हा नियम शिथिल करण्यात येईल. नियम समितीच्या 9 जूनच्या बैठकीमध्ये एकमताने हा निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे आपल्याला कामकाज करावयाचे आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, नियम समितीच्या बैठकीमध्ये घेतलेला निर्णय चांगला आहे. आम्ही सर्वजण सहकार्य करू. पण ज्या अर्धा तास चर्चा कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात येतात त्यांना न्याय मिळत नाही. अर्धा तास चर्चा कामकाजाच्या शेवटी असल्यामुळे त्यांना वेळच मिळत नाही. मागच्या अधिवेशनातील 45 अर्धा तास चर्चा प्रलंबित आहेत. या अर्धा तास सूचना या अधिवेशनात घेऊ असे कबूल केले होते. यासाठी आपण एक विशेष बैठक बोलवावी.

**सभापती** : त्या बैठकीमध्ये अशीही चर्चा झाली होती की, राहिलेल्या ज्या 41 अर्धा तास चर्चा आहेत त्या एके दिवशी वेळ काढून आपल्याला घ्यायच्या आहेत. त्या दिवशी या बाबत चर्चा झालेली आहे. त्या बरहुकूम होईल. आता आपल्याला दररोज ज्या अर्धा तास चर्चा असतील त्या त्याच वेळी घ्याव्या लागतील.

श्री.विक्रम काळे : होय.

......

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: भिवंडी येथे पीसीओ चालविणाऱ्या व्यक्तिकडून एक लाख सिम कार्डस जप्त करणे

**मु.शी.**: भिवंडी येथे पीसीओ चालविणाऱ्या व्यक्तिकडून एक लाख सिम कार्डस जप्त करणे या बाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधी सूचना मांडतो :-

मी कालच्या चर्चेत या मुद्याचा उल्लेख केला होता. आज आपण सांगितल्या मुळे मी तो मुद्दा पुन्हा येथे मांडत आहे. गेल्या आठवडयात भिवंडी येथे अन्वर बबलु हया पीसीओ चालविणाऱ्या व्यक्तीकडून 1 लाख सिमकार्डस् जप्त करण्यात आले. हया सिमकार्डचा वापर आंतरराष्ट्रीय कॉल करण्यासाठीही केला जात होता. ही सिमकार्डस् सर्व्हीस प्रोव्हायडर कंपन्यांची आहेत. आपला धंदा वाढविण्यासाठी अशाप्रकारे हया कंपन्या मोठया प्रमाणावर शहानिशा न करता सिमकार्डस्चे मार्केटिंग करते. मुंबईवर होणारे हल्ले आणि त्यांचा दहशतवाद्यांशी असलेला संबंध ह्या साठी सिमकार्डसचा सर्रास वापर होत आहे. मोबाईलवरुन केलेल्या कॉलची नोंद ATS तपासत असते. परंतु एवढया प्रचंड प्रमाणावर सिमकार्डस् वाटली जात असतील तर संभाव्य धोके मोठया प्रमाणात वाढू शकतात. हया बाबतीत वेळीच सतर्क होवून राज्य सरकारने केंद्राच्या मदतीने तातडीने उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे.

-------

..4

**पृ.शी.**: गोंदिया जिल्ह्यात एचआयव्ही बाधित रूग्णांची संख्या वाढणे
**मु.शी.**: गोंदिया जिल्ह्यात एचआयव्ही बाधित रूग्णांची संख्या वाढणे
या बाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स.यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधाची सूचना मांडतो :-

"गोंदिया जिल्हयात एचआयव्ही बाधीत रुग्णांची संख्या दिवसेंदिवस झपाटयाने वाढत आहे. यात गोंदिया जिल्हयातून जाणा-या राष्ट्रीय राज्य मार्ग क्र.6 जवळील गावांत, मोठया प्रमाणात एचआयव्ही बाधीत रुग्णांची संख्या आढळली आहे. कारण सदर राज्यमार्गावर मुंबई-हावडा दरम्यान ट्रक चालविणाऱ्या चालक व वाहकांचा, रस्त्याला लागून असलेल्या गावांतील महिलांशी नेहमी संपर्क होणे, सदर महिलांच्या माध्यमातून संबंधित रोगाचा प्रसार त्यांच्या कुटुंबामध्ये होणे, त्यामुळे एचआयव्ही बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. यासाठी ग्रामीण क्षेत्रातून गोंदिया जिल्हयात अधिवासासाठी आलेले नागरीक सुध्दा जबाबदार आहेत.

.....श्री सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागातर्फे उघडलेल्या आयसीटीसी व पीपीटीसीटी केंद्रामधून जिल्ह्यात 1 हजार 744 व्यक्ती एचआयव्ही बाधित असल्याचे निष्पन्न होणे, त्यामुळे जिल्ह्यात आणि संपूर्ण राज्यात अशा प्रकारचा व्यवसाय तात्काळ थांबवून पर राज्यातून अधिवासासाठी आलेल्या नागरिकांची प्रथम आरोग्याची चाचणी करण्यासाठी वर्षभर मोहीम राबविण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेता, शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व यावर शासनाने करावयाचे निवेदन."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विदर्भामध्ये पोलीस अधिकाऱ्यांची भासत असलेली कमतरता

**मु. शी.** : विदर्भामध्ये पोलीस अधिकाऱ्यांची भासत असलेली कमतरता याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

या वर्षी गृह विभागाने राज्यामध्ये 208 पोलीस उपनिरिक्षकांच्या मे 2011 मध्ये बदल्या केल्या. त्या करीत असतांना त्यामध्ये विदर्भातील जवळपास 99 उपनिरीक्षकांचा समावेश करण्यात आला. त्या पैकी फक्त 34 उपनिरीक्षकांना पुन्हा विदर्भातच नियुक्ती देण्यात आली. उर्वरित 65 उपनिरीक्षकांना विदर्भाबाहेर पाठविण्यात आले. नागपूर शहरामधील 36 उपनिरीक्षकांच्या बदल्या करुन त्यांच्या जागी फक्त एकच उपनिरीक्षक देण्यात आला. विदर्भ म्हटला की, त्यामध्ये गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद आणि वाढती दरोडेखोरी व अन्य प्रकारचे दंगे विचारात घेता त्या ठिकाणी जास्तीत जास्त उपनिरीक्षकांची नियुक्ती होणे गरजेचे आहे. ज्या 36 उपनिरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत, त्यांच्या जागेवर ताबडतोब नवीन उपनिरीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी मागणी करते.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ AKN/ MMP/

**पू. शी.** : पुणे जिल्ह्यातील बारामती येथील महिला स्वीकार केंद्रातील महिलेवर करण्यात आलेला बलात्कार

**मु. शी.** : पुणे जिल्ह्यातील बारामती येथील महिला स्वीकार केंद्रातील महिलेवर करण्यात आलेला बलात्कार याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"सभापती महोदय, पुणे जिल्हयातील बारामती येथील महिला स्वीकार केंद्रामध्ये राहणाऱ्या एका महिलेने बारामती बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. पोपट गांधी यांच्याकडे स्वत:च्या पोटगीसाठी दावा दिला होता. त्यांच्यामध्ये परिचय वाढत गेल्यानंतर त्या महिलेशी लग्न करण्याचे आश्वासन या बार असोसिएशनच्या अध्यक्षांनी दिले. त्यानंतर या अध्यक्षाने त्या महिलेच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन जयहिंद बाजारजवळील खोलीमध्ये तसेच रुई जळोची येथील भाडोत्री खोलीमध्ये तिच्यावर वारंवार बलात्कार केला. त्याबद्दल या महिलेने दिनांक 24.7.2011 रोजी बारामती पोलीस स्टेशनमध्ये या अध्यक्षांविरुध्द तक्रार दाखल केली आहे. यामुळे या बारामती बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. पोपट गांधी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा अशी माझी मागणी आहे. त्याचबरोबर महिला स्वीकार केंद्रामध्ये राहणाऱ्या या महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिची फसवणूक करण्याचा प्रकार घडला आहे. हा जो प्रकार घडला आहे त्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करीत असतांना बरीचशी यंत्रणेकडून टाळाटाळ करण्यात आली आहे. विशेषत: कायद्याचा आधार घेऊन लोकांची बाजू मांडणारे वकील आणि बार असोसिएशनचे अध्यक्ष हे यामध्ये गुंतलेले असल्यामुळे ॲड. पोपट गांधी यांच्यावरील आरोपांची सी.आय.डी.तर्फे चौकशी करण्यात यावी याकडे मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आनंदवाडी प्रकल्प पूर्ण करणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आनंदवाडी प्रकल्प पूर्ण करणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"कोकणात सुमारे 15 टक्के मच्छीमार बांधवाची संख्या आहे. कोकणातील मच्छीमारांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मच्छीमार प्रक्रिया केंद्र, शीतगृह इत्यादी सुविधांसाठी तालुका देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग येथे सन 2001-2002 मध्ये "आनंदवाडी प्रकल्प" प्रस्तावित करण्यात आला होता. या प्रकल्पासाठी शासनाने सुमारे 40 कोटी निधीची तरतूद केलेली आहे. त्यापैकी आजतागायत फक्त सुमारे 7 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, देवगड, वेंगुर्ला, कुडाळ, वैभववाडी येथील मच्छीमारांना योग्य तो न्याय मिळणार आहे. परंतु हा प्रकल्प अर्धवट सोडण्यात आलेला आहे. तरी शासनाने हा प्रकल्प त्वरित कार्यान्वित करुन मच्छीमार बांधवांना न्याय मिळवून द्यावा अशी मी या सभागृहास विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे विनंती करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वरसोली (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील विठोबा देवस्थान तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करणे

**मु. शी.** : वरसोली (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील विठोबा देवस्थान तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"वरसोली (ता. अलिबाग, जिल्हा रायगड) येथील श्री क्षेत्र विठोबा देवस्थान हे सरदार आंग्रे कालीन असून या देवस्थानाला सुमारे 200 वर्षे झाली आहेत. देवस्थानाच्या ठिकाणी वेगवेगळे उत्सव होतात. तसेच दर कार्तिकी एकादशीला पाच दिवसांची मोठी यात्रा भरते.

या यात्रेला सुमारे तीन ते साडे तीन लाख लोकांची ये-जा असते. आषाढी एकादशीला देखील सुमारे 50 हजार भक्तगण या ठिकाणी भेट देतात. वरसोली हे गाव समुद्र किनाऱ्या लगत असल्यामुळे पर्यटकसुध्दा मोठया संख्येने देव दर्शनासाठी येतात.

अशा या निसर्गरम्य ठिकाणी भक्तगणांची व यात्रेकरुंची सोय होण्यासाठी आवश्यक असणारे भक्तनिवास बांधणे आवश्यक आहे.

तरी वरसोली (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील श्री क्षेत्र विठोबा देवस्थान तीर्थक्षेत्र म्हणून घोषित होऊन शासनाने या क्षेत्राला निरनिराळया सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधीत आहे".

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ AKN/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:25

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

त्याठिकाणी 50 हजार भक्तगण येतात. अशा नैसर्गिक ठिकाणी भक्तांची सोय होण्यासाठी भक्त निवास बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे वरसोली ता.अलिबाग, जि.रायगड येथील श्रीक्षेत्र विठोबा देवस्थान हे तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करुन शासनाने त्यांना निरनिराळ्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. त्याठिकाणी काँग्रेसचे कार्यकर्ते श्री. रमेश नाईक हे या देवस्थानचे विश्वस्त आहेत आणि त्यांनी याची सुंदरपणे देखभाल केलेली आहे. त्यामुळे सदरहू देवस्थान हे तीर्थक्षेत्र म्हणून जाहीर करावे आणि सभापती महोदय, आपण त्याप्रमाणे शासनाला निदेश द्यावेत.

----

. . . .2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातून मिळणाऱ्या पाण्याची गळती मोठया प्रमाणात होत असून समान पाणीपुरवठ्याची यंत्रणा उभारण्याची आवश्यकता

मु.शी. : पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातून मिळणाऱ्या पाण्याची गळती मोठया प्रमाणात होत असून समान पाणीपुरवठ्याची यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, केवळ राजकारणामध्ये अडकल्यामुळे पुणे शहराला 24 तास पाणी पुरवठ्याच्या योजनेच्या संबंधातील विषय 2007 पासून प्रलंबित राहिलेला आहे आणि त्याठिकाणी पाण्याची गळती होत असते. तसेच पुणे शहराला समान प्रमाणामध्ये पाण्याचे वाटप व्हावे यादृष्टीकोनातून पुणे महानगरपालिकेकडे 2007 मध्ये त्यावेळचे तत्कालीन महापालिका आयुक्त श्री.प्रवीणसिंह परदेशी यांनी प्रस्ताव मागितले होते आणि त्याप्रमाणे निविदा देण्याच्या दृष्टीने सर्व प्रक्रिया सुरु झाली. त्यानंतर 12 कंपन्यांनी निविदा अर्ज नेले. मात्र प्रत्यक्षात 12 कंपन्या एकत्र आल्या आणि एकच निविदा भरण्यात आली.त्यानंतर सुध्दा दोन वेळा,तीन वेळा विविध कंपन्यांच्या मध्ये टाटा कन्सल्टन्सीने 36.71 एवढया दराची निविदा भरली.परंतु ती देखील रद्द करण्यात आली आणि परत नवीन प्रक्रिया सुरु झाली. यामध्ये प्रश्न असा आहे की,या सगळयामुळे निविदेवरील खर्च वाढत आहे. त्याचबरोबर पुणे शहरामध्ये पाण्याच्या गळतीची जी मूळ कारणे आहेत आणि त्यासाठी जे काम करावयास पाहिजे ते प्रत्यक्षात होत नाही. म्हणून 24 तास पाण्याच्या योजनेकडे पुणे महापालिका ही निविदा प्रक्रियेबाबत प्रचंड वेळ लावत असल्यामुळे पुणेकरांच्या अधिकारांवर अतिक्रमण झालेले आहे. त्यामुळे याबाबत महाराष्ट्र शासनाने हस्तक्षेप करावा या दृष्टीकोनातून मी सदरहू विशेष उल्लेख मांडलेला आहे.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अमरावती जिल्ह्यातील मेळघाट या कुपोषित परिसराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी विशेष अधिकार असलेला प्रशासकीय अधिकारी नेमणे

मु.शी.: अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा कुपोषित परिसराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी विशेष अधिकार असलेला प्रशासकीय अधिकारी नेमणे याबाबत श्री.हेमंत टकले वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मेळघाटच्या परिसरामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कुपोषण व बालमृत्यू या समस्या जटील झालेल्या आहेत. हा परिसर सर्वात बिकट आहे.अशा वेळी केवळ आरोग्य विभागानेच या परिसरामध्ये मोहीम हाती घेऊनही या प्रश्नाची उकल होऊ शकलेली नाही. यासाठी मेळघाट मधील सर्व समस्या देखील सोडविल्या पाहिजेत. या भागातील बाराही गावांमध्ये पक्के रस्ते नाहीत, 40 गावांमध्ये वीज नाही.तेथे मराठी भाषेतून शिक्षण दिले जाते.परंतु तेथील लोकांची भाषा कोरकू असल्यामुळे तेथील आश्रमशाळांची दैना झालेली आहे.तेथे बालविकास केंद्रे कार्यान्वित झालेली नाहीत. या परिसरातील शेती मागासलेली आहे. स्वस्त धान्य दुकानात तीन ते चार महिने धान्य उपलब्ध नसते. तेथे रोजगार, शिक्षण आणि पोषण याविषयी गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाने या समस्येवर टिकाऊ उपाययोजना करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रशासन, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण, वीज पुरवठा, रोजगार, ग्रामीण विकास, स्वस्त धान्य पुरवठा, एकात्मिक बालविकास योजना यामध्ये उत्तम समन्वय साधून विशेष अधिकार असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक करुन हे जटील प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्यात यावे अशी सूचना मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

-----

. . . .2 आय-4



श्री.खोटरे : सभापती महोदय, मला विशेष उल्लेख मांडावयाचा आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना विशेष उल्लेख मांडण्यास परवानगी द्यावी.

**तालिका सभापती** : विशेष उल्लेखाच्या ज्या सूचना स्वीकारण्यात आलेल्या आहेत, त्याच याठिकाणी सदनामध्ये मांडण्यात येतील. बाकीच्या विशेष उल्लेखाच्या सूचना उद्या मांडण्यात याव्यात.

. . . .2 आय-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>शासकीय विधेयके</u>

**पृ.शी.**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,

2004 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक

L.C. BILL NO. VI OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE SHREE SAI BABA SANSTHAN TRUST (SHIRDI) ACT, 2004)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक - 6 श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, 2004 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक - 6 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

यानंतर श्री.शिगम अ. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर सुधार प्रन्यास (सुधारणा ) विधेयक

L.C. BILL No. VII OF 2011.

(A BILL FURTHER TO AMEND THE NAGPUR IMPROVEMENT TRUST ACT, 1936.)

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 7 - नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम, 1936 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** :अनुमती देण्यात आली आहे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 20111 चे वि.प.वि. क्रमांक-7 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

..2..

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जालना जिल्ह्यातील पारनेर फाट्या जवळ कंटेनरने दिलेल्या धडकेमुळे 12 वारकऱ्यांचा झालेला मृत्यू आणि त्यानंतर जमलेल्या जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन जणांचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: जालना जिल्ह्यातील पारनेर फाट्या जवळ कंटेनरने दिलेल्या धडकेमुळे 12 वारकऱ्यांचा झालेला मृत्यू आणि त्यानंतर जमलेल्या जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोन जणांचा झालेला मृत्यू या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रणजित पाटील, रामनाथ मोते, पाशा पटेल, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी अडीच तास वेळ दिलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील. सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह ही चर्चा संपवावयाची आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय,मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

ज्याअर्थी, सोमवार, दिनांक 25 जुलै 2011 रोजी पंढरपूरहून पांडुरंगाचे दर्शन घेऊन वारकरी परत येत असताना, जालना जिल्ह्यातील पारनेर फाट्याजवळ एका कंटेनरने धडक दिल्याने 12 वारकरी मृत्युमुखी पडणे आणि,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ज्याअर्थी, काहीही चूक नसताना केवळ कंटेनर चालकाच्या चुकीमुळे 12 वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यामुळे अंबड तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेमध्ये असंतोष निर्माण होणे आणि ,

ज्याअर्थी, गजानन महाराज संस्थानतर्फे वारीच्या मार्गावर असणा-या सर्व पोलीस ठाण्यांना या दिंडीची आगावू सूचना दिली जाणे व त्या प्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात या दिंडीला पोलीस संरक्षण मिळणे आणि,

ज्याअर्थी, सूचना देऊन सुध्दा जालना जिल्ह्यामध्ये वारकऱ्यांना पोलीस संरक्षण प्रशासनाने न दिल्यामुळे व त्यानंतर निरपराध वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यामुळे पारनेर फाटा परिसरातील जनतेने रस्ता रोको करीत प्रशासनाच्या विरोधात घोषणा देणे आणि,

ज्याअर्थी, गुन्हेगारावर कारवाई करताना मागे पुढे पाहणाऱ्या पोलीस प्रशासनाने स्वत:च्या चुकीमुळे संतप्त झालेल्या जमावाला पांगविण्यासाठी गोळीबार करणे आणि,

ज्याअर्थी, गोळीबारामध्ये दोन निष्पाप गावकरी मृत्युमुखी पडून तिघेजण गंभीररित्या जखमी होणे आणि,

ज्याअर्थी, प्रशासनाच्या या सुलतानी कृतीमुळे महाराष्ट्रातील संपूर्ण जनते मध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे,

त्याअर्थी, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषया बाबत चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला करुन या अतिशय जिव्हाळ्याच्या व ज्वलंत विषयावर चर्चा करण्यात यावी."

सभापती महोदय, वारकऱ्यांच्या दृष्टीने दिनांक 25 जुलै 2011 हा अतिशय काळाकुट्ट दिवस उगवला. आषाढी एकादशीला महाराष्टातूनच नव्हे तर बाजूच्या कर्नाटक राज्यातून देखील लाखो भाविक पांडुरंगाच्या दर्शनासाठी येत असतात. काही दिंड्या 200-400 कि.मी.अंतर पायी चालत पंढपूरला पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी येतात. हे एक असे संस्थान आहे की, ज्या ठिकाणी सर्वसामान्य माणूस सुध्दा वारीत सामील होतो.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, संत तुकाराम महाराजांच्या दिंडीला 300 वर्षे पूर्ण झाली आहेत. ज्ञानेश्वर माऊलीच्या दिंडीला 400 वर्षे पूर्ण झाली आहेत. या राज्यात वारकरी 400 वर्षे पायी चालत आहे.वारकरी पायी चालत असताना शिस्तीत चालतात. कुठेही कोणाला अडचण होऊ देत नाहीत. परंतु दिवसेंदिवस या राज्यातील अपघाताचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. या अपघाताच्या वाढत्या प्रमाणाने या वारकऱ्यांना सुध्दा आता सोडलेले नाही. 25 तारखेची घटना अत्यंत दुर्दैवी आणि विदारक अशा प्रकारची आहे. संत गजानन महाराजांची पालखी आताच पंढरपूरला जात नाही. संत गजानन महाराजांचे शेगाव हे माझ्या मतदारसंघात आहे. मंत्री महोदय, श्री. सतेज पाटील आपला त्या संस्थानाशी फार निकटचा संबंध आहे. गेली 44 वर्षे ही दिंडी अतिशय शिस्तीमध्ये पंढरपूरला जाते. पंढरपूरला गेल्या नंतर पाच ते सहा दिवस तेथे मुक्काम करुन ही दिंडी तेथून निघते. या दिंडीची शिस्त संत गजानन महाराज या संस्थानाने फार चांगल्या तऱ्हेने जोपासलेली आहे. 44 वर्षाच्या दिंडीतून या एकादशीला वारकरी अतिशय आनंदामध्ये जात होते. मी पंढरपूरला गेल्या नंतर संत गजानन महाराज संस्थानमध्ये या दिंडीच्या दर्शनासाठी गेलो होतो, त्यावेळी रात्री 3.00 वाजता नगरप्रदक्षिणेसाठी ही दिंडी निघाली होती. रात्रीचे 3.00 वाजलेले असताना सुध्दा वारकरी त्याच शिस्तीमध्ये, त्याच उत्साहामध्ये त्या दिंडीमध्ये सामील झालेले होते. परतीच्या प्रवासामध्ये दर्शनाचे एक समाधान, दिंडीत चालल्याचे समाधान घेऊन ते वारकरी आपल्या घराकडे परतत होते.

सभापती महोदय, संस्थानचे अध्यक्ष श्री. शिवशंकर भाऊ पटेल यांच्याशी मी फोनवरुन संपर्क केला. खरे म्हणजे त्या संस्थानाशी माझाही निकटचा संबंध आहे. मी देखील तेथील वारकरी आहे. संस्थानाच्या संदर्भात अनेक वेळा आमच्या चर्चा होतात. या संस्थानाची एक पध्दत आहे. वारीला सुरुवात करण्यापूर्वी ज्या ज्या जिल्हयातून ही दिंडी जाते त्या जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांना आणि जिल्हाधिकाऱ्यांना संस्थानामार्फत एक पत्र पाठविण्यात येते. या तारखेला ही दिंडी या गावात येईल. तुमच्या जिल्हयात अमुक ठिकाणी मुक्काम असेल, अमुक ठिकाणी जेवण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

होईल अशा प्रकारचा या दिंडीचे संपूर्ण टाईम-टेबल जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलीस अधीक्षकांना कळविण्यात येते. मला कालच श्री. शिवशंकर भाऊ पटेल यांनी सांगितले की, सोलापूर जिल्हयात एस.पी. आणि जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आमची चांगली दखल घेतली. दिंडीने सोलापूर जिल्हा पार करे पर्यंत आणि दिंडीला निरोप देईपर्यंत त्यांनी चांगल्या पध्दतीने व्यवस्था केली आणि संरक्षण दिले. त्यानंतर आम्ही बीड जिल्हयात आलो. बीड जिल्हयातही त्याच पध्दतीने व्यवस्था झाली. पण जालना जिल्हयात मात्र एकही पोलीस फिरकला नाही. दुपारी 3.00 वाजता पारनेर फाटयाजवळ जेवण केल्यानंतर थोडासा विश्राम करावा म्हणून ती दिंडी रस्त्याच्या कडेला थांबली. दिंडीतील वारकरी झाडाचा आडोसा घेऊन विश्राम करीत होते. दुपारी 3.00 वाजता एक कंटेनर सुसाट वेगाने आला. या कंटेनरचा ड्रायव्हर दारु प्यायलेला होता त्यामुळे तो कंटेनर सुसाट वेगाने रस्त्याच्या कडेला विश्राम करीत असलेल्या वारकऱ्यांना चिरडत पुढे जात होता. त्यामध्ये 13 वारकऱ्यांच्या शरीराच्या अक्षरशः चिंधडया झाल्या.ते जागेवरच ठार झाले आणि इतर 60 ते 70 वारकरी जखमी झाले. हा अपघात इतका भीषण होता की, एका क्षणापूर्वी आनंदात असलेल्या त्या वारकऱ्यांना, हरीनामाचा गजर करीत असलेल्या वारकऱ्यांना एक क्षणात नियती आपल्यापुढे काय वाढेल याची कल्पना नव्हती. ते घरी जाण्याच्या आनंदात होते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

क्षणार्धात नियतीने क्रूर खेळ केला आणि त्या कंटेनरच्या ड्रायव्हरच्या रुपाने नियतीने या 13 वारकऱ्यांना चिरडून टाकले. ही अत्यंत हृदयद्रावक घटना आहे. दु:ख याचे आहे की, गेल्या 44 वर्षात या वारीतील एका वारकऱ्याचा मृत्यू झालेला नसताना अशी घटना या वेळी घडलेली आहे. अपघातात तर सोडाच पण आजारपणामुळे सुध्दा पूर्वी या वारीतील कोणत्याही वारकऱ्याचा मृत्यू झाला नाही.

सभापती महोदय, या वारीमध्ये सामील होणाऱ्या लोकांचा वयोगट पाहिला तर 20 वर्षापासून 60 वर्षे वयापर्यंतचे लोक या वारीमध्ये असतात. हे जे वारकरी ठार झाले त्यांचा वयोगट काय होता याची परवा मी माहिती घेतली. ते 30 वर्षाच्या आतील तरुण होते. 30 वर्षाच्या वरील कोणीही नव्हते. कोणी 22 वर्षाचे, कोणी 25 वर्षाचे तर कोणी 27 वर्षाचे होते. असे 30 वर्षाच्या आतील तरुण यामध्ये चिरडले गेले. रस्त्यावर आणि फाट्यावर साहजिकपणे दिंडींचे स्वागत प्रचंड प्रमाणावर होत असते. दर्शनासाठी लोकांची रीघ लागते. साहजिकच त्या ठिकाणी ताबडतोब जमाव जमला आणि त्यानंतर तो जमाव आटोक्याच्या बाहेर गेला. ही चर्चा यासाठी घडवून आणली की, याला जबाबदार कोण ? याला पोलीस खाते जबाबदार आहे, महसूल खाते जबाबदार आहे की ट्राफीक विभाग जबाबदर आहे ?

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ साहेबांना धन्यवाद देईन. त्यांनी काल मला लगेच एक पत्र दिले. त्या पत्रामध्ये त्यांनी असे लिहिले की, जालना-अंबड-वडगोदरी हा रस्ता क्रमांक 176 असून लांबी 55 किलोमीटर आहे. अपघाताची घटना वरील रस्त्यावर जालन्यापासून 25 किलोमीटरवर अंबडपासून 5 किलोमीटरवर झाली आहे. अपघातस्थळी रस्ता डांबरी पृष्ठभागाचा 7 मीटर रुंदीचा दुपदरी आहे. रस्ता वाहतुकीस योग्य आहे. रस्ता अरुंद नाही. बहुतांश लांबीत खड्डे भरलले आहेत. हा रस्ता बीओटीखाली करण्यात आला असून सवलतीचा कालावधी संपल्यामुळे टोल बंद आहे. मी त्या रस्त्याने अनेकदा जातो. वारकरी रस्त्याच्या साईडपट्टयांवर विश्रांती घेत होते. ट्रेलर चालकाने निष्काळजीपणाने ट्रेलर चालवून साईडपट्टयांवर विश्रांती घेत असलेल्या वारकऱ्यांना चिरडले. तो थांबला नाही. त्यानंतर पुढे 10

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ AKN/

श्री. पांडुरंग फुंडकर ...

किलोमीटर प्रवासात त्याने दोन मोटारसायकलस्वारांना ठोकर दिली व त्यानंतर लोकांनी तो ट्रेलर थांबविला.

सभापती महोदय, मला कधी कधी असे वाटते की, या महाराष्ट्रातील आपले ट्राफिक कंट्रोल खाते काय करते ? आपले आर.टी.ओ. काय करतात ? एका आर.टी.ओ.ची बदली करावयाची असेल तर 50-50 लाख रुपये त्यांना मोजावे लागतात अशी आमची माहिती आहे. ते कंटेनरला पकडत नाहीत कारण त्यांच्याकडून पैसे मिळतात. दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांना शिक्षा करण्याच्या बाबतीत आपण कायदा केला. आपल्या ट्राफिक पोलीस मोटारसायकलवाल्यांना, स्कुटरवाल्यांना थांबवितात. शाळेच्या बसला थांबवितात. खरे म्हणजे शाळेची बस गावातल्या गावात फिरणाऱ्या असतात. माझ्या गावामध्ये शाळेच्या बसला पकडले. त्या बसमध्ये छोटीछोटी 22 मुले होती. त्याच्याकडे 25 मुलांचे लायसन्स असते. ट्राफिक पोलीस त्यांच्याकडून पैसे मागत होते. 1 हजार रुपये घेऊन ये तुला वर्षभर विचारणार नाही, असे त्यांना सांगत होते. अशा पध्दतीने ट्राफिक विभागाचे कर्मचारी काम करतात. काळीपिवळीच्या बाबतीत सुध्दा विचार करण्याची आवश्यकता आहे. सुशिक्षित बेरोजगार असलेले तरुण बँकेचे कर्ज घेऊन काळीपिवळी चालवून गुजारा करतात. 8 सीट्स जरी असल्या तरी 10 सीट्स खोट्या दाखविल्या जातात आणि त्यांच्याकडून पैसे मागितले जातात. आपण ट्राफिक विभागाला हेच काम दिलेले आहे का ? आपले ट्राफिक पोलीस हे केवळ हप्ते जमा करत रस्त्यावर कंटेनरवाल्यावर, बसवाल्यांवर भरदिवसा दरोडे घालत असतात. हे कोण पाहणार आहे ? ही जबाबदारी ट्राफिक विभागाने स्वीकारली पाहिजे अशी माझी मागणी आहे. तेथील जमाव संतप्त झाला आणि ते साहजिकच आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

संत गजानन महाराज यांच्यावर लोकांची अपार श्रध्दा आहे. नुकतीच त्यांची जन्म शताब्दी झाली आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांच्या पिताश्रींची व माझी भेट झाली होती. संपूर्ण हिंदुस्थानातून 10 लाख लोक त्या ठिकाणी आले होते. पण त्या ठिकाणी पोलिसांची मदत घेण्याची वेळ आली नाही. इतक्या शिस्तीमध्ये जाणारा भाविक व वारकरी वर्ग आहे. दरवर्षी पंढरपूर येथे 10-10 लाख वारकरी जातात. परंतु तेथे कधीही पोलिसांना अडचण येत नाही. एवढ्या शिस्तीमध्ये राहणारा हा वारकरी संप्रदाय आहे. अशा वारकऱ्यांना एका कंटेनरने चिरडले आहे. त्या कंटेनरला आरटीओने रोखण्याची जबाबदारी होती, परंतु त्यांनी त्याला रोखले नाही. तेथे असलेल्या रस्त्याला दोष देण्याची गरज नाही. कारण मी त्या रस्त्याने अनेकदा गेलेलो आहे. तो रस्ता वाईट नाही. इतकेच आहे की, त्या रस्त्याचे चौपदरीकरण झाले पाहिजे अशी त्या भागातील लोकांची मागणी आहे. ती मागणी शासनाने लवकर पूर्ण करावी. या कंटेनरने त्या लोकांना चिरडून टाकले आहे. वारकऱ्यांच्या जीवनामध्ये अशा प्रकारची घटना क्वचित घडते. या घटनेत जे मरण पावले आहेत त्यातील दुर्दैवी मुले केवळ 25-30 वर्षे वयाची होती. त्यांनी काय पाप केले होते ? पंढरपूरला पायी जाऊन दर्शन करुन पुन्हा आपल्या घरी परतत असताना त्यांच्या नशिबी हा अपघात आला आहे. हा दु:खद प्रसंग आहे. त्यामुळे मी अधिक बोलणार नाही.

सभापती महोदय, त्या ठिकाणी पोलिसांनी गोळीबार केला आहे. माझी अशी माहिती आहे की, गोळीबार करण्यासाठी पोलीस अधीक्षक तयार नव्हते, परंतु जिल्हाधिकारी ऐकण्यास तयार नव्हते. गोळीबार करण्याचा आदेश मुंबईहून आपण दिला होता काय, पोलिसांनी जमावाला शांत करण्याचे सोडून गोळीबार केला. त्यामुळे जमाव संतप्त झाला. त्यानंतर गाड्या पेटविल्या गेल्या. त्यापूर्वी गाड्या पेटविल्या नाहीत. त्यामुळे याची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. वारीला जाणाऱ्या दिंड्या आहेत त्या संदर्भात माझी शासनाला सूचना आहे. ज्या ज्या दिंडीने संरक्षण मागितले असेल त्यांना संरक्षण दिले पाहिजे. तुकाराम महाराजांची दिंडी असेल, ज्ञानेश्वर महाराजांची दिंडी असेल, गजानन महाराजांची दिंडी असेल, भास्करगिरी महाराजांची दिंडी असेल या सर्व दिंड्या मोठया आहेत. या दिंड्यांनी संरक्षण मागितले असेल तर ते दिले पाहिजे. ज्या जिल्ह्याच्या सीमेमध्ये दिंडी जाईल त्या जिल्ह्यातून बाहेर जाईपर्यंत त्यांना बंदोबस्त दिला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, शासनाने या घटनेत मरण पावलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाने प्रत्येकी 1 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्री हे सुध्दा संत गजानन महाराजांचे भक्त आहेत. त्या वारकऱ्यांची आपल्याला माहिती आहे. दंगलीत मृत झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना शासन 5 लाख रुपयांची मदत जाहीर करते. बॉम्बस्फोटात आणि दिंडीत मरण पावलेले लोक निरपराधच आहेत. हे वारकरी परमेश्वराची पूजा करुन आपली घरी परतत होते. त्यात त्यांचा काय दोष होता ? शासनाने मृत वारकऱ्यांच्या नातेवाईकांना केवळ 1 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. शासनाने किमान 5 लाख रुपयांची मदत तरी द्यावी. जे जखमी झाले आहेत त्यांना 1 लाख रुपयांची मदत द्यावी. तसेच त्यांच्या हॉस्पिटलची व औषधोपचाराची व्यवस्था शासनाने केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. या घटनेला जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करावी व या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांना मी विनंती करतो. जालना-अंबड-बीड या रस्त्याचे बीओटी तत्वावर तातडीने चौपदरीकरण करण्याचे काम सुरु करावे. ही मागणी आपण पूर्ण करावी एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि या ठिकाणी थांबतो.

------

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ AKN/ 14:50

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शेगाव हे बुलढाणा जिल्हयातील सुप्रसिध्द तीर्थक्षेत्र आहे. शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थान ही विदर्भाची पंढरी समजली जाते. ज्या ठिकाणी संत गजानन महाराजांचे वास्तव्य होते त्या ठिकाणी लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. या संस्थानला या वर्षी 100 वर्षे पूर्ण झाली. नुकताच जन्मशताब्दी सोहळा अत्यंत उत्साहात साजरा केला गेला. शेगावच्या संत गजानन महाराज संस्थानकडून आषाढी एकादशीला पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्याकरिता पालखी निघत असते. वारकरी संप्रदायातील लाखो भाविक या पालखीमध्ये अनवाणी सहभागी होतात आणि जय जय रामकृष्ण हरी या गजरात शेगाव ते पंढरपूरपर्यंत दिंड्या निघतात. अत्यंत शिस्तबध्द व्यवस्था संस्थानकडून केली जाते. भारताचे कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी देखील या व्यवस्थेची स्तुती केलेली आहे. स्वच्छ, शिस्तबध्द आणि कोणाही भाविकाला कोणताही त्रास होणार नाही या दृष्टीने दक्षता घेणारे शेगाव येथील संत गजानन महाराज संस्थान हे देशातील प्रमुख तीर्थक्षेत्र आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. प्रतिवर्षाप्रमाणे शेगाव येथून दिंडी निघून आषाढी एकादशीला पंढरपूर येथे पोहोचली. लाखो भाविकांनी पंढरपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घेतले आणि अतिशय आनंदाने हे वारकरी परतीच्या प्रवासाला निघाले. पाणदे गावाजवळ ही दिंडी पोहोचली असता त्या दिंडीमध्ये कंटेनर घुसून 14 तरुण भाविक चिरडले गेले. अनेक भाविक जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

सभापती महोदय, 14 मृतांमध्ये बाळापूर तालुक्यातील चार भाविक आहेत. हसनापूर आणि भटवाडी येथील प्रत्येकी दोन भाविकांचा मृतामध्ये समावेश असून भटवाडी येथील मृत झालेले वारकरी हे माझे जवळचे नातेवाईक आहेत. मृत झालेले 14 वारकरी हे वय वर्षे 30 च्या आतील असून त्यांच्या कुटुंबात लहान लहान मुले आहेत. शेतीची कामे आटोपून हे भाविक दिंडीमध्ये सहभागी झाले होते. त्यांच्यावर हा दुर्दैवी प्रसंग ओढवला आणि त्यात त्यांना प्राण गमवावे लागले. महाराष्ट्रातून अनेक दिंड्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे जात असतात. त्या दिंड्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना सोयी सवलती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. आज दळणवळणाची साधने वाढली आहेत, वाहनांची संख्या वाढली आहे. परंतु वारकऱ्यांच्या दृष्टीने

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भगवानराव साळुंखे)**

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे........

सुरक्षितता आणि संरक्षणाची गरज आहे. पंढरपूर येथे जाण्यासाठी ज्या दिंड्या निघतात त्यांचा दोन-तीन महिने अगोदर कार्यक्रम निश्चित झालेला असतो. दिंडीमध्ये हत्ती, घोडे, सर्व आवश्यक साहित्याचा समावेश असतो. परंतु ज्या मार्गावरुन दिंड्या निघालेल्या असतात त्या मार्गावर सुरक्षितता असणे आवश्यक आहे.

नंतर श्री.खर्चे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे ........

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्यानुसार पहिल्यांदा हा रस्ता चार पदरी झाला पाहिजे अशीच माझी देखील मागणी आहे. तसेच माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री सभागृहात उपस्थित असल्याने त्यांना सुध्दा माझी अशी विनंती आहे की, अंबड-बीड या रस्त्याच्या बाजूने किमान दहा-पंधरा किलोमीटर, एका दिवसात पायी चालण्याइतके अंतर लक्षात घेऊन धर्मशाळा किंवा विश्रांती गृह बांधावेत. या दिंडीतील वारकरी जेवण झाल्यानंतर थोडी विश्रांती घेण्यासाठी पहुडले होते तेथेच हा अपघात झाला. दरवर्षी ही दिंडी त्याच रस्त्याने जात असते व यापुढेही वर्षानुवर्षे जातच राहणार. त्यांची मुक्काम करण्याची ठिकाणे व जेवणाची गांवे ठरलेलीच असतात. त्याची माहिती सर्वांनाच असते. हे भाविक दरवर्षी आपले फक्त दोन कपडे घेऊन पायी पंढरपुरला जाण्यासाठी निघत असतात, त्यांना सुरक्षितता आवश्यक आहे. दिंडीत जास्त गोरगरीब लोकच असतात. या लोकांच्या सुरक्षेसाठी पोलीस अधिकाऱ्यासह एक पथक दिले पाहिजे, जेणेकरुन अशी घटना घडली तर त्यांचे रक्षण होऊ शकेल. त्याचबरोबर एक आरोग्य पथक सुध्दा देणे आवश्यक आहे. यानंतर या अपघातात जे मृत झाले त्यांचे वय अगदीच कमी होते. त्यांच्या कुटुंबियांना किमान 5 लाख रुपये आणि जखमींना 1 लाख रुपयाची मदत करावी अशी मागणी करतो आणि ही मागणी शासन पूर्ण करेल अशी अपेक्षा करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------

......2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहात सुरु असलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, अंबड-बीड रस्त्यावर दिंडीला जो अपघात झाला त्यात 14 वारकरी मृत झाले त्यांना मी प्रथम विनम्र आदरांजली वाहतो. संत गजानन महाराजांची दिंडी बीडमधून 15 दिवस अगोदरच पंढरपुरच्या दिशेने जाते. भाविकांची आणि ग्रामीण भागातील सर्व श्रध्दावान नागरिकांची अशी धारणा आहे की, संत गजानन महाराजांची दिंडी येणे म्हणजे एक शुभ शकुन आहे. ही दिंडी पाऊस घेऊन येते. आतापर्यंत ज्या ज्या वेळेस संत गजानन महाराजांची दिंडी बीड मध्ये येऊन गेली त्या त्या वेळेस बीड मध्ये पाऊस घेऊनच आलेली आहे, त्याला एकाही वर्षाचा अपवाद नाही. ही दिंडी तरुण मुलांच्या मनावर चांगले संस्कार करते त्यामुळे बीडमधून दिंडी जाते तेव्हा मुले मल्लखांब खेळतात. जी मुले मल्लखांब खेळतात त्या मुलांच्या दंडात इंजेक्शन सुध्दा जात नाही, इतके ते मजबूत होतात.

यानंतर श्री. भारवि ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

या दिंडीमध्ये भुजामध्ये बळ देण्याचे सामर्थ्य आहे. अशा दिंडीचे संरक्षण करणे ही महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे. येथे पुणेकर दादा उपस्थित आहे. समर्थानी असे सांगितले की, ....

"कोण पुसे अशक्ताला
रोगी बराडीसे दिसे
कळा नाही कांती नाही
युक्ता, बुद्धी दुरावली "

तरूणांच्या मनावर संस्कार करण्याचे काम दिंडींच्या माध्यमातून श्री गजानन महाराज संस्थान करीत आहे. त्यामुळे या वारकऱ्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी जेवढी नागरिकांवर आहे त्या पेक्षा जास्त जबाबदारी महाराष्ट्र शासनाची आहे. बीड जिल्ह्याची सरहद्द ओलांडल्यानंतर जालन्याच्या पोलीस अधीक्षकाने संरक्षण का दिले नाही, त्याला कोणती अडचण होती. येथे माननीय गृह राज्य मंत्री उपस्थित आहेत. ते ही वारकरी आहेत, मी ही वारकरी आहे. महाराष्ट्रातील बरेच मंत्री वारकरी आहेत. मोठया प्रमाणावर हरि भक्त मंत्री दिंडीमध्ये सहभागी होताना दिसतात. ह.भ.प.पाचपुते महाराज, ह.भ.प.ढोबळे महाराज आणि नितांत श्रद्धा ठेवणारे आमचे विरोधी पक्ष नेते सुद्धा सामील होताना दिसतात. ते भाविक भक्त आहेत. अशा या वारकऱ्यांच्या प्रती महाराष्ट्र शासनाने अतिशय जागरूकपणे पावले टाकणे आवश्यक आहे. पोलीस अधीक्षकाला आपण विचारावे की, संरक्षण देण्यामध्ये कोणती अडचण होती. पोलीस कुठल्या कामामध्ये गुंतले होते ? आरटीओ गावाच्या बाहेर गाड्या लावून काय करतात, हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सविस्तरपणे सांगितले. ज्या दिवशी दिंडी बीड मधून जालनाच्या दिशेने गेली त्या दिवशी पहाटे साडेपाच वाजता मी सुद्धा त्या दिंडीचे दर्शन घेतले. त्या दिंडीतील किमान 500 वारकऱ्यांना चिवडा, लाडू अशा प्रकारचा अल्पोपहार देण्याची आमच्याकडे प्रथा आहे. मला चिंता एका गोष्टीची आहे. या दिंडीमध्ये हत्ती असतो. अनेक ठिकाणी हत्ती चवताळलेला पाहिलेला आहे. हत्तीचे मानसशास्त्र आपल्याला अद्याप पर्यंत समजलेले नाही. हत्तीचे दर्शन घेण्यासाठीही भाविकांची तुडुंब गर्दी

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

होते. प्रसंगी हत्तीला वेळेवर जेवण मिळत नाही. त्यातून हत्तीच्या मनावर ताणतणाव येतो व त्यातून हत्ती पिसाळतो, चवताळतो. मध्यंतरी केरळमध्ये एक प्रकार घडला होता. अभिषेक बच्चन व ऐश्वर्या राय हत्ती पिसाळल्यामुळे झाडाच्या पाठीमागे जाऊन लपले. कारण हत्ती लोकांच्या मागे लागला होता. श्री गजानन महाराजांच्या दिंडीमध्ये हत्ती असतो. त्या हत्तीवर अधिक ताण पडणार नाही या दृष्टीने आपण नियोजन करण्याची आवश्यकता आहे. कारण भविष्यातील दुष्परिणाम टाळता येऊ शकतात.

दाणा भाजून केली लाही
आम्हा जन्म मरण नाही.

ही वारकऱ्यांची श्रद्धा आहे. तुकाराम महाराज, एकनाथ महाराज यांची दिंडी असेल आमच्या नारायण गडावरून पंढरपूरच्या दिशेने जाणारी दिंडी असेल, भगवान गडावरून पंढरपूरच्या दिशेने जाणारी दिंडी असेल या सगळ्यांची अशी एक भावना आहे की, या दिंडीमध्ये सहभागी झाल्यानंतर पुन्हा जन्म मरणाच्या खाईतून बाहेर पडण्याचा राजमार्ग मिळतो. ही स्वर्गाची वाट आहे. ही स्वर्गाची वाट सुरक्षित करण्याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाची आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, ती संरक्षणाची जबाबदारी आपण पार पाडावी.

या नंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

शहागड ते जालना या रस्त्याने आम्ही आठ दिवसातून एकदा तरी जालन्याला जातो. या रस्त्यावर घाटी आहे. सन्माननीय श्री. छगन भुजबळ साहेब सभागृहात उपस्थित आहेत. या रस्त्याने जातांना आपल्या शेजारी बसलेला माणूस तोच आहे की नाही याची किमान अर्ध्या तासांनी तरी चाचपणी करुन पहावी लागते. या ठिकाणी वर्णन करण्याची गरज नाही ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, या रस्त्याच्या बाबतीत आपल्याला दोन गोष्टी कराव्या लागतील. या रस्त्यावरील खड्डे बुजविणे आवश्यक आहे, त्याचबरोबर हा रस्ता चार पदरी झाला पाहिजे. गजानन महाराजांच्या पालखीचा मार्ग जालन्यावरुन शहागड, शहागडवरुन गेवराई, गेवराईवरुन बीड, बीडवरुन कुंथलगिरी आणि कुंथलगिरीवरुन बार्शी-पंढरपूर असा आहे. या मार्गावरुन अनेक दिंडया जात असतात. त्यामुळे या रस्त्यावरील वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी राज्य शासनाने पार पाडली तर दिंडीमधील वारकरी निश्चितपणे सुरक्षित राहू शकेल. त्याचबरोबर सन्माननीय श्री. भुजबळ साहेबांनी औरंगाबाद-बीड-सोलापूर हा रस्ता चौपदरी करण्याची घोषणा केली आहे, त्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे. बीड शहरामध्ये डझनावर अपघात झाले आहेत, बाहेरच्या राज्यात जाणारे सर्व कंटेनर बीड शहरातून जातात. याकरिता प्रस्तावित असलेला रिंग रोड तात्काळ केला तर भविष्यात होणाऱ्या अपघातांवर आपल्याला मात करता येऊ शकेल व ते टाळता येऊ शकतील आणि या वारीचा मार्गसुध्दा अतिशय सुरक्षित राहील. हा मार्ग सुरक्षित करण्याची जबाबदारी राज्य शासनाने पार पाडावी अशी आग्रहाची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी भाषण करीत असतांना रस्त्यांची नावे घेऊन त्यावरील खड्डे बुजविण्याची आवश्यकता आहे आणि तो रस्ता चार पदरी करण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. त्याबाबत मला असा खुलासा करावयाचा आहे की, ज्या ठिकाणी हा अपघात झाला आहे त्या रस्त्याचे अनेक फोटो माझ्याकडे आहेत. त्यावरुन आपल्याला दिसेल की, हा रस्ता दोन पदरी असून त्यावर खड्डे नाहीत, रस्ता सरळ आहे. वारकरी हे झाडाच्या बाजूला बसलेले असतांना हा कंटेनर रस्त्याच्या बाजूला आतमध्ये घुसला. सभापती महोदय, या ठिकाणी कोणतेही समर्थन करीत नाही तर फक्त रस्त्याबाबत माहिती देत आहे. चार पदरी रस्ता करण्याबाबत संबंधित इंजिनिअर यांचेकडून आमच्याकडे प्रस्ताव आला आहे. त्या प्रस्तावाची छाननी करुन हा रस्ता चार पदरी करण्याचे काम आम्ही लवकरात लवकर सुरु करणार आहोत. त्याचप्रमाणे त्यांनी बीड जिल्ह्याच्या बाबतीत सांगितलेल्या विषयामध्ये सुध्दा मी स्वत: लक्ष घालीन.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, संत तुकाराम महाराज म्हणतात की,

"पापाची वासना नको दाऊ डोळा,
त्याहूनी आंधळा बरा मी"

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या महत्वाच्या विषयावर आपण चर्चा करीत आहोत.

गेल्या चार-पाच वर्षापासून या वारीमध्ये पायी जाण्याचा मला अनुभव आहे. प्रत्यक्षात त्या ठिकाणी जे घडते ते मी अनुभवले आहे. गजानन महाराजांच्या पालखीच्या मार्गाचा रस्ता चांगला आहे. प्रत्येक देवस्थानाकरिता ट्रस्ट आहे. काही ठिकाणी कोर्ट ट्रस्टी नेमते तर काही ठिकाणी सरकार ट्रस्टी नेमते. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी हे आपल्या जिल्ह्यात पालखी यायच्या दोन-तीन महिन्यापूर्वी एक बैठक घेतात. यामध्ये महत्वाची गोष्ट अशी की, ग्रामीण भागाचे आज झ ापाटयाने शहरीकरण होत चालले आहे. हे होत असतांना शेतीचे आणि मोकळया जागेचे प्रमाण कमी होत चालले आहे. आम्ही वारीमध्ये पायी चालत जात असतो त्यावेळी एखाद्या खेडयामध्ये विसाव्याकरीता पालखी थांबते. आज रस्ते मोठे होत आहेत, आमच्या पालखीच्या मार्गावर बीओटी तत्वावर रस्त्याचे काम सुरु आहे. परंतु रस्ता मोठा झाल्यामुळे जुने विसाव्याचे ठिकाण आता रस्त्यावर आले आहे. राज्याच्या अनेक भागामधून पंढरपूरला पालख्या येत असतात. त्यामध्ये गजानन महाराजांची पालखी असेल, सोपान काकांची पालखी असेल, एकनाथ महाराजांची पालखी असेल, मुक्ताईची पालखी असेल, माऊलींची पालखी असेल, संत तुकराम महाराजांची पालखी असेल अशा अनेक पालख्या येतात. परंतु या सर्व देवस्थानांना आपण एकत्र करतो. त्या जातांना आपण पोलीस बंदोबस्तामध्ये त्यांचे मोठे स्वागत करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

श्री.अनिल भोसले . . . .

यानंतर पालखी परतीच्या प्रवासाला लागते, यामध्ये काही ठरावीक दिंड्यांचा अधिकार असतो आणि त्यांना ठरावीक जबाबदारी दिलेली असते. आज त्याठिकाणी कितीही पोलीस ठेवले तरी वारकऱ्यांना पोलिसांचे संरक्षण नको असते. त्यांच्या दुसऱ्या कोणत्याही मागण्या नाहीत. आज वर्षानुवर्षापासून या प्रथा चालत आलेल्या आहेत.मागील 300 वर्षापासून तुकाराम महाराज असतील, माऊली असेल यांच्या पालख्या येत आहेत. तसेच गजानन महाराज यांची गेल्या 44 वर्षा पासून पालखी येत आहे. याठिकाणी वारकरी,विनयकरी हे प्रमुख असतात.याठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवलेसाहेब यांनी दिंडीतील हत्ती बिथरु नयेत यासाठी नियोजन करावे अशा प्रकारची सूचना केली आहे. माझ्या माहितीप्रमाणे पंढरपूरजवळ गोपालकाल्याचे ठिकाण आहे.श्री गजानन महाराजांच्या दिंडीतील हत्तीला पहाण्यासाठी लोकांची गर्दी होते आणि अशा वेळी त्याला वेळच्या वेळी खाणे दिले पाहिजे आणि तसे ते वेळेवर दिले गेले नाही तर तो बिथरण्याची शक्यता असते. पण याबाबतीत प्रामुख्याने महाराष्ट्र सरकारने विशेषत: सर्व अधिकाऱ्यांनी, तेथील सर्व कलेक्टरनी पालखीच्या पूर्वी एकत्र बैठक घेतली पाहिजे आणि विसाव्याच्या ठिकाणासाठी मोकळी जागा उपलब्ध केली पाहिजे. त्याठिकाणी आपण महिलांसाठी, पुरुषांसाठी अनेक स्वच्छतागृहांची व्यवस्था करतो.पण तेथे अजिबात स्वच्छता नसते. अशा वेळी त्याठिकाणी स्वच्छता कशी राहील यासाठी आपण प्रामुख्याने जबाबदारी घ्यावयास पाहिजे.

सभापती महोदय, वाहतूक पोलीस त्यांचे जे काम आहे ते करीत असतात. परवाच्या दिवशी माळशिरस येथे पालखीच्या अगोदर एक प्रसंग घडला. त्याठिकाणी लोकांना जेवण मिळाले नाही. पोलिसांनी त्यांचे ट्रक अडविले. सकाळी जेव्हा ते मुक्कामाच्या ठिकाणी असतात, तेव्हा त्यांचे ट्रक असतात. वारकरी पहाटे अडीच वाजता उठतो आणि तो सकाळी 6.00 वाजता चालावयास सुरुवात करतो. सकाळी तो चहा-पाणी घेतो, सामान ठेवतो आणि पुढे दुपारच्या जेवणासाठी जातो. त्यासाठी त्यांना पास दिलेले असतात. आज गावामध्ये काही ठिकाणी छोटे रस्ते आहेत, तेथे सोयी नाहीत. त्याठिकाणी पोलीस विभागामार्फत त्यांचे ट्रक दुसरीकडून वळविले जातात. याठिकाणी पालखीसाठी रिंग रोड केला पाहिजे. आज आपण अनेक योजनांवर खर्च करीत असतो. माझे असे मत आहे की, आता पालखी मार्गावर रस्ते मोठे होत आहेत. पण या वारकऱ्यांसाठी ज्या मूलभूत सोयी असावयास पाहिजेत,त्या करणे आवश्यक आहे.त्याठिकाणी लहान गाव असले तरी पालखीच्या दिवशी तेथे लाखो लोक येत असतात.त्यांच्यासाठी सोयी केल्या पाहिजेत. जालना येथील अंबड....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले . . . .

फाट्याजवळ जी घटना घडली,तसे पुन्हा भविष्य काळामध्ये होऊ नये यासाठी काळजी घ्यावयास पाहिजे आणि त्याबाबत आपण सर्वांनी जबाबदारी घेतली पाहिजे. या ठिकाणी बी.ओ.टी.तत्वावर रस्त्यांची कामे सुरु आहेत. बरेच रस्ते मोठे होत आहेत. पण जेव्हा त्या ठिकाणी दुपारी पालखी थांबते, रात्री पालखी थांबते. अशा वेळी तेथील व्यवस्थेबाबत आतापासूनच प्लॅनिंग केले तर वारकऱ्यांना कुठे आणि कशा पध्दतीने विसावा पाहिजे या दृष्टीने विचार करुन जर सर्व गोष्टी केल्या तर अपघात टळू शकतील असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

. . . .2 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/KTG 15:10

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ही अतिशय दु:खद घटना आहे आणि दुर्दैवाने आपल्याला लागोपाठ दोन दिवस या सदनामध्ये मृतात्म्यांना श्रध्दांजली अर्पण करण्याची वेळ आली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मुंबईमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये जे मृत्युमुखी पडले यांना श्रध्दांजली अर्पण करावी लागली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पंढरपूरला आषाढीची वारी करुन परत येणाऱ्या वारकऱ्यांवर पारनेर फाट्यावर कंटेनरने धडक दिल्यामुळे जे मृत्युमुखी पडले यांना श्रध्दांजली वहावी लागत आहे. यासंदर्भात माझ्यापूर्वी अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत आणि आपापल्या परीने सूचनाही केल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी आपले वैयक्तिक अनुभव सांगितले. आपण या घटनेचे दोन भाग केले तर ते योग्य ठरेल असे मला वाटते. एकतर कन्टेनर घुसल्यामुळे म्हणजे तो वेगामध्ये होता काय आणि दुसरे म्हणजे ड्रायव्हर दारु पिऊन गाडी चालवित होता काय? याचे स्पष्टीकरण माननीय गृह राज्य मंत्र्यांकडून मिळाले पाहिजे. महामार्गावरील वाहनांचा आणि लोकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सदनामध्ये नेहमी चर्चेला येतो, तो देखील ऐरणीवर येतो.

यानंतर श्री.शिगम अ. . . . ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

सभापती महोदय, आपण नेहमी येथे महामार्गावरील अपघात कमी करण्या संदर्भात चर्चा करतो. नाशिक-शिर्डीला सिन्नर मार्गे जाणारा रस्ता असो, कोकणातील सिंधुदुर्ग येथील रस्ता असो किंवा परवा जो अपघात झाला तो रस्ता असो, या महामार्गा बाबत एक धोरण आखणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

सभापती महोदय, कंटेनर चालक किती मस्तवाल होता ते त्याच्या कृतीवरुन दिसून येते. कंटेनर चालकाने 13 वारकऱ्यांना चिरडल्यानंतर आणि काही वारकऱ्यांना जखमी केल्या नंतर तो कंटेनर घेऊन तसाच पुढे निघून गेला. ही अतिशय वाईट गोष्ट आहे. त्यामुळेच तेथील जमावाचा आक्रोश जास्त वाढला. जमाव संतप्त झाला, ही त्या मागील पार्श्वभूमी होती हे आपण लक्षात घेतले पाहिजे. कंटेनर चालकाला पकडण्यासाठी दुचाकी वरुन दोघेजण गेले. त्या दुचाकीला देखील कंटेनरने धडक दिली. त्यामुळे राम टेमकर यांचा जागीच मृत्यू झाला. पुढे गावकऱ्यांनी तो कंटेनर अडविला. आमच्या पक्षाचे गट नेते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आज घटना स्थळाला भेट देण्यासाठी गेले आहेत. जमावाचा रोष भयानक असणे स्वाभाविक होते. कारण ज्यावेळी जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले त्यावेळी रुग्णालयात डॉक्टर्स नव्हते. जखमींना वेळीच औषधोपचार मिळाला नाही आणि ही अतिशय खेदजनक बाब आहे.

सभापती महोदय, दिंडी बरोबर वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस देण्यात आले होते. ही वर्षानुवर्षांची पध्दत आहे. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना ही गोष्ट माहीत आहे. जालन्या पर्यंत दिंडी बरोबर पोलीस होते. परंतु शहाड-अंबड पासून दिंडी बरोबर पोलीस नव्हते. जालन्या पर्यंत पोलीस होते नंतर पोलीस का नव्हते याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे. वास्तविक दिंडीला पोलीस संरक्षण दिले पाहिजे. वारकरी हे किती शांत प्रवृत्तीचे असतात, हे या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. त्यांच्या कडून कोणत्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा होत नाही. त्यांनी कधी रस्त्या वरील वाहतूक अडविली अशी घटना कधी घडलेली नाही. ज्यावेळी दिंडी पारनेरच्या फाट्या जवळ विश्रांती साठी थांबली त्यावेळी लालवाडी येथे श्री.गणेश बोराडे यांनी एक हजार वारकऱ्यांसाठी चहापानाची व्यवस्था केली होती. श्री.गणेश बोराडे यांचे राजमाता नावाचे हॉटेल आहे. या गणेश बोराडेच्या छातीत पोलिसांची गोळी लागून त्यांचा मृत्यू झाला.

..2..

डॉ.दीपक सावंत..

एखादा जमाव प्रक्षुब्ध झाल्यास पोलिसांनी प्रथम हवेत गोळी बार करावा. गोळी बार करायचा असेल तर तो कमेरच्या खाली करावा असा नियम आहे. परंतु त्या ठिकाणी असे काहीही घडले नाही. गणेश बोराडे याचे 13 महिन्यांपूर्वी लग्न झाले असून त्याची पत्नी गरोदर आहे.बोराडे याच्या निधनामुळे त्याचे कुटुंब निराधार झालेले आहे.

सभापती महोदय, अंबड जवळ हा प्रकार घडल्यानंतर जवळपास अर्ध्या तासाने पोलीस निरीक्षक तेथे उपस्थित झाले. या संदर्भात त्यांची चौकशी होणार की नाही ? हा प्रकार घडल्यानंतर आजूबाजूच्या गावातील लोक तेथे तातडीने पोहोचले, परंतु आपले पोलीस निरीक्षक घटना स्थळी अर्ध्या तासाने पोहोचले.

या नंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम श्री. अ.शिगम.... 15:20

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी थोडया वेळा पूर्वीच सांगितले की, आता पोलिसांची कमी नाही. आम्ही 44 हजार पोलीस नेमलेले आहेत. पण त्या 44 हजार पोलिसांपैकी चार पोलीस या दिंडी बरोबर या शासनाला देता आले नाहीत. वारकरी पंढरपूरपर्यंत जाई पर्यंतच फक्त शासनाची व्यवस्था असते आणि त्यानंतर त्या वारकरी समुदायाला वाऱ्यावर सोडून देण्यात येते काय? पोलीस नसल्यामुळेच हा अपघात झाला असावा असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या अपघातातील जखमींना आणि मृत झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना मदत देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. पण त्या संबंधीचा जी.आर. कधी निघणार आहे? सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी सांगितले की, मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना पाच लाख रुपये आणि जखमींना एक लाख रुपये इतकी मदत केली पाहिजे. पण त्या संबंधीचा जी.आर. कधी काढण्यात येणार आहे? ताबडतोब आज संध्याकाळच्या आत या संबंधीचा जी.आर. काढण्यात यावा तरच या चर्चेला अर्थ राहील.

सभापती महोदय, या सर्व घटनेमध्ये जे जे कोणी जबाबदार आहेत मग तो त्या कंटेनरचा चालक असेल, वाहतूक पोलीस असतील, तेथील पोलीस व्यवस्था असेल, अंबड शहराचे पोलीस निरीक्षक असतील किंवा जिल्हाधिकारी, ज्यांनी फायरिंगचे आदेश दिले ते असतील त्यांची चौकशी करावी. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी सांगितले की, फायरिंग करण्यात येऊ नये असे पोलिसांना सांगण्यात आले होते पण जिल्हाधिकाऱ्यांनी फायरिंगचे आदेश दिले. तेव्हा सर्व गोष्टींची सत्यता पटवून घेण्यात यावी आणि ताबडतोब त्या सर्वांवर ॲक्शन घेण्यात यावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मला आताच दूरध्वनीवरुन कळविले आहे की, दिंडी पुढे गेली तरी सर्व वारकऱ्यांची झडती घेण्याचे काम सुरु आहे. या दिंडीमध्ये आता फक्त 165 लोक आहेत. त्यांची झडती घेण्याचे काम सुरु आहे. हे झडती घेण्याचे काम ताबडतोब थांबविण्यात यावे. या गरीब वारकऱ्यांची अशा प्रकारे झडती घेण्यात येत आहे, ते क्रिमीनल आहेत काय? त्यांनी केलेली कृती ही स्पॉन्टेनिअसली ॲक्शन आहे.शासनाचे पोलीस आणि जिल्हाधिकारी जर मॉबची सायकॉलॉजी समजत नसतील तर त्यांनी घरी बसावे. पोलिसांना मॉबची सायकॉलॉजी हाताळण्याचे ट्रेनिंग देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. या सर्व प्रकारची माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मागणी केल्या प्रमाणे उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी होण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्याचप्रमाणे तत्काळ जी. आर. काढून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची आणि जखमींना एक लाख रुपयांची मदत देण्यात यावी, अशी विनंती मी माननीय गृह राज्य मंत्र्यांना करतो आणि या अपघातातील सर्व मृतांना श्रध्दांजली अर्पण करुन मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्राची ओळख वारकऱ्यांचा महाराष्ट्र अशी आहे. या वारकरी संप्रदायाच्या, वारीच्या परंपरेच्या पुण्याईवर आज आपल्या या महाराष्ट्राने प्रगतीशील राज्य म्हणून एक वैभव प्राप्त केलेले आहे. वारकरी संप्रदायातील मंडळी ज्यावेळी पंढरीच्या वारीला निघते त्यावेळी त्या वारीमध्ये तो वारकरी प्रार्थना करीत असतो. ती प्रार्थना अशी आहे. :-

अंत घडो गोदा तीरी,
या वीण आशा नाही दुसरी,
स्मृती राहो जागृत,
घरी भजन हरीचे करावया,
भजन करिता मोक्ष घडो,
देह गोदा तीरी पडो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे .....

हे पांडुरंगा, मी जिवंत असेपर्यंत माझी पंढरीची वारी घडू दे. वारी घडताना माझी स्मृती सदैव जागृत राहून हरीचे भजन करताना मोक्ष घडू दे आणि माझा देह गोदातीरी पडू दे. कदाचित काल झालेला अपघात पाहता असे वाटते की, वारकऱ्यांची हीच प्रार्थना देवाने ऐकली असावी. संत गजानन महाराजांच्या आणि पांडुरंगाच्या नामस्मरणात तल्लीन झालेल्या वारकऱ्यांना काळ असा अचानक येईल, मृत्यूची झडप घालेल याची कल्पना सुध्दा नसावी. पण हे सगळे एका माणसाच्या चुकीमुळे घडले. एक कंटेनरचा चालक, तोही हरियाणचा, दारु प्यालेला, भरधाव वेगाने टॅंकर 150-200 माणसांच्या कळपामध्ये घेऊन जातो आणि 13 लोकांना चिरडून टाकतो आणि 13 लोकांना चिरडल्यानंतरही एक क्षणभर सुध्दा ब्रेक न लावता तो तसाच पुढे 10 किलोमीटरपर्यंत जातो. गावातील काही तरुण मुलांना कळते की, असा अपघात झाला आहे. त्यातील काही तरुण मंडळी तो टॅंकर अडविण्याचा प्रयत्न करतात. त्यातील एका मोटारसायकल स्वाराला 10 किलोमीटरवर तो टॅंकरवाला चिरडतो.

सभापती महोदय, हा टॅंकर मधल्या ज्या मार्गाने आला असेल, बऱ्हाणपूर-मलकापूर, ज्या मार्गाने आला असेल त्या मार्गावर दोन-तीन टोल नाके आहेत. आर.टी.ओ.चे 3-4 चेकपोस्ट आहेत. पण माझ्या माहिती प्रमाणे या टॅंकरवाल्याची अशा प्रकारची चौकशी झाली नसावी म्हणून हा प्रकार झाला असावा. या महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेमध्ये जेव्हापासून वारी चालू झाली आहे तेव्हापासून अशा प्रकारची एवढ्या मोठ्या अपघाताची एकही घटना घडल्याचे दिसून आलेले नाही. अपघात घडला हे आपण समजू शकतो. पण अपघात घडल्यानंतर पोलीस किती संवेदनशील होते हा प्रश्न खऱ्या अर्थाने संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेसमोर आहे. ही वस्तुस्थिती आहे की, अर्ध्या तासानंतर पोलीस यंत्रणा त्या ठिकाणी पोहोचली. जवळपासच्या लोकांनी तेथील बीट अमलदारपासून पोलीस इन्स्पेक्टरपर्यंत सगळ्यांना कळविले तरी काही अंतरावर असलेल्या पोलीस स्टेशनमधील पोलीस अर्ध्या तासाच्या आत त्या ठिकाणी पोहचू शकले नाहीत. कदाचित ती घटना घडल्याबरोबर अर्ध्या तासाच्या आत जर पोलीस त्या ठिकाणी पोहोचले असते तर शासनाकडून, पोलीस व्यवस्थेकडून या अपघातानंतर जो गोळीबाराचा आघात झाला तो आपल्याला टाळता आला

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ......

असता. त्या ठिकाणी काय चुकले ? वारकरी संप्रदायातील गजानन महाराजांच्या पालखीतील 13 माणसांचे देह विचित्र अवस्थेत रस्त्यावर पडले होते. विचित्र अवस्थेतील ते देह पाहिल्यानंतर कितीही शांत मनाचा माणूस असला तरी त्याला सुध्दा संताप येऊ शकतो आणि ते दृश्य पाहिल्यानंतर तो संताप त्यांनी व्यक्त केला. त्यांनी अगोदर पोलिसांची गाडी जाळली नाही. ज्या कंटेनरने 13 लोकांना चिरडले तो कंटेनर अगोदर जाळला. तो कंटेनर जाळल्यानंतर पोलीस त्या ठिकाणी पोहोचले. पोलिसांनी ती सगळी परिस्थिती पाहिली. त्या लोकांची एकच मागणी होती की, ज्या ड्रायव्हरच्या चुकीमुळे 13 लोक मृत्युमुखी पडले त्या ड्रायव्हरला आमच्या ताब्यात द्या. लोक विनंती करत होते. त्यांची ती मागणी चुकीची होती. परंतु ही परिस्थिती प्रशासनाला अतिशय व्यवस्थित हाताळता येऊ शकत होती. त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने अपयश आले आणि गोळीबाराचा पुन्हा एक आघात पोलिसांकडून झाला.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे गोळ्या छातीत लागल्या. जे दोघे मरण पावले त्यांच्या छातीत ज्या गोळ्या लागल्या त्या अतिशय जवळून झाडलेल्या होत्या. छातीत गोळ्या झाडल्यानंतर त्यांच्या पाठीत चार-चार इंचाचे भगदाड पडले. असा कसा हा गोळीबार आणि खरोखरच गोळीबार करण्यासारखी परिस्थिती होती का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जाळल्यानंतर पुढच्या 5 मिनिटांच्या कालावधीतच गोळीबाराचे आदेश देण्यात आले आहेत. लाठीमार व गोळीबार याच्या मधला दुसरा कोणताही पर्याय नव्हता काय, अश्रुधूर, हवेत गोळीबार यासारखे पर्याय होते. परंतु हे दोन्ही पर्याय वापरल्याचे दिसून येत नाही. एक लाठीमार झाला व दुसरा गोळीबार झाला त्यात 2 लोक मरण पावले आहेत. एकजण गंभीर जखमी आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायामुळे उभ्या महाराष्ट्रातील अध्यात्म टिकून आहे. वारकऱ्यांनी एकेक महिना, सव्वा महिना पायी चालून पंढरपूरला पांडुरंगाचे दर्शन घेऊन त्यांनी जे पुण्य कमविले आहे त्याच्यावर महाराष्ट्र उभा आहे. या वारकऱ्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असेल त्यामुळे या महाराष्ट्रातील वारकरीच नाही तर महाराष्ट्रीतील सामान्यातील सामान्य माणूस सुध्दा संतापून उठल्याशिवाय राहणार नाही, अशी परिस्थिती या घटनेमुळे निर्माण झाली आहे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे. शासनाने मृतांच्या नातेवाईकांना 1 लाख रुपयांची मदत करण्याचे जाहीर केलेले आहे, ही मदत अत्यंत तुटपुंजी आहे. पंढरपूरच्या वारीसाठी शासन करीत असलेल्या व्यवस्थेवर माझ्या अंदाजाप्रमाणे केवळ 1 कोटी रुपये खर्च होत असावा. आजपर्यंतच्या इतिहासामध्ये वारकऱ्यांना अशा प्रकारचा अपघात झाला नव्हता. परंतु हा अपघात झाल्यानंतर त्यांच्या वारसदारांना शासनाने केवळ 1 लाख रुपयांची मदत जाहीर करुन त्यांची चेष्टा केली आहे. या घटनेच्या माध्यमातून मी शासनाकडे मागणी करतो की, जर शासनाला या वारकऱ्यांबद्दल संवेदना असतील व त्यांच्याबद्दल खरे प्रेम असेल तर प्रत्येक मृताच्या वारसदारांना 5 लाख रुपयांची मदत आजच जाहीर करावी.

सभापती महोदय, माऊलींच्या पालखीचा मार्ग आळंदीपासून पंढरपूरपर्यंत चार पदरी झालेला आहे. जशी माऊलीच्या पालखीला परंपरा आहे तशीच गजानन महाराजांच्या पालखीला सुध्दा परंपरा आहे. ती आम्हाला माहीत आहे. गजानन महाराजांच्या पालखीचा मुक्काम आमच्या परळीला असतो. परळी मार्गे ही पालखी पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला जाते. पंढरपूर ते आळंदी हा मार्ग चार पदरी झालेला आहे तसेच गजानन महाराजांच्या पालखीच्या मार्गाचे सुध्दा चौपदरीकरण करावे अशी मी माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांना विनंती करतो.जेणे करुन अशा

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.धनंजय मुंडे...

घटना भविष्यात घडणार नाहीत. तसे झाल्यास वारकऱ्यांनी जे पुण्य मिळविलेले आहे त्यातील थोडेसे पुण्य शासनाला वाटून घेता येईल. मी मघाशी म्हटल्या प्रमाणे या घटनेची न्यायालयीन चौकशी होणे आवश्यक आहे. एकट्या जिल्हाधिकाऱ्याचे म्हणणे होते की, गोळीबार करणे आवश्यक होते. परंतु या घटनेत नेमके काय घडले ते आजमितीपर्यंत कोणालाही माहीत नाही. पण हा गोळीबार टाळता आला असता. मी पुन्हा एकदा या घटनेची शासनाने न्यायालयीन चौकशी करावी अशी विनंती करतो व या घटनेत मृत झालेल्या वारकऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि येथेच थांबतो.

-----

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हा विषय अत्यंत दु:खद आणि श्रध्दांजली वाहण्याचा आहे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य आणि या महाराष्ट्रातील जनता या घटनेने दुखावलेली आहे. यापूर्वीच्या वक्त्यांनी जे मुद्दे मांडले त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु रस्ते, सुरक्षितता या विषयावर बोलत असताना महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची पुण्याई या महाराष्ट्रातील 11.25 कोटी लोकांच्या पाठीशी आहे, त्यांचे आशीर्वाद आपल्याला लाभले आहेत. या वारकऱ्यांना आपण काहीही देत नाही. या अपघातामध्ये जे मृत झालेले आहेत त्यांच्या वारसांना प्रत्येकी 1 लाख रुपये आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी ही रक्कम 1 लाख रुपयांऐवजी 5 लाख रुपये इतकी वाढवून देण्याची मागणी केली. मी या मागणीचे समर्थन करतो.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी मुंबई शहरात तीन ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. त्या घटनांमध्ये जे निरपराध नागरिक दगावले त्यांच्या वारसांना प्रत्येकी 10 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली होती. मी त्याचे समर्थन करतो. त्याच अनुषंगाने जो वारकरी संप्रदाय रस्त्यावर येत नाही, शिस्तीने मार्गक्रमणा करीत असतो, नियमांचे पालन करीत असतो, देवधर्म पाळतो अशा वारकऱ्यांच्या वारसांना 1 लाख रुपये मदत जाहीर केली. या घटनेमध्ये त्यांचा काय गुन्हा होता? शासनाने न्यायाची बाजू स्वीकारली पाहिजे. जाहीर केलेली 1 लाख रुपयांची मदत वाढविण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी संबंधित रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम करीत आहोत असे सांगितले. परंतु मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, शासनाकडून जी घोषणा केली जाते त्याची अंमलबजावणी होत नाही. तीन वर्षापूर्वी आळंदी येथील सिध्दपेठ तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी 400 कोटी रुपये तरतूद केल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर 25 कोटी, 10 कोटी देऊ असे जाहीर करुनही अद्याप एकही पैसा त्या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी खर्च झालेला नाही. ज्यांच्या आशीर्वादाने हा महाराष्ट्र सुखरुप वाटचाल करीत आहे, ज्यांना आपण मान देतो त्यांच्यासाठी शासन निधी जाहीर करुनही एक रुपया देखील खर्च करु शकत नाही ही बाब निंदनीय आहे. वारकरी संप्रदाय शासनाकडून काही मागत नाही. त्यांची नेहमी देण्याची दानत असते. शासन त्यांच्यासाठी रस्त्यांचे डायव्हर्शन करणार आहे का?

..2..

श्री.मनिष जैन..........

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अनिल भोसले, प्रा.सुरेश नवले हे वारकरी संप्रदायातील आहेत. दरवर्षी ते वारीला जात असतात. त्यांनी या प्रस्तावावर आपले विचार मांडले त्याबद्दल मला खूप आनंद झाला. चातुर्मास सुरु असताना जैन साधू आणि साध्वी यांचे पायी प्रवास सुरु असतात. त्यांच्या प्रवास मार्गावर सरकारने डायव्हर्शन आखून दिले, वाहतुकीस मार्ग ठरवून दिला तर त्यांची सुरक्षितता होऊ शकते. मार्गावर सिक्युरिटी गार्ड उपलब्ध करुन दिले जातात. माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सांगितल्याप्रमाणे आरटीओ चेकपोस्ट आहे तेथे वाहनांची तपासणी होते, टोल प्लाझा आहे तेथे ट्रक थांबवून ड्रायव्हरचे परमिट तपासले जाते, वाहनावरील लोड चेक केला जातो. परंतु जो वाहन चालविणार आहे त्या ड्रायव्हरने मद्य प्राशन केले आहे का याची तपासणी केली जात नाही. मुंबई शहरात अनेक ठिकाणी वाहने थांबवून पोलिसांकडून वाहन चालविणाऱ्यांची मद्य प्राशन केले आहे किंवा नाही याची तपासणी केली जाते. आज राष्ट्रीय महामार्गावरील धाब्याच्या ठिकाणी सर्रासपणे दिवसाढवळ्या मद्य विक्री केली जाते. त्यामुळे महाराष्ट्रात अपघातांचे प्रमाण वाढत आहे, ही गोष्ट निंदनीय आहे. या गोष्टीला आळा घालण्याबाबत कोणी विरोध करेल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, शासनाने मृत झालेल्या वारकऱ्यांच्या वारसांना जबाबदारीने 1 लाख रुपयांऐवजी 5 लाख रुपये आर्थिक मदत जाहीर करावी. माझी तर अशी मागणी आहे की, 10 लाख रुपये मदत दिली पाहिजे. वारकरी संप्रदाय शासनाकडे कधी काही मागत नाही. शासनाने पालख्या निघतात त्यावेळी त्यांच्या निवासाची, पिण्याच्या पाण्याची, विश्रामाची व्यवस्था केली पाहिजे. वारकरी आपल्याकडून काही घेऊन जाणार नाही, उलटपक्षी ते शासनाला काही तरी देणार आहेत. या विषयावर भरपूर बोलता येईल. पण शासनाने मात्र या अपघाताची योग्य ती दखल घेतली तर चांगले परिणाम दिसून येतील एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेसंबंधी माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, वारकरी संप्रदायाच्या दु:खावर प्रामुख्याने माझे विचार मी व्यक्त करीत आहे. शेगावच्या संत गजानन महाराजांची पालखी महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठुरायाच्या दर्शनासाठी दरवर्षी जात असते. दर्शन झाल्यानंतर सर्व वारकरी आपापल्या घराकडे परत जाण्यासाठी निघतात. या परतीच्या प्रवासात अंबड-बीड रस्त्यावर विश्रांती घेत असताना एका कंटेनरने धडक देऊन जो अपघात झाला त्यात 14 वारकऱ्यांचा मृत्यू झाला. अशी घटना घडणे म्हणजे बेजबाबदारपणे ड्रायव्हिंग करताना आपल्याला कोणीही विचारत नाही याचेच द्योतच म्हणता येईल. यासंदर्भात आरटीओ आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रकाश टाकत असताना मी असे म्हणेन की, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून त्यांनी काहीच प्रयत्न करु नये ही दु:खाची बाब आहे. या पालखीत हत्ती, घोडे आणि माणसे असतात. यापूर्वी ही पालखी मुंबईत विक्रोळी आणि पार्ले येथे मुक्कामाला येत होती. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ हे महापौर होते आणि मी नगरसेवक होते. तेव्हा आम्ही या पालखीचे पूजन केले होते. अशा दिंडीमधील वारकारी हे कोणाच्या अध्यात-मध्यात नसतात. त्यांचे काम फक्त परमेश्वराची भक्ती आणि परमेश्वर हेच त्यांचे श्रध्दास्थान असते. त्यांना कंटेनर चिरडून जातो ही भूषणावह बाब आहे असे मला वाटत नाही. या अपघातात मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना शासनाने एक लाख रुपयाची मदत देण्याचे कबूल केले पण माझी विनंती आहे की, एक लाखाऐवजी पाच लाखाची मदत करावी. केवळ पाच लाख रुपये देऊन हा प्रश्न सुटणारा नाही तर दिवसेदिवस आमच्यातील अहंभाव आणि बेजबाबदारपणा जो वाढीस लागत आहे त्याला कुठे तरी आळा बसणे गरजेचे आहे. वास्तविक आपले महाराष्ट्र राज्य हे शिस्तीचे, नामस्मरण व प्रगतीचे राज्य म्हणून देशभर ओळखले जाते. त्याला कुठेतरी अशा सर्व घटनांची मालिका पाहिल्यानंतर तडा जातो की काय असे चित्र पहायला मिळते. खरे तर वारकरी आषाढी एकादशीच्या दहा-पंधरा दिवस अगोदरच आपल्या घरुन पायी पंढरीला जाण्यासाठी निघतात. पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेऊन घराकडे जात असताना मात्र त्यांचे मृतदेहच घरच्यांना पहायला मिळत असतील तर त्यापेक्षा मोठे दुर्दैव कोणतेच नाही. त्यामुळे माणसाची परमेश्वरावरील श्रध्दा कुठेतरी मोडून पडेल की काय अशी भीती वाटते. पोलीस अधिकारी घटनास्थळी अर्ध्या तासाने पोहचतात. दोन स्कुटर्ससह कंटेनरच्या चालकाला पकडतात. पोलीस आल्यानंतर मात्र दादागिरी करतात की कोणी हे केले ? ( यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

अशा वेळी हवेत गोळीबार करायचा असतो. 1992 च्या दंगलीत हे मी पाहिलेले आहे, अनुभवलेले आहे. असे असताना थेट गोळीबार करण्याचा अधिकार कोणी कोणाला दिला, याची देखील चौकशी झाली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

येथे सांगण्यात आले की, रस्ते चौपदरी करण्यात आले. मी कोकणातील रहिवासी आहे. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोव्या पर्यंत होळी व गणपतीच्या दिवशी अनेक कोकणवासीय रस्ता मार्गे जात असतात. आताच सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब म्हणाले की, आम्ही तो रस्ता आता चौपदरी करू. ह्याच विषयावर मी पुन्हा त्याच अनुषंगाने प्रकाश टाकते. मी मागच्या वेळी असे म्हटले होते की, रायगडच्या पुढे पनवेल पेण सोडले की, वेड्यावाकड्या रस्त्यातून आम्हाला जावे लागते. आमचे रस्ते चौपदरी कधी होणार आहेत. होळी, गणपतीसाठी गावी जाताना चाकरमान्यांचे अपघात होतात. ते कधी थांबणार आहेत. त्याचेही उत्तर आम्हाला येथे मिळाले पाहिजे. हे रस्ते देखील आम्हाला चौपदरी करून मिळाले पहिजेत.

माझी आणखी एक छोटीशी सूचना आहे. मुंबई ते शिर्डी बऱ्याचशा पालख्या पायी चालत जातात. या मार्गावर त्यांची सर्व सोय करण्यात आलेली आहे. त्यांच्या बसण्या-उठण्याची सोय केलेली आहे. अशाच धर्तीवर विठूरायांच्या दर्शनासाठी ज्या ज्या पालख्या जातील त्या त्या मार्गावर राहण्याची सोय महाराष्ट्र शासनाने करावी. या वारकऱ्यांसाठी शासनाने ठिकठिकाणी आडोसे करून दिले पाहिजेत. अशा प्रकारची सोय वारकऱ्यांसह इतर जे पांथस्त असतील त्यांची देखील करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे आणि मृत वारकऱ्यांना श्रद्धाजली अर्पण करून मी येथेच थांबते.

............

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या नियम 97 वरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. गण गण गणात बोते हे शब्द कानावर पडले की श्री गजानन महाराज आपल्याला आठवतात. महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक देवस्थाने आहेत. त्यापैकी शेगाव मधील श्री क्षेत्र गजानन महाराज देवस्थान प्रसिद्ध आहे. गेल्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पामध्ये मोठी तरतूद श्री क्षेत्र गजानन महाराज संस्थानच्या विकासासाठी केलेली आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. दर वर्षी पंढरपूरला आषाढी असो किंवा कार्तिकी असो मोठ्या प्रमाणावर राज्यातील विविध भागातून दिंड्या येत असतात. पंढरपूरला अनेक दिंड्या येतात. त्यापैकी सर्वात मोठी दिंडी श्री गजानन महाराज संस्थान,शेगाव यांची असते. गेल्या 44 वर्षापासून ही दिंडी त्या मार्गावरून मार्गक्रमण करीत आहे. त्या दिंडीचे मी देखील दर्शन घेतलेले आहे. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ही दिंडी निघते. या दिंडीसाठी संस्थानाची स्वतंत्र अशी व्यवस्था आहे. या दिंडीमध्ये हत्ती-घोडे असतात. परंतु, वारकऱ्यांना लागणारे पाणी, औषधोपचार व सुरक्षा रक्षक संस्थानातर्फे पुरविले जाते. अत्यंत शिस्तीने ही दिंडी जात-येत असताना आम्ही अनेकदा पाहिले आहे. परंतु, 25 जुलै हा दिवस वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने काळाकुट्ट ठरला. 25 जुलै रोजी ही दिंडी शेगावकडे परत जात होती, तेव्हा अंबड पासून 3 कि.मी.अंतरावर पारनेर जवळ हा अपघात घडला.

या नंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

मी त्या दिवशी औरंगाबादला असल्यामुळे या बाबतची माहिती घेतली. त्या ठिकाणी कुणाला जाताही येत नव्हते. दिंडी चालत असतांना व रस्त्याने वाहन जात असतांना अपघात झाला तर आपण समजू शकतो. परंतु दिंडी थांबली होती आणि रस्त्याच्या साईड पट्टयालगत असलेल्या जागेवर बसून वारकरी जेवण करीत होते. त्यावेळी अचानकपणे दारु प्यायलेला ड्रायव्हर आपला कंटेनर जेवत बसलेल्या वारकऱ्यांच्या अंगावर घालून त्यांना अक्षरश: चिरडून पुढे गेला. त्यामध्ये जवळपास 11 वारकरी मृत्युमुखी पडले आहेत. वारकऱ्यांना चिरडल्यानंतर हा ट्रक न थांबता पुढे गेला. त्या ड्रायव्हरला माणुसकीचे हृदय होते की काय माहीत नाही. रस्त्याने अपघात झाला, थोडा फार धक्का लागला तरी आपण थांबून काय झाले हे पहातो. परंतु हा ट्रक ड्रायव्हर पुढे जात असतांना पारनेर गावातील युवक त्या ट्रकच्या मागे धावत गेले, दोन युवकांनी आपल्या मोटार सायकलने त्या ट्रक ड्रायव्हरला अडविण्याचा प्रयत्न केला. तरी सुध्दा तो ट्रक ड्रायव्हर न थांबता त्याने त्या मोटार सायकलस्वरांना सुध्दा उडविले व तसाच तो पुढे गेला. त्या ड्रायव्हरला कशाचे काळीज होते, लोखंडी काळीज होते काय हे सांगण्यासाठी शब्द कमी पडतात. अशाप्रकारे प्रयत्न केल्यानंतर लोकांनी त्या ट्रकला अडविले. तोपर्यन्त पोलीस त्या ट्रकजवळ पोहोचले होते. शेवटी लोकांच्या भावनेचा उद्रेक झाल्यानंतर तो ट्रक जाळण्यात आला. त्या ट्रकमध्ये फ्रीज, इलेक्ट्रॉनिक वस्तू होत्या. एवढा मोठा लोकांचा प्रक्षोभ निर्माण झाल्यानंतर तो ट्रक जाळणे स्वाभाविक होते.

सभापती महोदय, जालना जिल्ह्यामध्ये या दिंडीने प्रवेश केला तेव्हा वडीगोद्रीच्या पोलीस स्टेशनने त्यांना शहागडपासून अंबडपर्यन्त पोलीस संरक्षण दिले. त्यापुढे अंबडचे पोलीस या दिंडीला जालन्याकडे घेऊन चालले होते. ज्या ठिकाणी अपघात झाला त्या ठिकाणी दोन-तीन पोलीस स्टेशनचे उप निरीक्षक व निरीक्षक जमा झाले. तेथील उप जिल्हाधिकारी श्रीमती रिचा महित्रा या सुध्दा त्या ठिकाणी गेल्या होत्या. परंतु अपघात घडल्यानंतर दोन ते तीन तास काहीच हालचाल झाली नाही. मृतदेह रस्त्यावर पडले होते. पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी हे त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांनी तेथील वारकऱ्यांना मृत देहाचे पोस्ट मार्टेम करावे लागेल, पोस्ट मार्टेम केल्यानंतर आम्ही हे मृत देह पाठविण्याची व्यवस्था करु असे सांगू लागले. अशा प्रकारच्या वाटाघाटी सुरु असतांना संस्थानच्या अध्यक्षांशी आम्हाला बोलू द्यावे असे वारकऱ्यांचे म्हणणे होते. दोन-तीन तासानंतर आजूबाजूच्या गावामध्ये ही घटना समजल्यानंतर सर्व लोक जमा होऊ लागले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. विक्रम काळे....

त्यानंतर त्यामधील एक-दोन व्यक्तिंनी दगडफेक सुरु केली त्यामध्ये महिला उप जिल्हाधिकारी जखमी झाल्या, दोन-तीन पोलीस निरीक्षक जखमी झाले. जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या अंगावर देखील हे लोक धावून गेले. त्या ड्रायव्हरला आमच्या ताब्यात देण्यात यावे अशी त्यांची मागणी होती. ज्या ड्रायव्हरने 11 लोकांचे जीव घेतले त्याला आम्हाला मारायचे आहे असे ते सांगत होते. परंतु पोलीस परवानगी देत नसल्यामुळे लोकांच्या भावना अनावर होऊन ते जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांच्या अंगावर धावून गेल्यानंतर त्यांना जवळच्या हॉटेलमध्ये जाऊन लपून बसावे लागले. अशाप्रकारे त्या ठिकाणी भावनेचा उद्रेक झाल्यानंतर त्यामधून नाईलाजास्तव गोळीबार करावा लागला. त्यामध्ये शेजारच्या गावातील दोन तरुणांचा मृत्यू झाल्याचे आपण पाहिले आहे. वारकऱ्यांची 40 वर्षाची जी अखंड परंपरा होती तिला गालबोट लागले.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . . .

सभापती महोदय, यापुढे असे होऊ नये. कारण दरवर्षी दिंडी येणारच आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दिंड्या येतात.त्यामुळे असे अपघात घडू नयेत या बाबतीत आपल्याला कोणती उपाययोजना करता येईल याचा विचार केला पाहिजे.शेवटी आपण अधिकाऱ्यांकडे बोट दाखविले किंवा अधिकाऱ्यांना दोषी धरले तर त्यांचे मनोधैर्य सुध्दा खचता कामा नये. कारण शेवटी ती देखील माणसे आहेत. त्यांनाही त्यांच्या जीवाची पर्वा आहे.त्यामुळे आपण जर यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करीत राहिलो तर मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यांचेही मनोधैर्य खचून जाईल. त्यांना देखील त्यांचे काम नीट करता आले पाहिजे ही बाब देखील आपल्याला लक्षात घ्यावी लागेल. त्या अनुषंगाने आपल्याला कोणत्या उपाययोजना करता येतील याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, तेथील लोक त्या ड्रायव्हरची मागणी का करीत होते ? कारण त्यांना आणि आपल्यालाही माहिती आहे की, कायद्यानुसार दोन-चार महिने शिक्षा झाल्यानंतर परत बाहेर येता येते. म्हणजे 11-11 माणसे मारावयाची, दोन-दोन, चार-चार खून करावयाचे आणि तरीही तो माणूस पुन्हा आपली कॉलर ताठ करुन बाहेर फिरतो अशा प्रकारची आपली जी व्यवस्था आहे, ती बदलली पाहिजे असे मला वाटते. त्यामुळे अशा संबंधित ड्रायव्हरचे लायसन्स हे कायम स्वरुपामध्ये रद्द करावयास पाहिजे जेणेकरुन त्याला यापुढे कोणतीही गाडी चालविता येणार नाही. अशा प्रकारची कायद्याने व्यवस्था करावयास पाहिजे. अशा प्रकारे जे अपघात होतात, त्यावेळी वाहन चालकाचे लायसन्स सुध्दा रद्द झाले पाहिजे. आपण याबाबतीत जोपर्यंत ठोस पावले उचलणर नाही, तोपर्यंत अशा प्रकारच्या घटनांना लगाम घालू शकणार नाही.

सभापती महोदय, मी राज्य शासनाला विनंती करतो की, आम्ही सदनामध्ये सातत्याने या विषयाच्या संबंधातील मुद्दा मांडत आहोत की, किमान जिल्ह्याजिल्ह्यांना जोडणारे जे रस्ते आहेत ते चार पदरी झाले पाहिजेत. आज एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यामध्ये जावयाचे असेल तर अरुंद रस्ते आहेत आणि त्यामुळे सातत्याने अपघात होत असतात. म्हणून जिल्ह्या-जिल्ह्यांना जोडणारे रस्ते चौपदरी झाले तर मला असे वाटते की, रस्त्यांवरील अपघात टाळण्यासाठी आपल्याला याचा फायदा होऊ शकतो.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आज या घटनेच्या निमित्ताने शासनाच्या वतीने मदत देण्यात आली. तसेच या जिल्हयाचे माननीय पालक मंत्री देखील तातडीने घटनास्थळी पोहोचले. तेथे ज्यांचे मृतदेह होते, त्यांच्या नातवाईकांना बोलावून ते संबंधिताच्या ताब्यात देऊन....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . . .

त्यांच्या-त्यांच्या गावामध्ये पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी स्वत: माननीय पालक मंत्री यांनी पहाटे 3.00 वाजेपर्यंत उपस्थित राहून, रात्रभर जागून सर्वांना मदत करण्याची भूमिका घेतली होती. जेव्हा अशा प्रकारची घटना घडते, तेव्हा त्यामध्ये राजकारण नसते. त्यावेळी विविध जाती-जमातीच्या लोकांकडून मदत केली जाते.शेवटी सर्वांनी या दु:खातून सावरले पाहिजे अशाच प्रकारची भूमिका घेण्यात आली हे देखील मला नमूद करावेसे वाटते. म्हणून यानिमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, वारकरी संप्रदायातील मंडळी मृत्यू पावली आहेत, त्यांच्या कुटुंबीयांच्या वारसांना शासनाने 1 लाख रुपये दिले आहेत, त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे. कारण हे लोक अत्यंत गरीब आहेत. तसेच यापुढे असे अपघात होऊ नयेत याची काळजी घेतली पाहिजे. पुढच्या वर्षी सुध्दा या रस्त्यावरुन दिंडी येणार आहे. त्यावेळी जेथे-जेथे दिंडी थांबणार आहे, त्याठिकाणी लोकांसाठी जी व्यवस्था करणे आवश्यक असेल ती शासनाने करावयास पाहिजे. यासाठी समाजामध्ये ज्या विविध संघटना काम करीत असतात, त्यांची देखील आपल्याला मदत घेता येईल. यादृष्टीने राज्यामध्ये ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे येथील रस्ते चौपदरी करण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलली पाहिजेत, यासाठी एक कृती कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. मग रस्त्यांसाठी टोल लावा. पण तेथील रस्ते चांगल्या प्रकारचे असावयास पाहिजेत जेणेकरुन अशा घटना घडणार नाहीत. लोकांचे जीव वाचतील अशा प्रकारचे काम शासनाने करावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि आमच्या मराठवाड्यातील सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या वतीने मृत आत्म्यांना शांती लाभो अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----

यानंतर श्री.शिगम अ. .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ): सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जालना जिल्ह्यातील पारनेर फाट्याजवळ एका कंटेनरने दिलेल्या धडकेमुळे 12 वारकऱ्यांच्या झालेला मृत्यू या संबंधी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी चर्चेला सुरुवात करण्या पूर्वी एक बाब निदर्शनास आणू इच्छिते की, काही सन्माननीय सदस्यांचे आपण नाव पुकारले तेव्हा ते सभागृहात उपस्थित नसतात नंतर मग सविस्तर बोलण्यासाठी वेळ मागतात. सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याचा अधिकार आहे, परंतु सन्माननीय सदस्यांनी सभागृहातील शिस्त पाळणे देखील आवश्यक आहे.

सभापती महोदय, अशी घटना पहिल्यांदा घडली अशातला भाग नाही. प्रत्येक वेळी अशी दुर्घटना घडली की आपण त्यावर चर्चा करतो. काही उपाय योजना करण्याचे सुचवितो. काही कालावधी नंतर ते सर्व मागे पडते. सभापती महोदय, खरे म्हणजे वारकऱ्यांनी ज्या मार्गावरुन दिंडी काढली होती त्या मार्गावर त्यांच्या सुरक्षिततेची व्यवस्था करणे शासनाची जबाबदारी आहे तसेच ती वारकऱ्यांची देखील आहे. या दुर्घटने संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय तळमळीने मुद्दे मांडलेले आहेत. या दिंडीचे अंबड तालुक्यातील लालवाडी आणि शहापूर येथे मुक्काम असतात. या दोन मुक्कामाच्या ठिकाणी दिंडीसाठी पाण्याची व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, जेवणाची व्यवस्था इत्यादींची व्यवस्था करण्यासाठी अंबड तहसीलदारांनी बैठक घेतली होती काय ?

सभापती महोदय, विधान सभेत माननीय गृह मंत्र्यांनी या प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधीशांमार्फत करणार असल्याची घोषणा केलेली आहे अशी माझी माहिती आहे. परंतु अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून माजी न्यायमूर्ती राजन कोचर समितीने केलेल्या शिफारशींवर मी चर्चा उपस्थित केली होती. आपण भाविकांच्या सुरक्षिततेसाठी काय कारवाई केली ? प्रत्येक धार्मिक स्थळाच्या ठिकाणची जबाबदारी गृह आणि परिवहन विभागाची आहे त्याच प्रमाणे तेथील तहसीलदारांची देखील आहे. चार ते पाच हजार वारकरी दिंडीमध्ये असतात. तेव्हा चार ते पाच हजार वारकरी ज्या रस्त्या वरुन जाणार आहेत तेथे त्यांची कोणती व्यवस्था करण्यात आली हे पाहण्याची जबाबदारी तहसीलदारांवर आहे. तेव्हा माझी या ठिकाणी पहिली मागणी आहे की, या प्रकरणी तहसीलदारांनी दुर्लक्ष केलेले आहे तेव्हा त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

सभापती महोदय, हा सहा चाकी कंटेनर राजस्थान, जिल्हा धवलपूर, पोस्ट सुलघर, येथील रामविलास श्रीराम त्यागी यांचा आहे. कंटेनरचा नंबर एचआर 38 एन 7429 आहे. आपल्या राज्यात परराज्यातील कंटेनर येतात त्यावेळी त्यांना महाराष्ट्रात सुरक्षितपणे वाहन चालविण्या बाबत सूचना दिल्या पाहिजेत. कारण त्यांना आपल्या कडील दिंडी हा प्रकार माहीत नसतो. दिंडीमध्ये तीन-चार हजार लोक असतात आणि ते रस्त्या वरुन पायी चालत असतात याची परराज्यातील वाहन चालकांना काहीच माहिति नसते. कंटेनर चालकाने भरधाव कंटेनर चालवून रस्त्यावरील 12 वारकऱ्यांना त्याखाली चिरडले आणि काहींना जखमी केले. एवढे होऊनही कंटेनर चालकाने कंटेनर थांबविला नाही तो तसाच पुढे नेला. लोकांनी तो कंटेनर अडविला नसता तर आणखी काही लोकांना त्याने चिरडले असते. त्या कंटेनरला अडविण्यासाठी मोटार सायकल वरुन दोघे जण गेले त्यांना देखील त्याने धडक दिली. त्यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला. कंटेनरला थांबविण्यासाठी जे लोक पुढे आले त्यांच्यावर सरकारने गुन्हा दाखल करण्या ऐवजी त्यांची प्रशंसा केली पाहिजे. जर लोक घरात घाबरुन बसले असते तर त्या कंटेनर चालकाने अजून किती तरी जणांचा मृत्यू घेतला असता, किती तरी जणांना जखमी केले असते. कंटेनर चालक जर पळून गेला असता तर तो सापडला देखील नसता. कंटेनरचे मालक देखील वाहन चालकास फरारी होण्यास सांगतात. आपण या संदर्भात चर्चा करीत आहोत. परंतु सहा महिन्यांनी तो वाहन चालक स्वतःच्या गावी गेलेला असेल आणि त्याच क्रमांकाच्या कंटेनरवर मालकाने दुसरा चालक ठेवलेला असेल. तेव्हा अशा अपघाताची जबाबदारी कंटेनर मालकावर निश्चित करणार काय ? लोकांना अपघात विमा योजनेचे पैसे मिळण्याची जबाबदारी कंटेनर मालकावर टाकली पाहिजे. माझा स्वतःचा अनुभव सांगते. आमच्या स्त्री आधार संस्थेच्या गाडीला एका ट्रकने धक्का दिला व तसाच ट्रक पुढे निघून गेला. त्यामध्ये नऊ जण जखमी झाले. त्या बाबत पोलिसांकडे तक्रार केल्यावर व नंतर त्या संबंधी वारंवार पाठपुरावा करुनही आम्हाला पोलिसांकडून शेवट पर्यंत हेच सांगण्यात आले की, "आम्हाला वाहन चालकाचा पत्ता सापडत नाही."

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

सभापती महोदय, अपघात झाल्यानंतर जी नुकसान भरपाई मिळावयास पाहिजे ती मिळत नाही. तेव्हा सरकारने स्वत: याचिकाकर्ते होऊन अपील करावे. तसेच अपघात करणाऱ्या टँकर चालकाकडून काही रक्कम वसूल केली पाहिजे. ट्रक किंवा कंटेनर अपघातात किती जणांना न्याय मिळाला तसेच किती ट्रक मालकांवर कारवाई करण्यात आली या संदर्भात परिवहन विभागाने आढावा घ्यावा. आपण कडक प्रकारची कारवाई केली नाही तर "मोले घातले रडाया" असे म्हणत तीच तीच चर्चा करीत बसायचे यामध्ये मला अर्थहीनता वाटते.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

या टँकरचा मालक परप्रांतातील माणूस आहे, त्याच्या बद्दल या ठिकाणी काहीच बोलले जात नाही. माझे असे म्हणणे आहे की, त्याला ताबडतोब अटक करुन महाराष्ट्रात आणले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी परिवहन विभागा बाबत एक मुद्दा उपस्थित केला होता. परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना कुठेही हा टँकर अडवावा असे वाटले नाही काय? त्याने येथे हा अपघात केला पण याच्या अगोदर सुध्दा काही लोकांना धडक मारत तो आला असेल, त्याने वाटेल तसे ओव्हर टेकिंग केले असेल. नागपूर येथे झालेल्या अपघाता बद्दलची लक्षवेधी सूचना मान्य झालेली असून त्यावर उद्या चर्चा होणार आहे. रस्त्यावरील वाहतुकीसाठी जसे रस्ते मोठे असले पाहिजेत, या बाबतची मागणी करण्यात येते त्याचप्रमाणे या रस्त्यावरुन कशा पध्दतीने गाडया चालविल्या पाहिजेत या बाबतीत कुठली संस्कृती नावाची गोष्ट आहे काय? रस्त्यांवरुन ज्या गाडया चालविल्या जातात, त्यातील 50 टक्के गाडया या बेदरकारपणे चालविल्या जातात. कोणी थांबायला तयार नसतात. पादचारी चालत असतील तर त्यांच्यासाठी कोणी गाडी थांबवत नाहीत. म्हणून खरा प्रश्न असा आहे की, वाहन चालवत असताना आमची कार्य संस्कृती काय आहे? केवळ ड्रायव्हर्सनी नाही तर श्रीमंत लोकांनी सुध्दा लोकांना चिरडल्याचे उदाहरणे येथे कुलाब्यामध्ये झालेले आहे. म्हणून या संदर्भातील सुरक्षितते विषयीचा कार्यक्रम आपण कशा प्रकारे ड्रायव्हर्सपर्यत पोहचविणार आहोत हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या पालख्या पुढच्या वर्षीही येणार आहेत हे बरोबर आहे. परंतु या पालख्या येत असताना त्यांच्यासाठी कशा प्रकारची आश्रयस्थाने असली पाहिजेत, यासाठी शासनाने पाऊले उचलण्याची गरज आहे. त्यासाठी आम्ही आमदार निधी सुध्दा देऊ शकतो. या पालख्यांना आश्रयासाठी, जेवणासाठी काही व्यवस्था असली पाहिजे. इतकेच नाही तर त्यांची निगराणी ठेवण्याची जबाबदारी सुध्दा काही व्यक्तींवर असली पाहिजे. ही जी घटना घडली आहे दुर्दैवाने त्याच्या दुसऱ्या दिवशीच एकादशी होती. एकादशीच्या आदल्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडलेली आहे आणि त्यामध्ये दूर्देवाने वारकऱ्यांचा मृत्यू झालेला आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा की, जो गोळीबार झालेला आहे आणि ज्या लोकांवर केसेस दाखल केलेल्या आहेत त्या बाबतीत शासनाने समझदारीची आणि सहानुभूतीची

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

भूमिका घेतली पाहिजे. मी हिंसाचाराचे कुठेही समर्थन करणार नाही पण लोकांचा जो उद्रेक झ ालेला आहे तो टँकरच्या विरुध्द झालेला आहे, टँकर मालकाच्या विरुध्द झालेला आहे. लोकांना असहय झाल्यामुळे त्यांनी कायदा हातामध्ये घेतलेला आहे हे लक्षात घेण्यात यावे. या संदर्भात माझ या माहिती प्रमाणे जालना जिल्हयामध्ये पोलिसांनी मोठया प्रमाणात धरपकड सुरु केलेली आहे. मंत्री महोदय, श्री. सतेज पाटील यांच्याकडे गृह खात्याचा कार्यभार नव्याने आलेला आहे. तीन वर्षापूर्वी जालना जिल्हयामध्ये चंदन तस्करी करणाऱ्या लोकांना अशाच प्रकारे जनतेने कायदा हातात घेऊन त्यांना धडा शिकविलेला होता त्यासंदर्भात संपूर्ण गावातील लोकांविरुध्द कलम 302 चा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पण त्याचे पुढे काय झाले हे कोणालाच माहीत नाही. कारण अशा प्रकरणांमध्ये गुन्हा सिध्द करणे अतिशय अवघड असते. म्हणून सुरुवातीलाच कमीत कमी केसेस दाखल करण्यात याव्यात. या बाबतीत जास्त अतिरेक केला तर त्याचा परत वेगळा उद्रेक होऊ शकतो.

सभापती महोदय, परवाच्या दिवशी एका वाहिनीवर मंत्री महोदय, श्री. बबनराव पाचपुते आणि अन्य काही वारकरी संप्रदायातील लोकांची मी चर्चा ऐकली. त्या वाहिनीवर "वारकऱ्यांची सहनशीलता संपत चालली आहे काय" अशा प्रकारचा विषय होता. म्हणजे अपघात वारकऱ्यांचा झालेला आहे आणि वारकऱ्यांचीच सहनशीलता संपत चालली आहे काय, असा त्या चर्चेचा मथळा होता. त्या चर्चेमध्ये मंत्री महोदय, श्री. पाचपुते साहेब सारखे सांगत होते की, वारकरी भांडायला लागले आहेत, वारकरी रिंगण होऊ देत नाहीत, वारकरी अमुक होऊ देत नाहीत. माझे म्हणणे असे आहे की, वारकरी काही बाबतीत रागवले तर ते माणूस आहेत. वारकरी देवा सारखे सहनशील असू शकत नाहीत. परंतु या अपघातात वारकरी मृत झाल्यावर "वारकऱ्यांची सहनशक्ती संपली आहे काय" अशा प्रकारच्या विषयावर चर्चा करणे, वारकऱ्यांच्या मृत्यूच्या बलिदानानंतर सुध्दा आम्ही हा प्रश्न विचारणार असू तर ते जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. कुठे रिंगण झाले नाही किंवा कुठे अव्यवस्था झाली, याबद्दल वारकऱ्यांमध्ये नाराजी आहे. यासाठी पंढरपूर विकास आराखडयावर एकदा सविस्तर चर्चा घेऊन त्या बाबतीत काय प्रगती झाली हे आपण बघितले तर मला असे वाटते की, शून्य प्रगती झाली आहे.

..3...

डॉ. नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, पंढरपूरच्या विकास आराखडयाच्या बाबतीत पंढरपूर नगरपालिकेला विश्वासात घेतले नाही म्हणून दोन दिवसापूर्वी पंढरपूर बंद होते. चंद्रभागेचे पाणी दूषित होते. या सगळया प्रश्नांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री साळुंखे, भालके हे नेहमी लक्ष वेधीत असतात परंतु शासनाने देहू, आळंदी, पंढरपूर, बुलढाणा, शेगाव या संस्थानांसाठी 400 कोटी रुपयाचा जो निधी दिलेला आहे त्याचा विनियोग योग्य प्रकारे झाला नाही तर अशा प्रकारे घडणाऱ्या दुर्घटना शासन कशा प्रकारे टाळणार आहे हा खूप मोठा प्रश्न आहे, या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिपकराव साळुंके (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, संपूर्ण भारतामध्ये जी तीर्थक्षेत्रे आहेत त्यामध्ये पंढरपूरचे एक तीर्थक्षेत्र आहे. तो गरिबांचा पांडुरंग आहे. गरीब असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनाला पंढरपूरला वर्षभरामध्ये कोट्यवधी भक्त येतात. त्यामध्ये केवळ संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात राज्यातून आणि संपूर्ण भारतातून वर्षभर भक्त मंडळी त्या ठिकाणी येत असतात. त्या ठिकाणी दरवर्षी आषाढी एकदशीला मोठी यात्रा भरत असते. आषाढीला संपूर्ण महाराष्ट्रातून तसेच कर्नाटकमधून मोठ्या प्रमाणवर दिंड्या पंढरपूरकडे येत असतात. कोल्हापूर भागातून, रत्नागिरी-कोकण भागातून, मुंबईकडून, ठाण्याकडून दिंड्या येतात. त्याचप्रमाणे विदर्भातून, मराठवाड्यातून, खानदेशातून, गुजरातमधून हजारो दिंड्या पंढरपूरकडे येत असतात. त्यामध्ये गजानन महाराजांची दिंडी पालखी ही सगळ्यात मोठी दिंडी असते. या दिंडीचा जवळजवळ 485 किलोमीटरचा प्रवास आहे. जवळजवळ दोन ते अडीच हजार अगदी शिस्तीचे वारकरी या दिंडीमध्ये सहभागी होतात. पंढरपूरला येणाऱ्या ज्या सर्व दिंड्या आहेत त्यामध्ये शिस्तीची असलेली ही एकमेव दिंडी आहे.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रवेश करीत असताना सोलापूर जिल्ह्यातील प्रतिनिधी म्हणून या दिंडीच्या स्वागताला आम्ही सगळीच मंडळी जात असतो. पंढरपूरला येणारी ही एकमेव दिंडी अशी आहे की, ज्या दिंडीची स्वत:ची आरोग्य व्यवस्था, स्वत:ची सुरक्षा व्यवस्था, स्वत:ची भोजन व्यवस्था, स्वच्छतेची व्यवस्था, आरोग्याची व्यवस्था या सर्व व्यवस्था गजनान महाराजांचे संस्थान करीत असते. पंढरपूरकडून मंगळवेढ्याकडे दिंडी चालल्यानंतर गिनीज बुकामध्ये नोंद करावी अशा प्रकारची या दिंडीची शिस्त असते. त्या ठिकाणी काम करणाऱ्या माझ्‍ यासारख्या कार्यकर्त्याला परवाच्या दिवशी हा अपघात समजला. मनाला धक्का लावणारी अतिशय हृदयद्रावक घटना परवाच्या दिवशी घडली.

सभापती महोदय, या ठिकाण्‍ी अनेक सन्माननीय सदस्यांनी दिंडीच्या बाबतीत, रस्त्याच्या बाबतीत त्याचबरोबर ट्राफिक पोलीस, बंदोबस्त इत्यादी बाबतीत चर्चा केली. खरे तर या दिंडीच्या बाबतीत माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी सांगितले की, गजानन महाराज संस्थानच्या ज्या ज्या दिंड्या आहेत त्या सगळ्या दिंड्या महिना दीड महिना अगोदर आपला कार्यक्रम ठरवतात व तो कार्यक्रम

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिपकराव साळुंखे .....

सर्व जिल्ह्यांना कळविण्याची व्यवस्था त्यांच्याकडे असते. मघाशी मी आपल्याला सांगितले की, या दिंडीतील वारकऱ्यांना जवळजवळ 475 किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. रोज किमान 30 ते 40 किलोमीटर चालल्यानंतर दुपारी सहज जरी विसाव्याला थांबले तरी या वारकऱ्यांना कधी झोप लागली हे कळत नाही. इतके थकून जाणारी ही वारकरी मंडळी आहेत. दुपारच्या वेळी विसाव्याच्या वेळेला अचानकपणे काळाने घाला घातला. एक कंटेनर अगदी बेधूंदपणे या वारकऱ्यांच्या ठिकाणावर गेला. त्यानंतर घडलेल्या सगळ्या गोष्टी माझ्या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितलेल्या आहेत.

सभापती महोदय, या सभागृहात आता माननीय गृह मंत्री तसेच माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. आर.टी.ओ.ची आपल्या राज्यातील व्यवस्था म्हणावी तशी परिणामकारक नाही. आजही आपण हायवेवर बघतो की, मोठमोठे कंटेनर परराज्यातून आपल्या राज्यात येत-जात असतात. त्यांची तपासणी प्रत्येक 5-10 मिलोमीटरवर केली गेली पाहिजे. परंतु तशी कोणतीही व्यवस्था आपल्या राज्यामध्ये नाही. आमच्यासारखा कार्यकर्ता काम करीत असताना अनेक लोक आम्हाला भेटत असतात. अनेक लोक ट्राफिक पोलीसकडे बदली होण्यासाठी प्रयत्न करीत असतात. ट्राफिकची पोस्ट आपल्याला मिळाली पाहिजे यासाठी प्रयत्न करीत असतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिपकराव साळुंखे....

ती एवढयासाठी की, तेथे वेगळ्या पध्दतीने काम करावे लागते. अशा प्रकारची व्यवस्था झाल्यानंतर जे काय घडायचे असते ते अशा दुर्दैवी घटनांच्या माध्यमातून समोर येते. तशीच घटना दिनांक 25 जुलै, 2011 रोजी घडली आहे. अतिशय शिस्तप्रिय असलेल्या गजानन महाराजांच्या दिंडीवर कंटेनर घुसला आणि त्यात 13-14 वारकरी मरण पावले. काही दिवसांपूर्वी गजानन महाराजांचा प्रकट दिन साजरा करण्यात आला, तसेच जन्म शताब्दी सोहळ्याला 10 लाख लोक आले होते. या दिंडीचा पंढरपूरपर्यंत 475 कि.मी.प्रवास होत असताना वारकऱ्यांच्या टाचेला कधी काटा रुतल्याचे माझ्या सारख्या कार्यकर्त्याला ऐकिवात तरी आलेले नाही. पण अचानकपणे त्या वारकऱ्यांमध्ये कंटेनर घुसल्यावर ही वारकरी मंडळी मृत्युमुखी पडली आहेत. त्यानंतरही अत्यंत बेदरकारपणे जाऊन एका मोटर सायकलवाल्याने अडविल्यावर त्यालाही उडविले आहे. त्यानंतर सर्व प्रकार घडला आहे. या संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी अशी मी राज्याच्या माननीय गृह मंत्र्यांना विनंती करतो. एवढी मोठी घटना घडल्यानंतर साहजिकच लोकांचा राग अनावर होणे अपेक्षित आहे. त्यातून पुढील घटना घडल्यावर गोळीबार झालेला आहे. त्याची न्यायालयीन चौकशी होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, शासनाने 1 लाख रुपयांची मदत मृतांच्या नातेवाईकांना जाहीर केली आहे. माझ्या पूर्वीच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी सुध्दा 5 लाख रुपयांची मदत करण्याची मागणी केलेली आहे. कारण हे वारकरी गरीब वर्गातील असतात. ते दरवर्षी 500 कि.मी.पायी प्रवास करुन पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला जातात आणि पुन्हा 500 कि.मी.पायी प्रवास करुन घरी येतात. हा प्रवास 15-16 दिवस सुरु असतो. शेगावच्या दिंडीतील वारकरी महिनाभर चालत असतात. या वारकऱ्यांना किमान 40 कि.मी.दररोज प्रवास करावा लागतो. एखाद्या गावी विसाव्यासाठी थांबल्यावर त्यांना बसल्या बसल्या कधी झोप लागते ते कळतही नाही. एवढे ते कंटाळून गेलेले असतात. म्हणून त्यांच्या वारसदारांना 5 लाख रुपयांची मदत करण्याबाबत पुनर्विचार करावा व घडलेल्या घटनेची न्यायालयीन चौकशी करावी अशी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो आणि मृत वारकऱ्यांना मी श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द संपवितो.

------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, काल अंबडफाटा-जालना येथे वारकऱ्यांची दिंडी चालू असताना त्यातील काही वारकरी झाडाखालाी बसले होते. तेथे भरधावपणे येणाऱ्या कंटेनरने 11 वारकऱ्यांना जागेवरच चिरडून मारणे व त्याच कंटेनरने पुढे भरधाव वेगात जाऊन पळून जाण्याचा प्रयत्न करणे आणि त्यांना अडविण्याचा प्रयत्न करीत असताना मोटर सायकलला डॅश मारुन आणखी एकाचा मृत्यू घडविणे या घटनेमुळे लोकांचा उद्रेक होऊन आजुबाजूच्या परिसरातील लोक तेथे येणे, त्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागणे व त्यात दोघांचा मृत्यू होणे, या सर्व घटनेत एकूण 14 जणांचे झ ाालेले मृत्यू हे राज्याच्या दृष्टीने निश्चितच खेदजनक आहेत. दु:खद गोष्ट आहे.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी वारीच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी विधानसभेमध्ये सांगितले आहे की, आपल्या महाराष्ट्राच्या काही सांस्कृतिक परंपरा आहेत. त्यापैकी वारी हा एक अभिनव उपक्रम आहे. जगाच्या काना कोपऱ्यामध्ये अन्यत्र कोठेही असा उपक्रम नाही. लाखो लोक एका ओढीने, श्रध्देने पंढरपूरच्या दिशेने महिनाभर चालत जात असतात. त्यांना ऊन, पावसाची पर्वा नसते. पांडुरंगावर खूप मोठी श्रध्दा हे त्याच्या पाठीमागचे कारण असते. काहीवेळा त्या वारीमध्ये मी स्वत:ही वेळ काढून चालत सहभागी झालेलो आहे. त्यातून मिळालेला आत्मिक आनंद वेगळाच असतो. वारकरी संप्रदायाचे खूप मोठे योगदान महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये आहे. वारकरी संप्रदायाने सर्वांना सांस्कृतिक माळेमध्ये बांधले आहे. जन प्रबोधनाचे, राष्ट्र प्रेमाचे खूप मोठे काम हा वारकरी संप्रदाय पिढ्यांपिढया करीत आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना राज्य स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेली पार्श्वभूमी याच साधू संतांच्या विचारातून प्रेरणा घेतलेल्या वारकंरी संप्रदायाने महाराष्ट्रात तयार केली होती. ही एक राज्यात प्रदीर्घ काळ चालत असलेली परंपरा आहे.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

मी काही दिवस सोलापूर जिल्हयाचा पालकमंत्री होतो. पंढरपूरला लाखो लोक येणार त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था शासनाकडून कशी केली जाते, किती सुरक्षा आपल्याला द्यावी लागते या सगळ्या गोष्टींचा आढावा घेत असताना जाणीवपूर्वक एक गोष्ट माझ्या लक्षात आणून देण्यात आली की, सगळ्यात कमी पोलीस बंदोबस्त या उपक्रमासाठी लागतो.

सभापती महोदय, याचे प्रमुख कारण म्हणजे वारी इतकी स्वयंशिस्त असते की, आपापल्या शिस्तीमध्ये, आपापल्या नादात, आपापल्या तालात हे लाखो लोक चालत जात असतात. आपण जे काही पोलीस पाठवितो ते काही तासातच माऊली माऊली म्हणत वारकऱ्यांमध्ये जातात आणि त्यांचाच भाग बनतात, तेही पोलीस रहात नाहीत आणि वारकऱ्यांना पोलिसांची आवश्यकता नसते. असेच तेथील भावस्पर्शी वातावरण मी स्वत: डोळ्यांनी बघितले आणि अनुभवले देखील आहे. महाराष्ट्रातील दुसरे आणखी एक प्रमुख शेगाव येथील तीर्थक्षेत्र आहे. या देवांचीही युती होत असते. म्हणून एका तीर्थक्षेत्रापासून दुस-या तीर्थक्षेत्रापर्यंत पालखी सोहळा आयोजित केला जातो.

सभापती महोदय, वारकरी संप्रदायाकडे बघितले तर सगळ्या जाती धर्मातील विशेषत: शेती व्यवसायातील माणसे खूप मोठया प्रमाणात सहभागी होतात. अलिकडच्या काळात तरुण पिढी फार मोठया प्रमाणात या वारीमध्ये समाविष्ट झालेली आपल्याला बघावयास मिळते. अगदी संगणक क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ.विजय भटकर सुध्दा मनोभावे या वारीमध्ये चालताना मी पाहिले तसेच शिक्षण क्षेत्रातील दिग्गज प्रा.विश्वनाथ कराड यांनाही चालताना पाहिले. त्यांच्याबरोबर काही काळ मीही चाललो. गावागावातून वाऱ्या येत असतात. पंढरपूरला विठ्ठलाचे दर्शन घेत असतात आणि तितक्याच शिस्तीमध्ये परत जात असतात. त्यांच्याकडून कधी पोलीस बंदोबस्त मागितला जात नाही आणि त्यांना तशी काही आवश्यकता वाटत नाही. तरी सुध्दा आषाढी एकादशी असेल तर आपण मुद्दाम बंदोबस्त ठेवतो. खूप मोठे मनुष्यबळ पंढरपूरला या वारीच्या निमित्ताने बोलावतो.

सभापती महोदय, एक गोष्ट मुद्दाम लक्षात आणून देऊ इच्छितो की, कुठेही एका जिल्हयातील पोलीस बळ नेऊन दुसऱ्या जिल्हयामध्ये डिप्लॉय करतो त्यावेळी नाराजीची भावना त्यांच्यामध्ये असते. नागपूरला हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्यभरातील पोलीस तेथे बोलावतो. फारशा समाधानाने ते येत नाहीत. एका जिल्हयातील पोलीस दुसऱ्या जिल्हयात पाठवित असताना घरापासून दूर जाणे, गैरसोयीला तोंड देणे या गोष्टी कोणालाही शक्यतो नको असतात.

श्री.आर.आर.पाटील....

मी हेही अनुभवले, या वारीच्या बाबतीत मात्र पोलीस स्वत:हून अर्ज करतात आणि वारीला बंदोबस्त मागून घेतात. असे आजपर्यंत वारी न चुकविणारे पोलीस दलामध्ये खूप मोठ्या प्रमाणात आहेत. इतक्या शिस्तबध्द वारीला काल मात्र धक्का बसला. वारीतून चालत असताना दुपारच्या वेळी काही वारकरी जेवण झाल्यानंतर एका झाडाखाली रस्त्याच्या कडेला बसले होते. हरियाणा राज्यात रजिस्ट्रेशन झालेला कंटेनर भरधाव आला आणि 11 लोक चिरडून मेले. कंटेनर चालकाने रस्त्यावरुन पळून जाण्याचा प्रयत्न केला. 11 लोक जागेवरच चिरडले गेले. मानवतेच्या दृष्टीकोनातून कंटेनर थांबला असता तर माझी खात्री आहे की, त्या वारकऱ्यांनीच त्याचे संरक्षण केले असते. परंतु तो पळून गेला. या वारीतील 11 माणसे मेली. ही बातमी अंबडपासून सहा कि.मी.पर्यंतच्या अनेक गावांमध्ये पसरली आणि आपल्या परिसरात इतक्या मोठ्या संख्येने वारकऱ्यांचा मृत्यू झाला हे वृत्त अनेकांना हेलावून गेले आणि तिकडच्या दिशेने मोठा मॉब आला. दुपारी 3.45 वाजता घटना घडली. घटना घडल्याबरोबर त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक तातडीने जालन्याहून घटनास्थळी पोहोचले. त्याचे लोकेशन बघितले तर 15 मिनिटात हे सगळे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी आले होते.

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. भोगले.... 16:25

श्री. आर.आर.पाटील.........

सभापती महोदय, वारकरी आणि ग्रामस्थांच्या मदतीने गंभीर जखमींना जालना व किरकोळ जखमींना अंबड येथे हलविण्यात आले. तसेच डेड बॉडी उचलण्याचा प्रयत्न पोलिसांमार्फत करण्यात आला तेव्हा वारकऱ्यांनी मात्र त्याला थोडासा विरोध केला. त्यांच्या म्हणण्यानुसार दिंडीचे प्रमुख जोपर्यंत येत नाहीत तोपर्यंत डेड बॉडी हलवू नका अशी त्यांनी विनंती केली. अशा प्रकारे वारकऱ्यांच्या भावना दुखावू नयेत म्हणून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांच्या दिंडीच्या प्रमुखांना फोन लावण्याचाही प्रयत्न जिल्हाधिकाऱ्यांनी केला. असे प्रयत्न सुरु असताना दुसऱ्या बाजूने मात्र मोठ्या प्रमाणात जमाव येत होता. त्यामुळे वारकरी थोडे बाजूला राहिले आणि जो जमाव जमला होता त्यांनीच ड्रायव्हरला आमच्या ताब्यात द्या अशी मागणी सुरु केली. कंटेनरचा ड्रायव्हर अपघात स्थळापासून 14 किलोमीटर अंतरापर्यंत पळून गेला होता, त्याला पोलिसांनी पकडून आणले होते. अशा संतप्त जमावाच्या ताब्यात देणे योग्य नव्हते. कारण त्याच्या जिवाला बरे-वाईट होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच अशा मॉबच्या ताब्यात ड्रायव्हरला देण्यामुळे न्यायनिवाडा होऊ शकत नाही म्हणून पोलिसांनी थोडे समजूतीने घेण्याचा प्रयत्न केला. आजूबाजूच्या गावातील लोक सुध्दा हा प्रकार पाहून संतप्त झाले होते, त्यांचा उद्रेक होत चालला होता. त्यांनी पोलिसांवर दगडफेक करण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात खरे तर अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी आवश्यक तेवढेच पोलीस पाठविले होते. पण नंतर मात्र अशा प्रकारे मॉब जमेल आणि लोक प्रक्षुब्ध होतील असा अंदाज नव्हता. पण नंतर मात्र मॉबने तीन चार गाड्या, एस.पी. आणि जिल्हाधिकाऱ्यांची गाडी व इतर वाहने पेटविली. तरी देखील एस.पी. आणि जिल्हाधिकारी व उप विभागीय अधिकारी त्यांना बाजूला घेण्याचाच प्रयत्न करीत होते. कारण तेथे सुध्दा अशी परिस्थिती होती की, एका बाजूला वारकरी या जमावातील लोकांना समजावण्याचा प्रयत्न करीत होते पण दुसऱ्या बाजूने मात्र मॉब बेधुंदपणे दगडफेक करीत होता. एका पोलीस हेड कॉन्स्टेबलला लागलेल्या दगडात त्याचे सहा दात जागेवरुनच गळून पडले, गाड्या जाळण्याचा प्रकार सुरुच होता. त्यात काही वारकरी सुध्दा जखमी झाले होते. अशा प्रकारे आपण कोठे दगडफेक करतो व का करतो हेही जमावाच्या लक्षात येत नव्हते. त्यात रस्त्यावर डेड बॉडीज पडलेल्या असल्याने दगडफेकीचा मार या मृत लोकांनाही बसत होता. या

.....2.....

श्री. आर.आर.पाटील........

घटनास्थळाचे फोटोग्राफ्स बघितले तर तेथे फेकलेल्या दगडांचा खच दिसून येतो. अशा प्रकारे एका बाजूने डेड बॉडीवर दगडफेक केली जात होती, वारकरी सुध्दा त्यात जखमी होत होते, पोलीस जखमी होत होते. तरी सुध्दा संयम राखून दीड-पावणे दोन तास पोलिसांचा प्रयत्न सुरुच होता. आतापर्यंत ही गोष्ट वाऱ्यासारखी सर्व परिसरात पसरली होती. बघ्या लोकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी जमत होती आणि दिसेल ती वाहने पेटविण्याचा प्रयत्न होत होता. अशा प्रकारे एकंदर 9 वाहने पेटविण्यात आली. त्यात एस.टी.च्या बसेस, रस्त्याने जाणारा तेलाचा टँकर सुध्दा होता. त्याला जर आग लागली असती तर मोठ्या प्रमाणावर जिवीत हानी होण्याची शक्यता होती. अशा अवस्थेत सुरुवातीला अश्रुधूर सोडला. तरी देखील जमाव आटोक्यात येत नाही असे दिसल्यावर मात्र पोलिसांनी आवाजाची फायरिंग सुरु केली. पण गावकऱ्यांच्या लक्षात आले की, पोलीस फक्त आवाजाची फायरिंग करीत आहेत त्यामुळे जमाव अधिक आक्रमक होत होता. मागील बाजूच्या वाहनांवर दगडफेक चालूच होती. यात परिस्थिती हाताबाहेर जाईल अशी वेळ निर्माण झाली होती. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या घटनेत एकाही वारकऱ्याला पोलिसांनी मारलेले नाही. किंवा एकही वारकरी लाठीचार्जमध्ये जखमी झाला नाही. कारण वारकऱ्यांच्या दिशेने लाठीमार केलेलाच नाही. वारकऱ्यांची मन:स्थिती बघितली तर जे महिनोंमहिने त्यांच्या बरोबर चालले त्यातील 11 जण चिरडले गेले, अनेक जखमी आहेत. यात बुलढाणा जिल्ह्यातील काही वारकरी होते.......

यानंतर श्री. भारवि.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

दगडफेक करण्याच्या मन:स्थितीमध्ये ती माणसे नव्हती. एका बाजूला पोलिसांना सहकार्य करून मदत करण्याचा प्रयत्न करीत होती. पण दुसऱ्या बाजूला याच्याशी कुठलाही संबंध नसलेला मॉब मात्र क्षणाक्षणाला आक्रमक होत होता. शेवटी कशानेही परिस्थिती आटोक्यात येत नाही म्हणून पोलिसांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने नाईलाजाने गोळीबार केलेला आहे. त्यात 2 लोकांचा मृत्यू झालेला आहे. त्याचे सरकारला कुठल्याही प्रकारचे समर्थन करावयाचे नाही.

कधी तरी या सदनामध्ये रस्त्यावर घडणाऱ्या अपघाता संबंधी व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे. या संबंधी असलेले आपले कायदे कमकुवत आहेत काय, त्यात आणखी दुरूस्ती केली पाहिजे काय यावर अतिशय चिंतेने विचार करावयास पाहिजे. अशी आज आपल्या राज्यातील रस्त्यावरील अपघातांची परिस्थिती आहे. ही गोष्ट खरी आहे की, देशाच्या ॲव्हरेजपेक्षा आपल्या राज्यातील अपघाताचे प्रमाण जास्त नसले तरी दरवर्षी बारा ते साडे बारा हजार माणसे मृत्यूमुखी पडत आहेत, तर 30 हजार माणसे कायमची अपंग होत आहेत. म्हणजे दरवर्षी 50 हजार कुटुंबांना कुठला ना कुठला तरी फटका बसत आहे. कितीही महागड्या आणि सुरक्षित गाड्या घेतल्या तरी त्याही अपघातस्थळी भक्ष्य पडत आहेत आणि मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत. हे सर्व गेल्या वर्षी माझ्या लक्षात आले. अपघात म्हणून पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद होतो म्हणून ती गृह विभागाशी संबंधित बाब होते.

वाहतूक हा परिवहन विभागाचा विषय असला तरी सुद्धा त्या विभागातील अधिकाऱ्यांना बोलावून, पुढाकार घेऊन मी काही करण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या सर्वांना माहीत असेल की, केंद्र शासनाच्या वतीने रस्ते सुरक्षा सप्ताह साजरा केला जातो. पण या वर्षी आपल्या राज्यामध्ये पंधरवडा साजरा केला गेला. मी स्वत: पुढाकार घेऊन कोकण, पुणे इथल्या मेळाव्यांना हजर राहिलो. याला प्रमुख कारण होते. अपघातामध्ये 30 हजार लोक गंभीर जखमी होत आहेत, साडेबारा हजार लोक अपघातामध्ये मृत पावत आहेत. अपघातात मृत पावत असलेले लोक हे तरूण आहेत. हेच तरूण आज अपघातामध्ये जास्त भक्ष्य ठरत आहेत.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

आपल्या राज्यातील तरूण वर्ग अपघातात मृत्यू होणे, जखमी होणे, अपंग होणे ही गोष्ट निश्चितपणाने योग्य नव्हती. म्हणून पोलीस विभागा तर्फे मी पुढाकार घेतला आणि काही मोहीमा हाती घेतल्या. मुंबईमध्ये दारू पिऊन धनदांडग्यांची मुले गाड्या चालवत आहेत आणि फुटपाथवर झ ोपलेल्या गरिबांना चिरडत आहेत. अशा घटना लक्षात आल्यावर मुंबईमध्ये तीन वर्षापासून ड्रंकन डाईव्हच्या विरोधात मोठी मोहीम हाती घेण्यात आली. पूर्वी आपण शेकड्यांमध्ये केसेस करत होतो. पण गेल्या काही वर्षात एकट्या मुंबईमध्ये 24 हजार वाहन चालकांवर केसेस दाखल केल्या आहेत. सुरूवातीला दिवसा दारू पिऊन गाडी चालविणाऱ्यांची संख्या पाच, साडे पाच हजार पर्यंत जायची. आता ती हजार, बाराशे पर्यंत खाली आली आहे. ज्या दिवशी आम्ही मोहीम हाती घेतो त्या दिवशी मुंबई शहरामध्ये एका दिवशी अजूनही हजार ते बाराशेजण दारू पिऊन गाडी चालवताना आढळत आहेत. त्यामुळे या संबंधातील आपले कायदे पुन्हा एकदा तपासण्याची निश्चित अशी वेळ आलेली आहे. हा केंद्र सरकारचा कायदा आहे. त्यामध्ये काही बदल निश्चितपणाने सुचवू शकतो.

मी प्रांजळपणाने कबूल करेन की, ड्रायव्हींग लायसेन्स मिळणे ही सर्वात सहज व सोपी गोष्ट आहे. कोणतीही टेस्ट न देता आज ड्रायव्हींगचे लायसेन्स मिळू शकते. मुंबई सारख्या ठिकाणी आज टेस्टसाठी ग्राऊंडच नाही. तरी सुद्धा लायसेन्स दिले जाते. अशा पद्धतीने लायसेन्स घेणारी माणसे अपघात करून स्वत: मेली तर फार दु:खाची गोष्ट नाही. तरी पण दु:ख आहेच. त्यामध्ये त्यांचीही चूक आहे. पण निरपराध माणसे मरणे ही खूप मोठी चूक आहे. त्यामुळे आज आम्ही ज्या पद्धतीने लायसेन्स देत आहोत त्याचा देखील आज कुठे तरी विचार होण्याची आवश्यकता आहे.

आज रस्त्यावरील वाहनांमधून क्षमतेपेक्षा जास्त माल वाहून नेला जात आहे. या संबंधी देखील खूप मोठे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला गेला.

यानंतर श्री.सरफरे....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील..

परंतु त्यासाठी मिळणारी शिक्षा फार सौम्य स्वरुपाची आहे. ट्रकचे मालक ट्रक विकत घेतात, कंटेनर विकत घेतात आणि जास्त नफा मिळविण्याच्या दृष्टीने कमी पगाराचे ड्रायव्हर नेमतात. ड्रायव्हर नेमतांना त्याच्या ड्रायव्हींगचा अनुभव, त्याचे शिक्षण याचा काहीही विचार केला जात नाही. याचे कारण अपघात झाला तर विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळते आणि ड्रायव्हरवर कारवाई होते. या धंद्यामध्ये नफा झाला तर सर्व नफा ट्रकच्या मालकाला मिळणार आणि अपघात झाला तर शिक्षा भोगायला ड्रायव्हर आहे आणि नुकसान भरपाई द्यायला विमा कंपनी आहे. यामुळे मालकांमध्ये बेजबाबदारपणा वाढत चालला आहे. फारशी क्षमता नसलेले, अनुभव नसलेले ड्रायव्हर नेमले जात आहेत. राज्यात अनेक बसेसचे अपघात झाले व त्यामध्ये मोठया प्रमाणात जीवितहानी झाली. तिचे विश्लेषण केले असता त्या बसच्या चालकाने सतत ड्रायव्हींग केल्याची माहिती पुढे आली. वाहन चालकाने सलग किती तास वाहन चालवावे याबाबत आपणाकडे मर्यादा नाहीत. त्याच्या कामाशी आपण आपल्या कामाच्या वेळेचा मेळ घालतो. परंतु त्याचवेळी आपल्या ड्रायव्हरने किती वेळ ड्रायव्हींग करावी हेसुध्दा अनेक जण विसरतात. 50-60 प्रवाशी असलेल्या बसच्या चालकाने सलग 13 ते 14 तास ड्रायव्हींग केल्यानंतर होणाऱ्या अपघातामध्ये मोठया प्रमाणात जीवितहानी होते याची वनी येथील अपघातासारखी अनेक उदाहरणे आपण पाहिली आहेत. अशा परिस्थितीत रस्त्यावरील वाढत्या अपघातांच्या संदर्भात विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांची एकत्रित अशी एक व्यापक चर्चा करण्याची मला आवश्यकता वाटते.

सभापती महोदय, मी ग्रामीण विकास मत्री असतांना मला एक गोष्ट नेहमी सतावत होती की, राज्यात नैसर्गिक मृत्यूनंतर सर्वाधिक मृत्यू हे दूषित पाण्यामुळे होत होते. आज त्यामध्ये बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाल्यामुळे दूषित पाण्यामुळे होणारे मृत्यू तिसऱ्या क्रमांकावर वर गेले आहेत आणि रस्त्यावरील अपघातामुळे होणारे मृत्यू हे दुसऱ्या क्रमांकावर आले आहेत. एका बाजूंनी दिवसें दिवस वाहनांची संख्या वाढत चालली आहे, जीवन गतिमान होत चालले आहे. दुसऱ्या बाजूनी रस्त्यावरील सुरक्षितता धोक्यात निघाली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून 11 निरपराध वारकरी बळी पडले आहेत. विश्रांतीसाठी झाडाखाली बसलेली माणसे नाहक चिरडून मेली. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात शासन सहभागी आहे. त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याची सुध्दा आवश्यकता आहे. सभापती महोदय, शासनाच्या निकषानुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये मरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ...

पावलेल्या व्यक्तिला आपण मदत करतो, अन्यथा मदत घोषित केली जात नाही. परंतु काल सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत घोषित केली आहे. आज मी सकाळी स्वत: सन्माननीय मुख्यमंत्र्यांना जावून भेटलो आणि विधानसभेतील सन्माननीय सदस्यांच्या भावना त्यांना सांगितल्या. वारकऱ्यांचे जीवन हे शेतकरी कुटुंबातील असते, अतिशय गोरगरीब माणसे असतात. त्यांच्या बाबतीत एक मोठा दुर्दैवी प्रसंग आपल्या राज्यात घडला आहे. तेव्हा खास बाब म्हणून त्यांच्यासाठी शासनाने वेगळी मदत घोषित करावी अशी सदनाची भावना सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणली आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी 1 लाख रुपयांच्या घोषित केलेल्या मदतीमध्ये आणखी वाढ करुन त्यांच्या कुटुंबियाना आणखी मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे. या बाबत आज संध्याकाळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन ती मदत घोषित केली जाईल.

सभापती महोदय, वारी परंपरेने चालत आली आहे, माणसे रस्त्याने चालत राहणार, परंतु रस्त्यावरील वाहतूक वाढत चालली आहे. आतापर्यन्त असा प्रसंग न घडल्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेबाबत फारसा विचार झाला नव्हता. एखादा गोळीबार झाल्यानंतर चौकशी समिती नेमत असतांना पोलीस नाउमेद होणार नाही याची गृह मंत्र्यांना दक्षता घ्यावी लागते. कालच्या घटनेमध्ये पोलिसांनी गोळीबार केला नसता तर काय घडले असते? बेधुंद झालेल्या जमावाला आपण कुणावर दगडफेक करीत आहोत याचे भान नव्हते. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला नसता तर आणखी काही वारकऱ्यांचा मृत्यू दगडफेकीमुळे झालेला पहावयास मिळाला असता. एका बाजूला वारकरी होते तर दुसऱ्या बाजूला जवळच्या गावातून बघायला आलेले लोक होते. कालच्या घटनेमध्ये एकाही वारकऱ्याला पोलिसांनी लाठी मारली नाही, एकाही वारकऱ्याला अटक केली नाही, एकाही वारकऱ्याला गोळी लागली नाही. वारकऱ्यांच्या विरुध्द दिशेने गोळीबार, लाठीचार्ज आणि अश्रूधूर सोडण्यात आला. त्या गोळीबारात परिसरातील स्थानिक लोक जखमी झाले, त्यांचे मृत्यू झाले आहेत. मी त्यांच्याही भावना समजू शकतो. आपल्या परिसरामध्ये 11 लोक मयत झाल्यामुळे त्याचा उद्रेक होणे स्वाभाविक आहे. थोडा संयम राखला असता तर चांगले झाले असते. कधी कधी संयमालाही मर्यादा येतात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

त्यामुळे त्यांच्या हातातून हे कृत्य घडले ही वस्तुस्थिती आहे. म्हणून अशा घटनेमध्ये न्यायालयीन चौकशी घोषित करतो आणि प्रांत लेव्हलचा एक अधिकारी अशा घटनेचा तपास करीत असतो.

सभापती महोदय, ज्या वेळी मांढरादेवी येथे अपघात झाला होता आणि त्यामध्ये खूप मोठया संख्येने लोक मृत्युमूखी पडले होते. त्यावेळी आपण अशी भूमिका घेतली होती की, मांढरादेवी येथे अपघात झाला याचीच केवळ चौकशी करुन उपयोगाचे नाही तर पुन्हा महाराष्ट्रात अशा पध्दतीचे अपघात होऊ नयेत म्हणून या राज्यांमध्ये होणाऱ्या यात्रांच्या बाबतीत कशी उपाययोजना करावी यादृष्टीने शासनाला तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व्हावे, त्यासंबंधात सखोल अभ्यास केला जावा. म्हणून माजी निवृत्त न्यायमूर्तींकडून चौकशी करण्याचे ठरविल होते. त्यामागे केवळ घडलेल्या घटनेची चौकशी करणे हा उद्देश नव्हता तर राज्यामध्ये सतत वाऱ्या होत असतात, अशा वेळी तेथे संरक्षण देण्याच्या दृष्टीने कोण-कोणत्या उपाययोजना केल्या जाव्यात, वारकऱ्यांनी कोणते निर्बंध पाळावेत तसेच सरकारने तेथे कोणत्या प्रकारची व्यवस्था करावी, स्थानिक परिसरातील लोकांनी काय करावे यासंदर्भात आज आपल्यासमोर काही नाही. म्हणून एक अभ्यासू निवृत्त न्यायमूर्ती सदरहू घटनेची चौकशी करतील आणि पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून कोणत्या उपाययोजना करावयास पाहिजेत या बाबतीत देखील सरकारला मार्गदर्शन करतील.म्हणून या घटनेबाबत निवृत्त न्यायमूर्तींकडून चौकशी करणे आणि त्याठिकाणी कोणती काळजी घ्यावयास पाहिजे यासंबंधाने ते मार्गदर्शन करतील. मी सकाळी विधान सभेमध्ये अशा स्वरुपाची समिती नेमण्याचे घोषित केलेली असून, तीच माहिती मी या सदनामध्ये देत आहे.

सभापती महोदय, मोठे कंटेनर आपल्या राज्यामध्ये येत असतात. बरेच कंटेनर अन्य राज्यातील माल आपल्या राज्यामध्ये आणत असतात.त्यामुळे याठिकाणी जे कंटेनर येतात, त्याचा ड्रायव्हर प्रशिक्षित आहे, त्याला गाडी चालविण्याचे पुरेसे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे अशा प्रकारचे अंडर टेकींग संबंधित कंटेनरच्या मालकाकडून परिवहन विभागाला घेता येईल काय याबाबत आपण संबंधित विभागामार्फत महाराष्ट्रामध्ये कम्पलशन करुच.या राज्यामध्ये टँकर बेदरकारपणे चालविल्यामुळे अपघात होतात, त्याला आळा घालण्याची आवश्यकता आहे. पण दुर्दैवाने रस्त्यावर दुचाकी वाहनांचे सर्वात जास्त अपघात होत आहेत. मोटर सायकलचे होत आहेत. याबाबतीत सरकारने काही करावयाचा प्रयत्न केला तर लोकांच्या प्रतिक्रिया समजून घेता येतात. त्यामुळे अनेक वेळा सरकारसमोर अडचणी येत आहेत. अशा परिस्थितीत एका बाजूला मृत्यू



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

होत आहेत आणि दुसऱ्या बाजूला त्याबाबत काही करताही येत नाही अशी स्थिती झाली आहे. याबाबतीत निर्बंध घातले तरी त्याचे पालन होत नाही कारण जोपर्यंत कोणत्याही कायद्याला जनमताचा आधार मिळत नाही तोपर्यंत कायदाचे अंमलबजावणी करणे खूप कठीण होते. त्यामुळे यासाठी आवश्यक ते वातावरण तयार करावयास पाहिजे. त्याकरता प्रसिध्दी माध्यमांच्या व्दारे वेगवेगळे प्रोग्रॅम तयार करावे लागतील. आज ट्रॅफीकच्या बाबतीत काय करावे यादृष्टीने कोणत्याही अभ्यासक्रमामध्ये विषय घेतला जात नाही. याबाबतीत लोक शिक्षणही केले जात नाही. दुसरीकडे लोकांकडे गाडी खरेदी करण्याची क्षमता निर्माण झाल्यामुळे गाड्यांची संख्या वाढलेली आहे.अशा वेळी ते वाहन त्या व्यक्तीच्या जीविताला धोका निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहे आणि दुसऱ्याचे जीवन सुध्दा अडचणीमध्ये आणत आहे.याबाबतीत निश्चितपणे काही उपाययोजना करण्याची गरज आहे. काल वारकऱ्यांच्या बाबतीत जी घटना घडली, ती गंभीर आहे.शासन सहृदयतेने त्यांच्या भावनांशी सहमत आहे. या घटनेमध्ये मृत्यू पावलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना समाजाने देखील मदत करावी आणि शासनानेही मदत करावी. याठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जरुर शासन याची गांभीर्याने दखल घेईल एवढेच सांगून माझे दोन शब्द संपवितो.

----

. . . .3 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/MMP/AKN 16:40

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला माननीय गृह मंत्र्यांना एक प्रश्न विचारावासा वाटतो. जेव्हा एखादा जमाव प्रक्षुब्ध होतो, कंट्रोलच्या बाहेर जातो, तेव्हा शासनाचे फायरींग करण्याच्या बाबतीत नियम काय आहेत ? कारण त्याठिकाणी श्री.गणेश बोराडे याचा मृत्यू झाला, त्याच्या छातीत दोन गोळया लागलेल्या होत्या अशी माझ्याकडे माहिती आहे. तसेच इतर लोक जखमी झाले,त्यांच्या हाताला गोळया लागल्या आहेत.खरे म्हणजे कमरेच्या खाली फायरींग करण्याबाबतचे जे संकेत आहेत, ते धाब्यावर बसविण्यात आले आहेत. या बाबत कोणती ॲक्शन घेण्यात येणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी या बाबतीत अनेक वेळा चर्चा केलेली आहे. याविषयी तज्ज्ञांची वेगवेगळी मते आहेत. काही तज्ज्ञ म्हणतात की, सरकारने गोळीबार करु नये आणि जर गोळीबार केला तर तो इफेक्टीव्हच असला पाहिजे. काही तज्ज्ञांचे मत आहे की, लोकशाहीमध्ये अशा प्रकारे गोळीबार करणे हे शोभा देत नाही. त्याऐवजी पाण्याचे फवारे मारावेत, रबराच्या गोळ्या मारा, 410 मस्कत मधून गोळया मारा, प्रत्येक गोळी हवेमध्ये उडवावी आणि मग त्यातून जर समुदाय कंट्रोलमध्ये आला नाही तर पहिल्यांदा पायाखाली म्हणजे शक्यतो ती व्यक्ती जखमी होईल अशा पध्दतीने गोळी मारावी.पण गोळीबार करताना नेम धरुन करता येत नाही. एखाद्याच्या पायावर गोळी मारली तर त्या व्यक्तीच्या पाठीमागे दुसरा माणूस बसलेला असतो आणि त्यामुळे तो नेम बरोबर मागच्या माणसाच्या छातीवर बसतो.मी आणखी एका गोळीबाराबाबत माहिती देऊ इच्छितो. नागपूर जिल्ह्यामध्ये एका घटनेत हवेत गोळीबार केला, पण वर वायरमन काम करीत होता, तो खाली पडला.

**(सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)**

यानंतर श्री.शिगम अ.. . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

त्याचा घटनेशी काही संबंध नव्हता. बऱ्याच वेळा माणसे मरु नयेत म्हणून केलेल्या गोळीबारात सुध्दा माणसे मरण्याची शक्यता असते. एका बाजूने जमाव दगडफेक करीत असतो. त्या भीतीच्या वातावरण पोलीस एका आडोशाला उभे राहून गोळीबार करीत असतो. ही काही नेमबाजीची स्पर्धा नसते. त्यावेळी जमावाला मारण्याचा हेतू नसतो तर भीती दाखविण्याचा हेतू असतो. परंतु अशा घटना कुठे तरी घडत असतात. गोळीबार करावेच लागू नयेत असे राज्य शासनाचे धोरण आहे. परंतु कधी कधी या धोरणाला प्रतिसाद मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव गोळीबार केले जातात. शक्य तो मनुष्य हानी होऊ नये अशा तोंडी सूचना सर्वांना आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, जमाव पांगविण्यासाठी रबरी गोळ्यांचा वापर करता येऊ शकतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, रबरी गोळ्यांचा वापर करण्याचा प्रयोग देखील करण्यात येईल. त्या दिवशी तो 410 मस्कद मधून गोळीबार करण्यात आला करण्यात आला. त्यातून करण्यात आलेल्या गोळीबारात लोक जखमी होऊ शकतात, परंतु कोणाचा मृत्यू होऊ शकत नाही. त्यावेळी 37 गोळ्या मारण्यात आल्या. पोलिसांच्या हातात फटाक्या सारखे हत्यार आहे असे समजताच जमाव आणखी पोलिसांच्या अंगावर आला तर मग पोलिसांचा नाईलाज होतो. काल 37 गोळ्या मारण्यात आल्या. माणसे मारणे हा गोळीबाराचा उद्देश नव्हता. परंतु त्या ठिकाणी आणखी कोणता अनुचित प्रकार घडून त्यामध्ये मनुष्यहानी होऊ नये म्हणून गोळीबार करण्यात आला होता. जर त्या ठिकाणी पोलीस आले नसते तर पहिलेच 10-12 जण कंटेनरखाली चिरडले होते त्यामध्ये आणखी दहा-बारा लोक दगडफेकी मध्ये मेलेली आपणास पहावयाची होती काय ? त्या वेळी देखील आपण पोलिसांना जबाबदार धरुन पोलिसांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली असे सांगितले असते. दोन्ही बाजूने पोलिसांनाच उत्तरे द्यावी लागत आहेत. कारवाई केली तर का केली आणि कारवाई केली नाही तर का केली नाही. आपण दोन्ही बाजू समजून घेणे आवश्यक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ AKN/ MMP/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 16:45

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या वेळी दंगल होते त्या वेळी गोळीबार केला जात नाही. परंतु लोक प्रक्षुब्ध होताच त्यांच्यावर मात्र गोळीबार केला जातो हा आमचा आक्षेप आहे. माननीय मंत्री महोदयांकडून आम्हाला असे समर्थन अपेक्षित नाही. किमान या पुढे आंदोलकांवर गोळीबार करण्यात येणार नाही असे जाहीर करावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी शब्द देतो की, आंदोलकांवर गोळीबार करण्याची सरकारला कोणत्याही प्रकारची हौस नाही. सरकारचे तसे धोरण नाही. सन्माननीय सदस्य देखील समाजकारणात आहेत. ते एका पक्षाचे अध्यक्ष आहेत. आंदोलकांनी सुध्दा एका ठरावीक मर्यादेच्या पलीकडे जाऊन जनतेच्या मालमत्तेची तसेच त्यांच्या जीवावर बेतेल अशा प्रकारचे वर्तन करु नये. आंदोलकांनी देखील नियम पाळावेत, शिस्त पाळावी. लोकशाही मध्ये सर्वांना शांततेने आंदोलन करण्याचा अधिकार आहे. त्या मर्यादेमध्ये राहून आंदोलने झाली तर दुसऱ्या बाजूला गोळीबार करायला आणि चौकशीला सामोरे जायला कोणालाही हौस नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, अशा प्रकारच्या अपघातामध्ये कोणाचा मृत्यू झाल्यास त्या संबंधी फेटेल दाखल होतो. फेटेल दाखल झाल्यानंतर संबंधित वाहन चालक ताबडतोब पोलीस स्टेशनमध्ये हजर होतो आणि त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी त्यांना जामीन मिळतो. तेव्हा या संदर्भातील कायद्यामध्ये शासन दुरुस्ती करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा केंद्र शासनाचा कायदा आहे. या कायद्यामध्ये आणखी काही दुरुस्ती करावयाच्या असतील तर केंद्र शासनाला तशी विनंती करण्यात येईल. रस्त्यावर गाडी चालविण्याचा अधिकार गाडी मालकाला आणि वाहन चालकाला आहे तसाच रस्त्यावरुन सुरक्षित चालण्याचा अधिकार सर्वांना आहे. एकाचा अधिकार दुसऱ्याच्या आड येणार नाही या दृष्टीने जे कायदे कडक करण्याची आवश्यकता आहे त्याचा जरुर विचार केला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी भाषणात मुद्दा मांडला होता की, मांढरदेवी दुर्घटना झाली त्यावेळी न्या.राजन कोचर यांची समिती नियुक्ती केली होती. त्या समितीने सुचविल्या प्रमाणे ज्या ठिकाणी यात्रा भरते त्या ठिकाणी पूर्व तयारी करण्या संदर्भात तहसीलदारांनी बैठक घ्यावयास पाहिजे. अंबड येथे दिंडीचे दोन मुक्काम होते. असे असताना अंबड येथील तहसीलदार श्री.सुभाष काकडे यांनी कोणत्याही प्रकारची बैठक घेतलेली नाही. आपण या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी

..3..

डॉ.नीलम गोऱ्हे.....

करणार व त्यानंतर संबंधितांवर कारवाई होणार यामध्ये वेळ जाणार आहे. तेव्हा आमची अशी मागणी आहे की, ज्या तहसीलदाराकडून बेपर्वाईपणा झालेला आहे त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. ज्याच्या लापर्वाईमुळे हा प्रकार घडला आहे त्याच्याकडूनच लोकांनी चेक स्वीकारावे हे कितपत योग्य आहे ?

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, वारीच्या संदर्भात आणि ज्या वाऱ्या गावागावातून जातात, त्या संदर्भात शासनाने कुठलेही परिपत्रक काढलेले नाही. परंपरेनुसार या वाऱ्या गावागावातून जातात त्यांना पोलीस विभागामार्फत जेवढे आवश्यक आहे तेवढे संरक्षण देण्यात येते. आळंदी आणि देहू येथील पालख्या जातात त्यावेळी तेथील पालक मंत्री मिटिंग आयोजित करतात, सगळयांना सूचना देतात आणि त्या पालख्यांचे जे मार्ग असतात त्याप्रमाणे संरक्षण देतात. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या ठिकाणी सूचना केलेली आहे की, आपल्या हद्दीतून वारी जाईपर्यंत तेथे किमान सुरक्षा दिली पाहिजे, किमान ट्राफिकचे व्यवस्थापन केले पाहिजे. तसेच तेथील तहसीलदाराने त्या बाबतीत काही उपाययोजना केल्या पाहिजेत. सभापती महोदय, अशा पध्दतीने काळजी घेण्याच्या सूचना जरुर महसूल यंत्रणेला देण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, थोडया वेळा पूर्वी आम्ही अशी मागणी केली होती की, जे जे दिंडी मार्ग असतील त्या त्या दिंडी मार्गावर जे पोलीस स्टेशन्स असतील किंवा त्या जिल्हयाचे पोलीस अधीक्षक असतील त्यांना त्वरित एक जी.आर. काढून ज्यांनी ज्यांनी सूचविले असेल त्यांना त्यांना संरक्षण देण्याबाबत कळविण्यात यावे. संत गजानन महारांची पालखी निघते त्यावेळी पंधरा दिवस अगोदर तहसीलदारांना आणि एस.पी. ना या पालखीच्या मुक्कामा बाबत आणि त्यांच्या मार्गाबाबत सुचविण्यात येते. म्हणून ज्या दिंडी पालख्या अगोदर सूचना करतील त्याना संरक्षण देण्यात यावे, अशा प्रकारचा जी.आर. काढण्यात येणार आहे काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलीस विभागाला अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, अपघाताच्या बाबतीत या ठिकाणी चर्चा झालेली आहे. या बाबतीत माननीय गृह मंत्र्यांना माझी एक सूचना आहे. आपण अनेक हाय-वे वरुन प्रवास करतो. आता अनेक हाय-वे फोर-लेनचे झालेले आहेत. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे हा आज सहा लेनचा झालेला आहे. ट्रक्सचे ड्रायव्हर भरधावपणे पहिल्या लेनमध्ये सर्रासपणे ट्रक चालवतांना दिसतात. त्यांना पोलीस कुठेही अडवत नाहीत, बाजूला घेऊन थांबवत नाहीत. ते पहिल्या लेनमधूनच ट्रक चालवितात. त्यामुळे छोटया गाडयांना दुसऱ्या लेनमधून त्यांना ओव्हरटेक करावे लागते, अशी परिस्थिती असते तेव्हा या बाबतीत पोलीस विभागामार्फत काही कडक उपाययोजना

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

करण्यात येणार आहेत काय? माझी दुसरी सूचना अशी आहे की, अशा पध्दतीची जी वाहने आहेत त्यांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यामध्ये गव्हर्नर बसविण्याची सक्ती करण्यात येणार आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केलेल्या मागण्या परिवहन विभागाच्या लक्षात आणून दिल्या जातील.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना मला एक प्रश्न विचारावयाचा आहे की, ज्या एका कंटेनरच्या ड्रायव्हरच्या चुकीमुळे वारकरी संप्रदायाच्या वारीला कलंक लागला. त्या कंटेनरच्या ड्रायव्हरच्या चुकीमुळे 11 लोक मृत्युमुखी पडले. त्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्या ठिकाणी महाप्रक्षोभ निर्माण झाला. त्यामुळे त्या ड्रायव्हरला जामीन मिळणार नाही आणि त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई होईल या बाबतीत शासन काय करवाई करणार आहे?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे ते मी देखील अनुभवले आहे. पहिल्या लेनमधूनच जड वाहने चालविली जातात, त्यामुळे या जड वाहनांना ओव्हरटेक करुन लहान वाहने पुढे जाऊन लाईन बदलतात अशा वेळी मोठया प्रमाणात अपघात होतात. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हाय-वे वरुन पुण्याला जाताना आपल्याला याचा अनुभव येतो त्यामुळे ड्रायव्हरचे प्रशिक्षण करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : ड्रायव्हरच ट्रक चालवत नाहीत तर ज्यांच्या जवळ लायसन्स नसते असे क्लीनर आणि अगदी कमी वयाची मुले पूर्ण लोड असलेला ट्रक चालवितात हे आम्ही अनेक ठिकाणी पाहिलेले आहे. रस्त्यावरुन आम्ही जेव्हा प्रवास करतो त्यावेळी ज्यांच्या जवळ लायसन्स नसते अशी लहान मुले पूर्ण लोडेड ट्रक चालवताना दिसतात. त्यावेळी ट्रकचा ड्रायव्हर मागे झ ोपलेला असतो, अशा परिस्थितीमध्ये अपघात होतात. ते होऊ नये म्हणून कोणती कारवाई करण्यात येणार आहे?

श्री. आर.आर.पाटील : हाय-वे पोलिसांची संख्या अतिशय कमी आहे. रस्त्यावर अपघात झ ाला तर त्यांना मदत करावी ही त्या पोलिसांची प्रमुख जबाबदारी आहे. त्यांना कोणताही दंड

...3...

श्री. आर.आर.पाटील....

करण्याचे अधिकार पोलिसांना नव्हते. आता गेल्या वर्षी जुजबी स्वरुपाचा दंड करण्याचे अधिकार पोलिसांना देण्यात आलेले आहेत. आर.टी.ओं. ना या बाबतीत सतर्क करण्यात येईल. अशा पध्दतीने लायसन्स नसताना क्लीनर गाडया चालवित असतील तर त्यांचे लायसन्स रद्द केले पाहिजे आणि त्यांच्या मालकाला सुध्दा दंड झाला पाहिजे, अशा पध्दतीच्या सूचना सगळया आर.टी.ओं. ना आयुक्त, परिवहन यांच्या मार्फत देण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. बिनसाळे यांनी सांगितले की, पहिल्या लेनमधून चुकीच्या पध्दतीने वाहने चालविली जातात. त्या संदर्भात अलीकडच्या काळात रस्त्यावर टोल घेणाऱ्या ज्या कंपन्या आहेत त्यांच्या सहाय्याने ड्रायव्हर्संना पहिल्यांदा माहिती देणे आणि अशा ड्रायव्हर्सवर कठोर कारवाई करणे, अशा प्रकारची भूमिका स्वीकारली जाईल.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

---

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा-तास चर्चा**

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी ) : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिलेली पहिली अर्धा-तास चर्चा घेण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझी आजची अर्धा-तास चर्चा उद्या घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आधार कार्ड योजना प्रक्रिया राबविणाऱ्यांमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली गैरसोय

**मु. शी.** : आधार कार्ड योजना प्रक्रिया राबविणाऱ्यांमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली गैरसोय यासंबंधी श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयवतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"महत्वाकांक्षी आधार कार्ड योजना अधिकाधिक सुलभ व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असले तरी प्रत्यक्षात ही प्रक्रिया राबवणाऱ्यांमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असणे, आधार कार्डचे काम करणाऱ्या खाजगी कंपन्यांकडे पुरेसे मनुष्यबळ, संगणक यांचा अभाव तसेच केंद्रांची कमी असणारी संख्या, परिणामी नागरिकांच्या वेळेचा अपव्यय होत असणे, आधार कार्ड वाटपातील या त्रुटी दूर करुन कामकाजामध्ये सुलभता येण्यासाठी केंद्रावरील कर्मचाऱ्यांनी सहकार्य करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

सभापती महोदय, शासनाच्या अतिशय महत्वाकांक्षी अशा आधार कार्ड योजनेच्या संदर्भात चर्चा करण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे. शासन अनेक कल्याणकारी योजना राबवित असताना त्या योजना अधिक चांगल्या पध्दतीने राबविल्या पाहिजेत, त्या योजना लोकाभिमुख असल्या पाहिजेत, समाजातील सर्वात लहान स्तरापर्यंत त्या योजना कार्यान्वित झाल्या पाहिजेत अशा उद्देशाने या योजनांची आखणी केलेली असते. परंतु दुर्दैवाने आज आधार कार्ड योजनेच्या बाबतीत जर आपण संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र बघितले किंवा मी ज्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतो त्या ठिकाणी फिरलो, नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या त्यामध्ये नागरिकांनी ज्या तक्रारी केल्या त्या अतिशय चिंताजनक आहेत, असे मला या ठिकाणी प्रामुख्याने सांगावेसे वाटते. मुळातच या आधार कार्ड योजनेच्या बाबतीत शासनाकडून जी जनजागृती होणे अपेक्षित होते त्या पध्दतीने

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/ AKN/ KTG

श्री. जयवंतराव जाधव .....

जनजागृती झालेली नाही, ही बाब मला सर्वात प्रथम आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. शहरी भाग असेल किंवा ग्रामीण भाग असेल, शहरी भागामध्ये सुध्दा या योजनेचे जे काही महत्व आहे ते अजूनही लोकांपर्यंत पोहोचलेले नाहीच पण ग्रामीण भागामध्ये सुध्दा या बाबतीत अतिशय दूरवस्था दिसून येते. माझ्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्यानुसार दिनांक 14.7.2011 पर्यंत नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये फक्त 1 टक्का नागरिक आधार कार्ड योजनेचा लाभ घेऊ शकलेले आहेत. दुर्दैवाने यामध्ये अतिशय गंभीर प्रकार असा दिसून येतो की, यामध्ये प्रत्येक राजकीय पक्ष आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. मुळात शासनाची ही कल्याणकारी योजना आहे. ही योजना शासन राबवित आहे आणि यंत्रणा खाजगी आहे. परंतु आज समाजातील परिस्थिती पाहिली तर तेथील जो कोणी नगरसेवक असेल, समाजसेवक असेल त्यांनी आपापल्या वॉर्डमध्ये मोठमोठे होर्डीन्ग लावलेले आहेत. त्या होर्डीन्गच्या माध्यमातून ही आधार कार्ड योजना आम्ही आमच्या माध्यमातून राबवित आहोत असे जनतेमध्ये भासविण्याचा प्रयत्न होत असताना दिसतो.

सभापती महोदय, ही योजना राबवित असताना त्या गावाची लोकसंख्या, त्या शहराची लोकसंख्या गृहीत धरुन आपण शासनाच्या माध्यमातून जी सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्याकरिता योजलेली आहे त्यामध्ये ही योजना जी खाजगी संस्था राबवित आहे त्या संस्थेकडे योजना राबविण्याकरिता संबंधित सक्षम कर्मचारी उपलब्ध आहेत का, त्या ठिकाणी संगणक आणि इतर जी मशिनरी आवश्यक आहे ती गरजेपुरती उपलब्ध आहे का, या बाबतीत शासनाने काही उपाययोजना केली आहे का, शासन त्याचा काही फॉलोअप घेत आहे का, या बाबतीत जर आपण विचार केला तर माझ्या मते यामध्ये शासनाचे जे सक्षम अधिकारी आहेत ते अतिशय उदासीनतेने या योजनेकडे बघत आहेत. मुळातच जनतेमध्ये जागरुकता नाही. जे लोक जागरुक होऊन त्या ठिकाणी कार्ड काढण्यासाठी जात आहेत त्या ठिकाणी आता एजंट्सची सुध्दा व्युत्पत्ती झालेली आहे. त्या ठिकाणी शासनाकडून जो फॉर्म मोफत दिला गेला पाहिजे तो त्या ठिकाणी ब्लॅकने दिला जात आहे.

यानंतर श्री. भोगले ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ AKN/ KGS/ MMP/ KTG/ 17:00

श्री.जयवंतराव जाधव........

जर का ब्लॅकने दिला नाही तर संबंधित नगरसेवक किंवा तेथील समाजसेवक शासनाकडून आलेल्या फॉर्मपैकी 1 टक्का फॉर्म त्यांच्याकडून घेतो आणि त्याच्या सोयीनुसार, आवडीच्या लोकांना त्या फॉर्मचे वाटप करतो. फॉर्म भरुन संबंधित केंद्रावर रजिस्ट्रेशनसाठी गेल्यानंतर तेथील कर्मचारीवर्ग सक्षम नसल्यामुळे एका व्यक्तीला साधारणपणे 10 ते 12 मिनिटांचा वेळ अपेक्षित असताना सरासरी 20 ते 22 मिनिटे खर्ची पडत आहेत. एका तासाला साधारणपणे 4 ते 5 पेक्षा अधिक लोकांचे रजिस्ट्रेशन होत नाही. पाच-पाच हजार फॉर्म वाटप झाल्यानंतर एकाच वेळी 500 लोक रजिस्ट्रेशन केंद्रावर नोंदणीसाठी गेले आणि एका तासात फक्त 4 ते 5 लोकांचे रजिस्ट्रेशन होत असेल तर दिवसभरात आठ तासाच्या कार्यकाळात 40 ते 50 पेक्षा जास्त रजिस्ट्रेशन होऊ शकत नाही.

शासनाने जाहीर केले की, एक वर्ष ही योजना कार्यान्वित करणार आहोत. दिवसभरात एका केंद्रावर फक्त 40 ते 50 लोकांचे रजिस्ट्रेशन होणार असेल तर राज्यातील अकरा कोटी जनतेचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी किती कालावधी लागेल? ही योजना सक्षमपणे राबविण्यासाठी शासनाकडून गंभीरपणे पावले उचलण्याची गरज आहे. खाजगी यंत्रणेला ताकीद देण्याची गरज आहे. उपक्रम राबविणारी संस्था खाजगी असल्यामुळे त्या संस्थेला शासनाकडून गाईडलाईन्स देण्याची गरज आहे. या उपक्रमासाठी शासनाने सक्षम अधिकारी डेप्यूट केले आहेत. त्यांच्यामार्फत ही योजना चांगल्या पध्दतीने राबविली जात आहे का याची खातरजमा केली गेली पाहिजे. योजना योग्य पध्दतीने राबविली जात नसेल तर सक्षम अधिकाऱ्यांना जाब विचारण्याची आवश्यकता आहे. संस्थेला ठरावीक काळात एका केंद्रावर किमान दहा संगणक बसवून दररोज किमान अमुक लोकांचे रजिस्ट्रेशन झाले पाहिजे असा दंडक घालून दिला पाहिजे. अन्यथा भविष्यकाळात ही कल्याणकारी आणि आदर्श योजना बिघडल्याशिवाय राहणार नाही. त्या दृष्टीने अर्धातास चर्चेच्या माध्यमातून या बाबीकडे मी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आधार कार्ड रजिस्ट्रेशनबाबत बऱ्याच जिल्हयातील तक्रारी आहेत. विशेषत: पुणे जिल्हा आणि पुणे शहरात काही रजिस्ट्रेशन केंद्राच्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल इतकी गर्दी होत आहे. विधानपरिषद आणि विधानसभा सदस्यांनी अशा योजनेबद्दल जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा केली तर यंत्रे कमी आहेत असे उत्तर दिले जाते. त्या त्या जिल्हयात विशिष्ट अडचणी असू शकतील. परंतु शासनाकडून नाशिक जिल्हयाबाबत उत्तर दिले जाईल त्याच वेळी पुणे शहर आणि पुणे जिल्हयाच्या संदर्भात उत्तर दिले जावे. स्थानिक लोकप्रतिनिधींबरोबर पुढील तीन महिन्यांच्या काळात बैठक घेण्यात यावी, त्या बैठकीत त्या त्या ठिकाणच्या तक्रारी आणि नाराजी, गैरप्रकार निदर्शनास आणून देऊ. जेणेकरुन प्रशासकीय यंत्रणेमध्ये सुधारणा करता येईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, आधार कार्ड योजनेनुसार या देशातील प्रत्येक नागरिकाला विशिष्ट 12 अंकी क्रमांक दिला जाणार आहे. आधार कार्डसाठी नोंदणी करीत असताना प्रत्येक व्यक्तीच्या बोटांचे ठसे, डोळ्यातील बुब्बुळाचे ठसे यांची प्रतिमा नोंदवून घेतली जाणार आहे. बायोमेट्रिक प्रूफ, युनिक ओळख प्रत्येक व्यक्तीची यामध्ये असणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाने योजना आणली असून या कामासाठी विशिष्ट ओळख प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. दिनांक 10 मे, 2010 रोजी करार करण्यात आला आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .........

केंद्र शासनाने सन 2016 पर्यंत संपूर्ण देशातील उद्दिष्ट 50 टक्के पूर्ण व्हावे असे ठरविले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य हे संपूर्ण देशातील पहिले राज्य आहे की, ज्या राज्यात नंदुरबार जिल्ह्यातील एका छोट्या टेंभली नावाच्या आदिवासी गावात माननीय पंतप्रधानांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन 29 सप्टेबर, 2010 रोजी करण्यात आले. त्यानंतर आपल्या राज्याने 50 टक्के उद्दिष्ट सन 2012 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले. असे जरी असले तरी ही एक कंटिन्यूअस प्रोसेस आहे, यापुढेही हा कार्यक्रम सुरुच राहणार आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी सभागृहात आकडेवारी सादर केली. पण माझ्याकडील आकडेवारीनुसार संपूर्ण राज्यात 1.50 कोटी कार्डांची नोंद आतापर्यंत पूर्ण झाली आहे.

महोदय, या कार्यक्रमासाठी शासनाने ग्रामीण भागासाठी जिल्हाधिकारी, महापालिका क्षेत्रासाठी महापालिका आयुक्त यांची निबंधक म्हणून नियुक्ती केली आहे. योजनेचे काम सुरु असताना अनेक तक्रारी शासनाकडे सुध्दा प्राप्त झाल्या असून त्यांची नोंद शासनाने घेतलेली आहे. त्यांनाही ॲड्रेस करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आलेल्या तक्रारीनुसार मशिनरी कमी असल्याचे निदर्शनास आणून दिले, ही वस्तुस्थिती आहे. हे काम आपण 13 खाजगी संस्थांना दिलेले आहे. काही जिल्ह्यांमध्ये त्यासाठी जास्त गर्दी होते असे दिसते तेव्हा जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांनी बुथवाईज सूचना दिल्या आहेत की, आधार कार्डचे फॉर्म्स घरोघरी जाऊन देण्यात यावेत. तसेच त्यांना दिलेली तारीख आल्यानंतर बुथवर जाऊन पुढील प्रोसिजर पूर्ण करावी असेही नियोजन केले आहे. मशिनरीजची संख्या 4 हजाराच्या आसपास आहे, ती कमीच आहे. म्हणून शासनाने ही संख्या 9 हजारापर्यंत वाढविण्याचे आदेशित केले आहे. त्याचबरोबर बँक ऑफ बडोदा, पोस्ट ऑफिसेस सारख्या संस्थांना त्यांच्या प्रिमायसेसमध्येच हे काम करण्याची परवानगी दिलेली होती. पण त्या प्रिमायसेसच्या बाहेर सुध्दा जाऊन आधार कार्डची नोंदणी करण्याची परवानगी या संस्थांना देण्यात आली आहे. यासंदर्भात सभागृहात एक गंभीर तक्रार करण्यात आली की खाजगी यंत्रणा किंवा पक्ष कार्यालयात सुध्दा हे काम चालू आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिलेले आहेत की, प्रायव्हेट संस्थांमध्ये असे काम न करता पब्लिक प्लेस,

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ......

शासकीय शाळा अशाच ठिकाणी हे काम करावे.

महोदय, वास्तविक एखादा नवीन उपक्रम सुरु केल्यानंतर त्याच्या तक्रारी येत असतात पण त्या अनुषंगाने दखल घेण्याचाही प्रयत्न शासन करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी नाशिक जिल्ह्यात फक्त एक टक्का इतकीच नोंद ग्रामीण भागात झाल्याची तक्रार केली. ही वस्तुस्थिती असली तरी अन्य ठिकाणी उदा. अहमदनगर जिल्ह्यात हे काम 52 टक्के झालेले आहे.

यानंतर श्री. भारवि......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

जळगावमध्ये 35 टक्के, सोलापूरमध्ये 34 टक्के, वर्धामध्ये 30 टक्के प्रमाण आहे. म्हणजे चांगले जिल्ह्ये सुद्धा आहेत. तसेच कमी नोंदणी झालेले जिल्ह्ये देखील आहेत. यासाठी शासनाने पारितोषिक देण्याची योजना सुरू केली. ज्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा म्युनिसिपल कमिशनरने मे, जून महिन्यामध्ये चांगल्या प्रकारे नोंदणी करण्याचे काम केले आहे त्यांना पारितोषिक देण्यात आलेले आहे. 50 हजार रूपयांचे पारितोषिक दहा अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहे. त्याच पद्धतीने 14 ते 20 टक्के ज्यांनी नोंदणी केली आहे त्यांना 35 हजार रूपयांचे पारितोषिक देण्यात आले आहे.

जनजागृती कमी करण्यात आली आहे असा येथे उल्लेख करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाची जनजागृती खूप करण्यात आली आहे. वर्तमानपत्रामध्ये जाहिराती देण्यात आलेल्या आहेत. विद्युत देयकांवर जाहिरातीद्वारे प्रसिद्धी देण्यात आली होती. त्यामुळेच जास्त गर्दी होत आहे. आपल्या क्षमतेपेक्षा जास्त मागणी येत आहे. याचाच अर्थ असा आहे की, जनजागृती अगदी व्यवस्थित झालेली आहे. आम्हाला असे वाटते की, या कार्यक्रमाला आता कमी प्रसिद्धी द्यावी. कारण आपल्या कामाच्या गती पेक्षा नोंदणीसाठी आता जास्त मागणी येत आहे. त्यामुळे आम्ही यंत्रणा सक्षम करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. मशिन्स वाढविणार आहोत. ही प्रोसेस थांबविण्यात येणार नाही हे देखील सांगणे गरजेचे आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सूचना केली की, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन त्यांच्या जिल्ह्यात मिटींग घेता येईल काय ? मला वाटते ही सूचना स्वीकारण्यासारखी आहे. लोकप्रतिनिधींची मदत घेण्यामध्ये काहीही हरकत नाही. जिल्ह्यामध्ये ज्या काही तक्रारी असतील त्या संबंधी जिल्हाधिकारी व निबंधकांना लक्ष देण्याबाबत सांगण्यात येईल.

कार्डाची नोंदणी केल्यानंतर नंबर व कार्ड येण्यास विलंब लागत आहे. त्याला गती देण्याचा प्रयत्न शासनाकडून होत आहे. कारण हा सगळा डाटा बंगळूर येथे जाऊन एन्रोलमेंट नंबर मिळतो व तो कलकत्ता येथून डिस्पॅच होतो. ही सर्व प्रक्रिया होण्यासाठी वेळ लागतो. सदर कालावधी कमी व्हावा, बंगळूरु येथे कामाला गती मिळावी यासाठी शासन प्रयत्न करीत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

जेथे बोगस सेंटर्स सुरू आहेत त्या विरूद्ध कडक कारवाई करून ते सेंटर्स बंद करण्याचे काम शासनाकडून होईल. शासनाने काही प्राथम्यक्रम देखील ठरविला आहे. जे वयोवृद्ध आहेत, अपंग आहेत, गर्भवती महिला आहेत अशांना प्राथम्यक्रम देण्यात यावा अशा सूचना शासनाने दिलेल्या आहेत. या शिवाय अंध व्यक्तिसाठी विशेष बुथ स्थापण्याची परवानगी देखील शासनाने दिलेली आहे.

मला येथे सांगितले पाहिजे की, हे सिटीझन शिपचे कार्ड नाही. ह्या कार्डामुळे प्रत्येक योजनेमध्ये जे बोगस प्रकार घडतात ते थांबतील. एवढाच फायदा आपल्याला या कार्डातून मिळेल एवढे सांगून मी माझे विचार पूर्ण करते.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जो खुलासा केला आहे त्याबद्दल आम्हाला निश्चितच समाधान आहे. या कार्डचा उपयोग सर्वसामान्याला काय आहे ? लोकांची अशी भावना आहे की, हे कार्ड मिळाले नाही तर आम्हाला रेशन मिळणार नाही. या कार्डाबद्दल अनेक गैरसमजुती आहेत. असेही सांगितले जाते की, यामध्ये जातीचा उल्लेख आहे. तो जर नसेल तर जातीचे प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यामुळे शासनाने आधार कार्ड काढा या ऐवजी या कार्डाचा निश्चित उपयोग काय याबाबत जनजागृती केली पाहिजे. शेवटच्या माणसा पर्यंत कार्ड काढले जात नाही तो पर्यंत ही योजना सुरू राहील असा खुलासा देखील शासनाने करावा.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव...

सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी इतर जिल्ह्यामध्ये चांगले काम झाल्याचे सांगितले. परंतु आमच्या नाशिक जिल्ह्यात एक टक्का काम झाले म्हणजे तेथील अधिकारी सक्षम नाहीत असे नाही. तेथील अधिकारी व कर्मचारी सक्षम आहेत, परंतु त्यांच्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली यंत्रसामग्री पुरेशी नाही. त्या ठिकाणी खाजगी संस्थेमार्फत हे काम सुरु आहे, त्यांना आपण चांगले कार्यक्षम कर्मचारी उपलब्ध करुन दिले आहेत काय? एकाच यंत्रणेकडे हे काम सोपविले आहे काय? याबाबत शासनाने खुलासा करावा. त्याचप्रमाणे या कामासाठी नेमण्यात येणारे कर्मचारी हे अतिशय प्रशिक्षित असले पाहिजेत. मला उपलब्ध झालेल्या माहितीनुसार लोकांनी एखाद्या राजपत्रित अधिकाऱ्याकडून दाखला आणला तर तो स्वीकारण्याबाबत शासनाने सूचना दिल्या आहेत काय? तशा सूचना दिल्या असतील तर तो दाखल स्वीकारणे आवश्यक आहे. परंतु आज लोकांना तुम्ही आमदार, खासदार यांच्याकडून दाखला आणला नाही तर तुम्हाला ओळखपत्र दिले जाणार नाही असे सांगितले जाते याबाबत सुध्दा शासनाने खुलासा करावा.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या बाबतीत लोकांपर्यन्त व्यवस्थितरित्या माहिती पोहोचलेली नाही असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. या बाबतीत आपण वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यामध्ये सर्व गोष्टींचा खुलासा करण्यात आला आहे. ग्रामीण भागात कनिष्ठ वर्गामध्ये वर्तमानपत्राचे वाचन होत नाही त्या ठिकाणी आपल्याला थोडे अधिक प्रयत्न करावे लागतील. ही योजना लोकांपर्यन्त पोहोचविण्याची गरज आहे. हे ओळख पत्र असून आज आपण लोकांना अनेक योजनांमध्ये सबसिडी देतो, रेशन कार्ड पुरवितो, मुलांना शिष्यवृत्ती देतो त्यामधील होणारे बोगस प्रकार थांबविण्यासाठी याची खूप मदत होणार आहे. ही गोष्ट लोकांना समजावून सांगण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांनी आमदार व खासदारांच्या दाखल्याचा उल्लेख केला. तशाप्रकारचा दाखला आणण्याची अट घालण्यात आलेली नाही. परंतु आपल्याकडे पॅन कार्ड, रेशन कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स किंवा इलेक्ट्रिक बिल यापैकी काहीही असले तरी चालेल. यापैकी काहीही नसेल तर मात्र आमदार, खासदार किंवा ग्रामपंचायतीच्या सरपंचाचा सुध्दा दाखला चालू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (मोहन जोशी)** : अर्धा तास चर्चा संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 28.7.2011 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.30 ते 11.00 पर्यंत विशेष बैठक होईल. विशेष बैठकीमध्ये आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या 3 लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी 11.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 5 वाजून 18 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 28.7.2011 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही